# पवित्र वेद आणि इस्लाम धर्म



कल्कि अवतार कधी अवतरणार?

मक्तेश्वर हेच मक्का आहे का?

मनुलाच मुसलमान हजरत नूह म्हणतात का?

नराशंसाचे रहस्य काय?

पुरूष मेधालाच मुसलमान बकरी-ईद म्हणतात का?

पवित्र कुरआन आणि पवित्र वेदांमध्ये काय समानता आहे?

## MR. Q.S. KHAN IS ALSO AUTHOR OF FOLLOWING BOOKS.

Some of his book are:

**Management Topics:-**

- Law of success for both the Worlds.
- How to prosper the Islamic way?
- Yashachi Gurukilli (Marathi Translation of Law of success for both the Worlds.)

**Religious Topics:-**

- Teachings of Vedas and Quran (Also translated in Hindi & Marathi)
- Daulat Mand kaise banen? (Urdu)
- Hajj Journey Problems and their easy Solutions.
- Safar-e-Hajj (Urdu, Hindi, Bengali & Gujarati)
- Kya har mah Chand dekhna Zaroori hai? (Urdu)

**Engineering Topics:-**

1. Introduction to Hydraulic Presses and Design of Press Body.
2. Design and Manufacturing of Hydraulic cylinders.
3. Study of Hydraulic Valves, Pumps and Accumulators.
4. Study of Hydraulic Accessories
5. Study of Hydraulic Circuits
6. Study of Hydraulic Seals, Fluid Conductors, and Hydraulic Oil.
7. Design and Manufacturing of Hydraulic Presses.

**ALL ABOVE MENTIONED BOOKS AND MANY BOOKS COULD BE STUDIED AND FREELY DOWNLOADED FROM:**
www.freeeducation.co.in / www.tanveerpublication.com
(Detail of link to free download are given on last page of this book)

# पवित्र वेद आणि इस्लाम धर्म

सुशील एस. लिमये
क्यु.एस.खान
B.E (Mech)

Printed by
**Al Qalam PUBLICATION PVT. LTD.**
3, Gali Garhaiyya Bazar Matia Mahal, Jama Masjid, Delhi-6
Tel :- 011-23241481, 23261481. Fax :- 011-23241481.
E-mail :- alqalambooks@gmail.com

**No Copyright**

या पुस्तकाचे कोणतेही कॉपीराईटस् नाहीत. या पुस्तकाला भाषांतर किंवा छापण्यासाठी कोणत्याही परवानगीची आवश्यकता नाही.
जर तुम्हाला या पुस्तकात कांहीं चुका आढळल्यास आम्हाला त्याची सुचना द्या, जेणेकरून पुढील आवृत्तीसाठी आम्हाला त्यामध्ये योग्य बदल करता येतील.

**पवित्र वेद आणि इस्लाम धर्म**

978- 93- 80778- 15- 0

Price: **₹ 20/-**

THE RIGHTEOUS SHALL FLOURISH LIKE A PALM TREE
GOD IS GREAT

**तनवीर पब्लिकेशन**

हायड्रो इलेक्ट्रिक मशीनरी प्रिमाइसेस
ए-13, राम-रहीम उद्योग नगर, बस स्टॉप लेन,
एल.बी.एस. मार्ग, सोनापूर, भांडुप (पश्चिम), मुंबई 400078

फोनः 022- 2596 5930 फॅक्सः 0091-22-25961682
मोबाइलः 9892064026, 932006 4026
ई-मेलः hydelect@vsnl.com, hydelect@mtnl.net.in
वेब-साइटः www.freeeducation.co.in, www.tanveerpublication.com,

# प्रस्तावना

सदर पुस्तकाच्या लेखनाचा उद्देश मुस्लिम आणि हिंदु बांधवांच्या दरम्यान राजनैतिक धोरणांमुळे जी व्देषाची भावना निर्माण झाली आहे तिला समाप्त करणे आहे.

हया पुस्तकाव्दारे मी ज्या विषयांची मांडणी करण्याचा प्रयत्न करीत आहे ते विषय खऱ्या अर्थाने दोन्ही धर्मांत समान आहेत.

आपण जेव्हा इतर परकिय देशात प्रवास किंवा यात्रा करण्यासाठी जातो आणि तेथे जर आपल्या देशाच्या व्यक्तिशी गाठभेट झाली तर कोणताही परिचय नसताना देखील त्या व्यक्तिविषयी मनात एक आपुलकी, सहानुभूती आणि मैत्रीची भावना साहजिकच निर्माण होते आणि या भावनेमागील कारण आपण एक देशवासी, म्हणजेच एकाच समान देशाचे नागरिक हेच असते.

समान गोष्टी मित्रता वाढवते. ह्याच कारणामुळे मी देखील दोन्ही धर्मातील समान विषयांची ओळख व माहिती देण्याचा प्रयत्न करीत आहे. मी आशा बाळगून आहे की या पुस्तकाव्दारे दोन्ही धर्मातील समानता दोन्ही पंथात किंवा दोन्ही समुदायातील व्देष कमी करून बंधुप्रेम फुलवण्याचा नक्कीच प्रयत्न करिल व हे एक उत्तम माध्यम बनेल.

मी या विषयाचा तज्ञ व्यक्ति नाही. ह्या पुस्तकात जर काही चुका आपणास आढळल्या तर कृपा करून पुढील आवृत्तीत त्या चुका सुधारण्यासाठी मला मदत करा.

मला मनापासुन आशा आहे की शांतताप्रेमी व्यक्तिंना सदर पुस्तक वाचण्यास खुपच आवडेल व या पुस्तकास ते नक्कीच प्रोत्साहन देतील.

क्यु.एस.खान

# अनुक्रमाणिका

१. हिंदु धर्माचे ईश्वरीय ग्रंथ .......... ०६
२. हिंदु धर्माचे पैगंबर कोण आहेत? .......... १०
३. पुरूष-मेधा किंवा बकरी ईद .......... १२
४. मक्का किंवा मक्तेश्वर? .......... १५
५. कोणा-कोणाला पुजायचे आम्हीं? .......... २०
६. पवित्र कुराणांत हिंदु धर्माचा उल्लेख .......... २४
७. पवित्र वेद आणि पवित्र कुराणांतील एकसमान श्लोक (१) .......... २७
८. पवित्र नराशंस कोण आहे? .......... ३३
९. इस्लाम म्हणजे काय? .......... ३८
१०. पवित्र कल्कि अवतार कोण आहे? .......... ४३
११. पुस्तकाचा सारांश .......... ५२
१२. वेद आणि कुराणांतील एकसमान श्लोक (२) .......... ५३

# हिंदु धर्माचे ईश्वरी ग्रंथ

- भारतीय लोक जगातील सर्वात बुद्धिमान व्यक्ति म्हणून ओळखले जातात. म्हणुनच (NASA) (अमेरिकेची राष्ट्रीय व अवकाश प्रशासन संस्था) नासासारख्या संस्थेमध्ये ३५% वैज्ञानिक हे भारतीय आहेत. भारतीय हे अतिशय सहनशील, कष्टाळू, प्रामाणिक, व सुसंस्कृत म्हणून जगात ओळखले जातात. म्हणूनच कॅनडा, न्युझीलंड, ऑस्टेलिया, अमेरिका, जर्मनी व अनेक देश हे भारतीयांना त्यांचे नवीन नागरिक म्हणून प्रथम प्राधान्य देतात.

  परंतु या महान राष्ट्रातील लोकांचा धार्मिक बाबतीत इतर लोकांशी मतभेद का असावा? प्रत्येक धर्मात एक पैगंबर आहे आणि त्यांचा एक ईश्वरी ग्रंथ आहे. परंतु भारतीय लोक हे सविस्तरपणे सांगू शकत नाहींत कि त्यांचे पैगंबर कोण आहेत व त्यांचे ईश्वरी ग्रंथ कोणते आहेत. असे का?

- हे खरे नाही. ह्या महान राष्ट्रात अनेक पैगंबर आले आणि त्यांची पवित्र ग्रंथसुद्धां आहेत. परंतु दुदैवाने त्यांची पवित्र धार्मिक शिकवण सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचण्यास बऱ्याच अडचणी येत होत्या. म्हणून जसा काळ बदलत गेला तसा सर्वसामान्यांचा दोन्हींशी (पैगंबर आणि ईश्वरी ग्रंथ) संपर्क तुटला आणि ते त्यांची ओळख विसरले.

  ह्या पुस्तकामध्ये आपण पैगंबर आणि ईश्वरी ग्रंथाबाबत माहिती घेणार आहोत.

- १८ व्या शतकाअखेर पर्यंत वेद हे लिखित स्वरूपात नव्हते. परंतु ते पंडीतांच्या स्मरणशक्तित होते. धार्मिक शिक्षणावर पुरोहितांची मक्तेदारी (Monopoly) होती. त्यानुसार फक्त त्यांनाच धार्मिक शिक्षण घेण्याचे अधिकार होते. ह्या व्यतिरिक्त समाजातील इतर कोणत्याही लोकांना धार्मिक शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. आणि जसे कि, वेद हे पुस्तकिय स्वरूपात नसल्यामुळे इतर लोक स्वतःहून वेदांचा अभ्यास करू शकत नव्हते. ब्राम्हण समाजाचे एकंदर अस्तित्व भारतात फक्त ५ टक्के आहे. परंतू ह्या पुरोहित समाजाचे स्वसरंक्षण प्रणाली (Social Security System) इतकी चांगली आणि परिणामकारक हाती कि, ३००० वर्षांपर्यंत प्रत्येक धार्मिक बाबींवर त्यांचा पुरेपूर ताबा आणि वर्चस्व होते.

  ह्यात काहीच शंका नाही की, त्यांना "पुरोहित समाज" म्हणून भक्कम आर्थिक आणि सामाजिक सरंक्षण मिळाले. परंतु ९५ टक्के सामान्य जनता जी त्यांच्यावर अवलंबून होती, ती धार्मिक शिकवणींना मुकली आणि आपल्या विद्येची व पैगंबरांची ओळख विसरली त्यामुळे पवित्र ग्रंथ हे त्यांच्या लक्षात राहिले नाहीत. ही बाब म्हणजे विशाल देशाची प्रचंड हानी आहे.

  आता या नवीन युगात जेव्हा कोणताही वर्ग आर्थिक रूपाने पुजापाठ व धार्मिक शिकवणींवर अवलंबून नाही. त्यांचे तसे अधिकारही राहिले नाहीत. आता तरी ह्या क्षणाला त्यांनी धार्मिक ज्ञानाचा प्रचार, प्रसार करावा आणि आपल्या धार्मिक ज्ञानातील अचूक आणि सत्य ज्ञान लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे.

### हिंदु धर्मातील ईश्वरी ग्रंथांची ओळख कशी करावी?

- पवित्र कुराण, पवित्र बायबल, पवित्र तौरात या तीन ग्रंथांना त्यांचे अनुयायी ईश्वरी ग्रंथ म्हणुन स्वीकारतात. ह्या तिन्ही ईश्वरी ग्रंथात ईश्वर, स्वर्ग, नरक, परलोकातील जीवन आणि प्रलय (कयामत) ह्यांचे एकसमान वर्णन आहे. तसेच ह्या सर्व ग्रंथात ७०% एक समान धार्मिक शिकवण आहे.

  वेदांचा सखोल अभ्यास केल्यानंतर आपणास आढळून येईल कि ऋग्वेदांतही ईश्वर, स्वर्ग, नरक, परलोकातील जीवन, प्रलय (कयामत) चे सखोल वर्णन आहे. आणि भारतातील लोकही वेदांना आदिज्ञान, आदिग्रंथ, अपुरूषी असे मानतात. म्हणून आपण ऋग्वेदाला ईश्वरी ग्रंथ मानू शकतो.

**उदा. ईश्वराच्या बाबतीत ऋग्वेदात उल्लेख आहे की;**

१. ईश्वरामुळेच पृथ्वी आणि आकाशाची निर्मिती झाली आहे. (ऋग्वेद १:१९:७)

२. हे ईश्वर! तूच प्रथम आणि तूच अनंत व सर्वज्ञानी आहेस. (ऋग्वेद २:३२:२)

३. हे ईश्वर! तुझे प्रत्येक वस्तुवर नियंत्रण आहे. (ऋग्वेद २:१६:१०)

**स्वर्ग आणि नरकाच्या बाबतीत ऋग्वेदात वर्णन आहे कि;**

१. पापी लोकांसाठी अत्यंत खोल दरी (नरक) आहे. (ऋग्वेद ४:५:५) (आचार्य सयान यांच्या मते अत्यंत खोल दरी म्हणजे नरक होय.)

२. शुद्ध किंवा निष्पाप लोकांसाठी स्वर्ग आहे. शुद्ध झाल्यानंतर जे (नवीन) शरीर प्राप्त होईल त्यात हाडे नसतील आणि ज्ञान प्राप्तीनंतर ते प्रकाशमयीन दुनियेत दाखल होतील. अग्नि त्यांच्या शरीराला भस्म करू शकणार नाही आणि त्यांना स्वर्गात अमाप समाधान मिळेल. (ऋग्वेद ४:३४:२)

३. तुमचे अनुयायी ईश्वराची प्रार्थना उदार अंतःकरणाने करतील व तुम्हाला स्वर्गात आनंद प्राप्त होईल. (ऋग्वेद १:१९:७)

४. आपल्या सत्यनिष्ठा आणि करूणामय स्वभावामुळे तुम्ही ते स्थान पाहणार जे अत्यंत विस्तृत स्थान आहे. (ऋग्वेद १:२१:६) (आचार्य सयान यांच्या मते अत्यंत विस्तृत स्थानाचा अर्थ स्वर्ग आहे.)

**आवागवन किंवा मरणोत्तर जीवन यांविषयी ऋग्वेदात आहे कि;**

१. जसा सैतान पुर्वीपासून आहे तसाच पुनर्जन्माचा विषय देखील पुर्वीपासून चालत आलेला आहे. पुनर्जन्मासारख्या चुकीची श्रद्धा ठेवणाऱ्या गुन्हेगार लोकांवर वर्चस्व ठेवा त्यांना दाबून (Supress) टाका. मृत्युची देवी आयुष्य कमी करत आहे. (म्हणजेच आवागवनावर फार पुर्वीपासून लोकांचा विश्वास आहे. परंतु हे चुकीचे आहे. हे थांबवा, त्वरा करा, आयुष्यातील वेळ संपत चालली आहे.) (मासिक पत्रिका कांती ९:७:१९६९, ऋग्वेद १:९२:१०)

२. ते कयामत किंवा प्रलयाच्या दिवसाला विसरून ज्ञान आणि बुद्धीस अवमानाने झिडकारून (Neglect as usless thing) आम्ही निश्चित केलेल्या मर्यादा (Boundry) ओलांडत आहेत. (ऋग्वेद १:४:३) (म्हणजेच अंतिम न्यायाच्या दिवसाचा तसेच मृत्युनंतरच्या जीवनाचा जे लोक अस्विकार करतात ते लोक अप्रत्यक्षपणे ईश्वराच्या आदेशाचे उल्लंघन करतात.)

३. आपल्या हृदयात गोड भाषा प्राप्त केल्यानंतर लोक आपल्यातील शंका मोजू लागतात. (याचा अर्थ असा कि ज्ञान प्राप्त केल्यानंतर अनेक व्यक्ति आपले गुन्हे मोजतात किंवा पाप होऊ नये याची काळजी घेतात) देवतांना नकार देणाऱ्या लोकांना सांगा, हे नक्की आहे कि तुम्हाला अमर जीवन प्राप्त होईल. (ऋग्वेद १-४४-६)

अशा प्रकारे हे सिद्ध होते कि पवित्र वेदामध्ये देखील एक ईश्वर, स्वर्ग, नरक, मरणोत्तरच्या जीवनाचा उल्लेख आहे.

हिंदु धर्माचे अनुयायी देखील वेदांना आदिज्ञान, श्रुतिज्ञान अथवा अपुरूषी मानतात. अपुरूषी म्हणजे ते कोणी पुरूषाने वा मानवाने लिहिलेले नाहीत. त्यामुळे आम्ही वेदांना ईश्वर व्दारा अवतरित केलेले ग्रंथ म्हणु शकतो.

परंतु वेदांत अशा प्रकारचे श्लोक देखील आहेत. जे ईश्वराचे श्रेष्ठत्व आणि त्याच्या तोडीचे नाहीत. ज्यांचा उल्लेख अन्य ईश्वरी ग्रंथात नाही आणि आजचा समाज ही अशा श्लोकांचा स्विकार करत नाही. उदा. “क्षुद्राला कधीही चांगला सल्ला देऊ नये.” (ऋग्वेद १४:५३:३)

सामान्यतः आपण वेदांना हिंदु धर्माचे ईश्वरी ग्रंथच म्हणु शकतो, परंतु ह्या ग्रंथात विशेष करून ते श्लोक ज्यांच्यात एक ईश्वर स्वर्ग, नरक, मरणोत्तर जीवन, प्रलय (कयामत) आणि सत्यकर्म करण्याचा उल्लेख आहे.

जे श्लोक आपल्याला ईश्वरी वाटत नाहीत त्या बाबतीत विव्दान असे म्हणतात कि वेद हे ऋषीमुनी

संप्रदायाच्या स्मरणशक्तित होते. म्हणुन ते लिहित असताना त्यांच्या गोंधळामुळे(Confusion) अस्वर्गीय मजकुर देखील पवित्र वेदांच्या मुळ पुस्तकांत मिसळला गेला.

(Ref. Griffth in his book "Hymns of Rig ved" Volume -1)

पवित्र वेद एक ज्ञानाचा सागर आहे ज्यामध्ये इतके सुंदर उपदेश आहेत कि, ह्यांना समजुन घेऊन अंमलात आणले तर जीवनात चांगले परिवर्तन घडू शकतात. चला तर या ह्या महान सागरातुन काही मोती आपण वेचून घेऊ.

१. (उदार चरितान्तु वसुधैव कुटुम्बकम)

हे माझे आहे आणि ते तुझे आहे अशा प्रकारची विचारसरणी तुच्छ लोकांची असते. 'हे विश्व माझे कुटुंब आहे' असा विचार फक्त थोर मनाचे लोक करतात.

२. सत्य मार्ग हा साधा आहे. (ऋग्वेद १३:३:८)

३. प्रत्येक श्वास हा जुगाऱ्यांना शाप देतो. त्याची पत्नी त्याचा त्याग करते व कोणीही जुगाऱ्याला एक पैसाहि देत नाही. (ऋग्वेद १०:३४:३)

४. हे जुगाऱ्यांनो! शेती करा आणि जुगार खेळणे बंद करा आणि शेतीमधून जे काही कमवाल त्यात समाधान माना. (ऋग्वेद १०:३४:१३)

५. दारू पिणारे मद्यपी त्यांच्या स्वतःवरचे नियंत्रण गमावून बसतात ते अशा गोष्टी करतात ज्यामुळे हे ईश्वर! तुम्हाला राग येतो. म्हणून तू सुद्धा अशा तऱ्हेच्या लोकांना मदत करत नाहीस. (ऋग्वेद ८:१:१४)

६. हे ईश्वर! जे लोक जास्तीत जास्त व्याज मिळवण्याच्या हेतूने दुसऱ्यांना कर्ज देतात त्या ऋण देणाऱ्याची सर्व भरभराट (वैभव) तू जप्त करतोस. (ऋग्वेद ०३:५३:१४)

७. (हे मानव प्राण्यांनो) तुमच्यापेक्षा मोठ्या असणाऱ्या व्यक्तिंचा आदर करा व चांगले विचार मनात आणा. आपापसात मतभेद करू नका, मैत्री करा व एकत्र रहा. चांगली कृत्ये करीतच माझ्याकडे या. मी तुमच्यामध्ये समजुतदारपणा, एकत्रित विचारसरणी उत्पन्न करीन. (ऋग्वेद १०:१९१:३)

८. ईश्वराने तुम्हाला स्त्री बनविले आहे. म्हणुन कोठेही काळजीपुर्वक पाहा व तुमची नजर खाली ठेवा आणि तुमची पावले एकत्रितपणे ठेवा आणि तुमचे शरीर कोणालाही दिसु नये असा पोषाख वापरा. (ऋग्वेद ०८:३३:१९)

९. मुलाने त्याच्या वडिलांशी सहकारी असले पाहिजे व आईशी आज्ञाधारक राहिले पाहिजे. (अथर्ववेद ०३:३०:०२)

१०. दानधर्म करणारे दानशुर लोक अमर होतात. त्यांना भिती व अश्रू ढाळणे माहित नसते. विनाशापासून त्यांना संरक्षण मिळते. दान केल्यामुळे हे दानशुर जगात यशस्वी होतात. त्याचप्रमाणे मृत्युनंतर स्वर्गप्राप्ती करतात. (अथर्ववेद १०:११७:०९)

११. हे मित्रांनो! परमेश्वराखेरीज तुम्ही अन्य कोणाचीही उपासना केली नाहीत तर तुमचे हिंसेपासून रक्षण होईल. (ऋग्वेद ०९:०१:०१)

१२. जे स्वतःच्या परिश्रमाने मिळविलेले अन्न फक्त एकटयानेच खातात. (दुसऱ्यांना दान न करता) तेव्हा ते वाईटमार्गाने मिळविलेले अन्न खाण्यासारखेच आहे. (ऋग्वेद १०:११७:०६)

१३. हे ईश्वर! आपण सदाचारी वर्तन करणाऱ्यांना चांगले फळ देता आणि हेच आपले वैशिष्टय आहे. (ऋग्वेद ०१:०१:०६)

१४. हे ईश्वर! हे विश्व तुझ्याच महान प्रभावामुळे

थरथर कापते. वाईट कर्म करणारे मानव तुझ्या कोपाला बळी पडून शिक्षा प्राप्त होतात. तर सदाचरणी मार्गाने चालणाऱ्यांची तुझ्या कृपाप्रसादाने स्तुती केली जाते.

(अथर्ववेद ०१:८०:११)

१५. ऋग्वेद सांगतो, हे विश्वास ठेवणाऱ्यांनो, ईश्वराशिवाय कोणाचीही भक्ति करू नका. (ऋग्वेद ०८:०१:०१)

१६. अथर्ववेद कथन करतो, ईश्वर एकच आहे. (अथर्ववेद १०:०९:२९)

१७. सर्वजण मनुची संतान आहेत. (ऋग्वेद ०१:४५:११)

१८. मानवाने सत्य मार्गावर नम्रपणे चालले पाहिजे. (ऋग्वेद १०:१३:०२)

१९. परिश्रम केल्याशिवाय देवतांनासुद्धा ईश्वरांशी मैत्री करता येत नाही. (परमेश्वराचा कृपाप्रसाद मिळवता येत नाही.) (ऋग्वेद ०४:३३:११)

२०. परमेश्वर हा मानवजातीला (तुम्हाला) सुमधुर विचार, सहनशक्ति व व्देषरहित भावना ह्यांच्याप्रमाणे वागून एकमेकांवर ज्याप्रमाणे गाय तिच्या वासरावर जसे प्रेम करते तसे प्रेम करण्याची सूचना देतो. (ऋग्वेद ०३:३०:०१)

२१. पत्नी ही पतीशी नेहमी मधुर वाणीने संभाषण करणारी असावी. (अथर्ववेद ०३:३०:०२)

# हिंदु धर्माचे पैगंबर कोण आहेत?

- **हजरत आदम (अ.स.) यांच्याबाबतः-**

भविष्य पुराणात म्हटले आहे कि, आदम आणि हव्वा-वती हयांना विष्णुंने ओल्या मातीतून निर्माण केले. ईश्वराने निर्माण केलेल्या प्रदान नगराच्या (स्वर्गाच्या) पूर्व दिशेला चार चौरस कोसाचे एक जंगल होते. (कोस हा किलोमीटर पेक्षा मोठा आहे) आपल्या पत्नीला पाहण्यासाठी उत्सुकतेने आदम हे पापीवृक्षाखाली गेले. कली (सैतान) हा त्यांच्याकडे सर्परूपात गेला व त्या धूर्त शत्रुने त्या दोघांची दिशाभुल केली. त्या विषवृक्षाचे फळ खाल्यानंतर आदम यांनी ईश्वराच्या नियमाचा भंग केला परिणामी त्यांना पृथ्वीवर पाठवुन देण्यात आले. आदम व हव्वावतींना पुष्कळ मुले होती. आदम यांचे वयोमान १३० वर्षे होते. (भविष्य पुराण)

ही गोष्ट कुराण आणि बायबल मध्येही लिखित स्वरूपात असल्याने आपण हे सांगु शकतो कि, हजरत आदम हे हिंदु धर्माचे देखील पैगंबर आहेत.

- **हजरत नुह (मनु) यांच्याबाबतः-**

मार्कण्डेय पुराण, भविष्य पुराण, मत्स्य पुराणात लिखित स्वरूपात आहे कि मनुच्या युगात एक महापूर (Flood) आला होता. ह्या महापुरात फक्त मनु आणि एक ईश्वराला स्विकारणारे लोक सोडून बाकि सर्व लोक ह्या महापुरात बुडून मरण पावले.

नूह (मनु) यांनी आपल्या हाताने एक होडी बनवली होती आणि त्यात ते स्वतः स्वार झाले आणि एक ईश्वराला स्विकारणाऱ्यांचा त्यात समावेश केला. तसेच प्रत्येक प्राण्यांच्या दोन-दोन जोड्या देखील त्या होडीत सामिल केल्या आणि हेच सर्व जिवंत राहिले बाकी संपूर्ण जग या महापुरात बुडून नष्ट झाले.

ह्या घटनेचे वर्णन कुराणांत ही लिहिलेले आहे. (पवित्र कुराण ११:२५:४८)

ह्या घटनेचे वर्णन बायबलमध्येही आहे. (जेनिसिस ६:८)

ह्या कारणामुळे आम्ही सांगू शकतो कि कुराणांत मनुला हजरत नूह म्हटले आहे. बायबल मध्ये ज्यांचे वर्णन पैगंबर 'नोह' म्हणुन आहे व भविष्य पुराणात त्यांचा उल्लेख नुह असा आहे. सर्व पवित्र धार्मिक ग्रंथात ज्यांचा उल्लेख आहे ती व्यक्ति म्हणजेच मनु आहेत आणि ह्यांनाच हिंदु धर्मातील अन्य ग्रंथात 'मनु' या नावाने संबाधित केलेले आहे.

A.J.A Dubois यांनी आपल्या पुस्तकात (Hindu Manners custom & Ceremonies) म्हटले आहे कि ज्या प्रकारे मुसलमान हजरत मुहम्मद (स. अ) यांचे अनुयायी आहेत. तसेच ईसाई हजरत ईसा यांचे अनुयायी आहेत. त्याच प्रमाणे हिंदु धर्मीय लोक देखील नुह (मनु) या पैगंबराचे अनुयायी आहेत.

आपली गोष्ट सिद्ध करण्यासाठी ते सांगतात प्रत्येक धर्माचे लोक पैगंबरांना आपले धर्मोपदेशक मानतात त्याचप्रमाणे त्यांनी स्पष्ट केलेल्या नियमांनादेखील मानतात. ईसाई बायबलला मानतात, मुस्लिम कुराण व हदीस शरीफला मानतात. (हदीसमध्ये हजरत मुहम्मद (स.अ) यांचे आदेश आणि त्यांच्या आदर्श जीवन जगण्याच्या पद्धतीचे वर्णन केलेले आहे.) त्याचप्रमाणे हिंदु धर्मात 'मनु स्मृती' हा धार्मिक नियमांचा ग्रंथ आहे व तो मनु द्वारा लिखित आहे.

आणि दुसरा पुरावा हा आहे कि, प्रत्येक धर्माचे अनुयायी ज्या पैगंबरांना मानतात ते त्या महत्वपुर्ण घटनांना देखील त्यांच्या काळ व वेळेपासुनच मोजतात. जसे ईसाई लोक आपल्या वर्षाची मोजणी त्यांच्या पैगंबर येशुख्रिस्ताच्या जन्माच्या दिवसापासून करतात. मुस्लिम आपल्या नववर्षाची मोजणी हजरत मोहम्मद पैगंबर साहेबांच्या (मक्केहुन) मदीनेकडे स्थलांतर करण्याच्या वर्षापासुन करतात. (ही घटना इस्लाम धर्माच्या इतिहासात महत्वाचा क्षण मानली जाते.) हिंदु धर्मात मनुच्या काळात आलेला महापुर ही महत्वाची घटना आहे. हिंदु धर्मात महत्वाच्या घटनांचा संदर्भ हा महापुरापासुनच मोजला जातो. उदा. देताना ते म्हणतात कि कलीयुगाची सुरूवात

महापुरानंतर झाली असे म्हटले जाते.

## हजरत इब्राहीम (अ.स.) यांच्याबाबतः-

“पुरूष मेधा आणि बकरी ईद” ह्या पाठात आपल्याला शिकवण मिळते कि हजरत इब्राहीम (अ.स.) हजरत इस्माईल (अ.स.) आणि हजरत इसहाक (अ.स.) यांचा उल्लेख अथर्ववेदांत देखील आहे म्हणुन ह्यांना हिंदु धर्माचे अनुयायी आपले पैगंबर म्हणु शकतात.

### एक स्पष्टीकरणः-

इस्लाम धर्मात पैगंबरांना ‘नबी’ असेही म्हणतात. तसेच हिंदु धर्माच्या ईश्वरी ग्रंथात पैगंबरांना मनु असे म्हणतात. हिंदु धर्माच्या ईश्वरी ग्रंथात १४ व्यक्तिंना मनु म्हटले आहे. त्यात हजरत आदम यांना देखील मनु म्हटले आहे.

सर्वजण मनुची संतान आहेत. (ऋग्वेद ०१:३१:०२)


हजरत आदम हे पहिले मनु आहेत त्यानंतर महापुराच्या काळातील मनु हे सातवे मनु आहेत. जगातील सर्व धर्मात एकाच महापुराचे वर्णन आहे आणि त्या महापुरात एकाच होडीचा संदर्भ आहे. ज्यामध्ये एक ईश्वराला मानणारे त्यांचे अनुयायी एका पैगंबरासोबत वाचले होते.

अशा प्रकारे ह्या महान भारत देशाचे महान लोक किंवा नागरिक इतर लोकांपेक्षा वेगळे असूच शकत नाही. इतर धर्माप्रमाणे ह्या धर्मात पण पैगंबर आहेत आणि त्यांचे धार्मिक ईश्वरी ग्रंथही आहेत. पण हे देखील इतकेच सत्य आहे कि स्वतः ह्या लोकांना ह्यांची ओळख नाही आणि ते दंतकथेत मग्न आहेत.

**"Hindu manners, customs and ceremonies"**
Written by: Abbe. J.A. Dubois
Publisher: Low Price Publications
B-2, Wardhaman Palace,
Nimri Commercial Centre, Ashok
Vihar, Phase-IV, Delhi - 110052



Expert trying to analyse the boat of Manu (Noah)



Analysing the boat impression



Analysing the boat.

# पुरूष-मेधा किंवा बकरी ईद

एका ईश्वरला लोक अनेक नावांनी संबोधित करतात. उदा. अल्लाह, मालिक, रहीम, रहमान, इत्यादि. वास्तवात ईश्वराची एकुण ९९ नावे आहेत. ह्यांच्यातील काही नावांचा उल्लेख त्याच्या विशेष गुणांसाठी होतो. उदा. 'खालिक' म्हणजे जन्म देणारा (ईश्वर) कारण ईश्वराशिवाय कोणीही या सृष्टीची निर्मिती करू शकत नाही. जन्म-मृत्यु ईश्वराच्या हाती आहे. 'मालिक' म्हणजे ईश्वरा शिवाय ह्या संसाराचा कोणी मालक नाही.

परंतु ईश्वराची काही नावे जी त्यांची स्वभाव विशेषणे(Features) दर्शवितात. उदा. 'रहीम' चा अर्थ होतो अत्याधिक दया करणारा तसेच 'गफूर' अर्थात क्षमा करणारा.

काही वेळा ईश्वर आपल्या गुणविषेश नावांनी आपल्या पैगंबरांनादेखील संबोधित करतात. ज्यांच्यात ते सर्व गुण आहेत. उदा. पवित्र कुराणांत हजरत मोहम्मद (स.) यांना 'रहीम' आणि 'गफूरच्या' नावांनी हाक मारतात. (पवित्र कुराण *१०:१२८*) कारण हजरत मोहम्मद (स.अ) खुप दयाळू आणि क्षमा करणारे होते.

अशा प्रकारे हिंदुच्या धार्मिक ग्रंथात ईश्वराने आपल्या बऱ्याच पैगंबरांना आपल्याच नावांनी संबोधित केले आहे. उदा. हरीवंशपुराण मध्ये उल्लेख आहे कि, ब्रम्हाने आपल्या शरीराचे दोन भाग केले एक भाग पुरूषाचा व दुसरा भाग स्त्रीचा झाला.

हिच गोष्ट हदिस आणि बायबल मध्ये देखील आहे कि ईश्वराने हजरत आदम (अ.स.) यांच्या शरीराच्या उलट बाजुने (Left side) हजरत हव्वाची निर्मिती केली आहे. म्हणुन हरिवंश पुराणात ज्यांना ब्रह्मा म्हटले आहे ते वास्तव्यांत स्वतः ईश्वर नाहीत तर हजरत आदम (अ.स.) आहेत.

याचप्रकारे अथर्ववेदामध्ये हजरत इब्राहीम (अ.स.) यांना ब्रह्मा म्हटले आहे आणि वर्णन केलेले आहे कि ब्रह्मा यांनी आपल्या मुलाचा अथर्वाचा बळी (कुर्बानी) दिला होता. हीच गोष्ट पवित्र कुराणांत देखील नमुद आहे कि हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी आपल्या मुलाचा हजरत इस्माईलचा (अ.स.) बळी दिला होता. (पवित्र कुराण *३७:१०५*) आणि याच प्रकारे पवित्र बायबलमध्ये हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी दिलेल्या बळीचे वर्णन आहे. (Genesis-22) तर अथर्ववेदांत ज्यांना ब्रम्हा म्हटले आहे ते स्वतः ईश्वर नाहीत तर हजरत इब्राहीम (अ.स.) आहेत.

आपणास हे वाचून खुप आश्चर्य वाटत असेल म्हणुन आम्ही ह्या प्रसंगी काही अधिक माहिती वर्णन करण्याचा प्रयत्न करीत आहोत. हजरत इब्राहीम (अ.स.) यांना सर्व धर्माचे अनुयायी हजरत आदम (अ.स.) आणि हजरत नूहच्या नंतर बऱ्याच पैगंबराचे पिता म्हणून खूप आदर करतात.

हजरत इब्राहीम (अ.स.) एका मुर्तिकाराचे सुपुत्र होते. लहानपणापासुनच ते एक ईश्वरास निरंकार मानत होते. एकदा जेव्हा गावातील सर्व लोक गावा बाहेर जत्रेसाठी गेले होते, त्या वेळी हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी सर्व देवी-देवतांच्या मुर्ती तोडून टाकल्या. ह्या घटनेने क्रोधित होऊन राजाने त्यांना कठोर दंड देण्याचा निश्चय केला. आणि एका विशाल अग्निकुंडात त्यांना फेकण्याची आज्ञा दिली, परंतु ईश्वराने आपल्या ह्या प्रामाणिक पैगंबराला अग्नित भस्म होण्यापासुन रक्षण केले आणि अग्निमुळे त्यांना काहीच नुकसान झाले नाही.

ह्या घटनेनंतर ते फिलिस्तीन शहरात स्थलांतर झाले आणि एक ईश्वराला मानुन त्यांने दर्शविलेल्या नियमांचे पालन करण्याचा लोकांना उपदेश करत राहिले. ९० वर्षाची आयु झाली असताना त्यांना ईश्वराद्वारे एका पुत्राची प्राप्ती झाली व त्या सुपुत्राचे नाव त्यांनी इस्माईल ठेवले.

जेव्हा हजरज इस्माईल (अ.स.) खुप लहान होते तेव्हा ईश्वराच्या आज्ञेनुसार हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी पत्नी हजरत हाजरा यांना मक्का शहरात नेऊन सोडले. जेव्हा हजरत ईस्माईल (अ.स.) थोडे मोठे झाले त्यावेळी त्यांचे पिता (हजरत इब्राहीम (अ.स.)

यांना एक स्वप्न पडले कि ते आपल्या अत्यंत प्रिय वस्तुची बळी ईश्वराच्या इच्छेसाठी देत आहेत. पैगंबरांची स्वप्ने कधीच खोटी ठरत नाहीत म्हणुन त्यांना ज्ञात झाले कि आपल्या प्रिय वस्तूचा बळी आपल्याला देण्याचा ईश्वरी आदेश आहे आणि त्यांची अतिप्रिय वस्तु म्हणजे त्यांचा पुत्र हजरत इस्माईल (अ.स.) होय.

हजरत इब्राहीमने (अ.स.) ने आपल्या स्वप्ना बाबत हजरत इस्माईल (पुत्राला) सांगितले व आपले पुत्राची इच्छा विचारली. हजरत इस्माईलने आपल्या वडीलांना उत्तर दिले, जी आज्ञा ईश्वराने आपणास दिलेली आहे ती पुर्ण करा आणि तुम्ही मला धैर्यवान व आज्ञाकारी पाहाल. (पवित्र कुराण ३७–१०२)

जेव्हा हजरत इब्राहीम (अ.स.) आपल्या सोबत हजरत ईस्माइल (अ.स.) यांना घेऊन मक्का शहराबाहेर मिना नामक दरीमध्ये जात होते तेव्हा सैतानाने तीन वेळा त्यांची दिशाभुल करण्याचा पुरेपुर प्रयत्न केला होता. तेव्हा तिन्ही वेळेस हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी सैतानास दगड मारून पळवले. मिना (दरीचे नाव) पोहचल्यानंतर हजरत इस्माईल (अ.स.) यांनी आपल्या वडीलांना सांगितले कि आपण माझे हात-पाय बांधून टाका नाही तर माझ्या तडफडण्यामुळे आपणास त्रास होईल. नंतर त्यांनी आपल्या प्रिय पुत्राचे हात-पाय बांधले आणि स्वतःच्या डोळ्यावर पट्टीही बांधली कारण त्यांना वाटत होते, पुत्र मोहामुळे त्यांच्या हाताचा थरकाप होऊ नये. नंतर त्यांनी हजरत इस्माईलच्या गळ्यावर सुरी चालवण्याचा खुप प्रयत्न केला परंतू ते अयशस्वी राहिले. कारण ईश्वराला फक्त पिता-पुत्राची ईश्वराप्रती भक्तीची परीक्षा घ्यायची होती, त्यांचे प्राण घ्यायचे नव्हते. म्हणुन ईश्वराच्या आदेशाने हजरत जिब्रील (अ.स.) यांनी स्वर्गातून एक मेंढा आणून हजरत इस्माईलच्या जागी ठेवला आणि अशा प्रकारे हजरत इस्माईल ऐवजी त्या मेंढ्यांचा बळी देण्यात आला.

ह्या संपूर्ण घटनेला अथर्ववेदात 'पुरूष मेधा' नावाने स्मरण केले जाते. ह्या छोट्याशा पुस्तकात आम्ही सर्व श्लोकांचा उल्लेख करू शकत नाही. त्यातील एक श्लोक आम्ही येथे देत आहोत. ह्या घटनेमध्ये हजरत इस्माईल (अ.स.) (अथर्वा) ने हजरत इब्राहीम (अ.स.) (ब्रह्मा) यांची जी गोष्ट स्विकार केली तो श्लोक पुढीलप्रमाणेः-

मूर्धानमस्य संसीव्याथर्वा हृदयंच यत।

मस्तिश्कादूर्ध्व पैश्यत् पावमानोधि शीर्शत।(अथर्ववेद १०.२.२६)

अर्थात अथर्वाने आपल्या वडीलांचे म्हणणे तन मनापासुन ऐकले आणि पवित्रता त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती.

अथर्ववेदामध्ये ज्यांचे ब्रह्माच्या नावाने स्मरण केले आहे ते हजरत इब्राहीम (अ.स.) आहेत. अथर्वाच्या नावांनी हजरत इस्माईल (अ.स.) ला संबोधित केले जाते. अंगिराच्या नावाने हजरत ईस्हाक (अ.स.) यांना स्मरण केले जाते. ज्या प्रकारे हे तीन पैगंबर ईसाई, यहुदी आणि मुसलमानांचे पैगंबर आहेत त्याच प्रमाणे हे तिन्ही पैगंबर हिंदु धर्माचे पैगंबर मानले जाऊ शकतात. 'पुरूष मेधा' अर्थात मनुष्याची बळी आहे. ह्यालाच आज मुस्लिम समाज इदुज़्ज़ुहा किंवा 'बकरी ईद' म्हणुन साजरा करतात.

ज्या ठिकाणी ही घटना घटली ते स्थान मिना (मक्का शहराजवळ) आहे. तेथे हाजी हजसाठी जातात आणि तिथे तीन दिवस तंबुमध्ये (Tent) राहुन ईश्वराची प्रार्थना करतात. ज्या ठिकाणी हजरत इब्राहीम (अ. स.) ने सैतानाला दगड मारले होते त्या ठिकाणी हाजी आजही सैतानाला कंकरी (छोटे दगड) मारतात.

अधिक माहितीसाठी ए. एच. विद्यार्थी यांच्या पुस्तकाचा Muhammed in Hindu Scripture (Adam Publication) अभ्यास करावा.



हज यात्री ह्या विशेष स्तंभाला छोटे दगड मारतात. (ह्या ठिकाणी सैतानाने हजरत इब्राहीम (अ.स.) यांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केले होते.)




मीना नामक दरी ज्याचे वर्णन अथर्ववेदात आहे आणि ह्याच ठिकाणी हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी इस्माईल किंवा अथर्वाचा बळी देण्याचा प्रयत्न केला होता. ह्याच स्थानांवर राहुन हज यात्री तीन दिवस प्रार्थना करतात.





# मक्का किंवा मक्तेश्वर?

सनातन धर्माच्या (हिंदु धर्म) धार्मिक पुस्तकांत मक्का शहर आणि काबा शरीफला निरनिराळ्या नावाने स्मरण केले जाते. त्यातील काही नावे पुढीलप्रमाणेः-

**१. इलास्पद :**

एल, एलिया, इला, इलाया, अल्लाह ही सर्व नावे वेगवेगळ्या धर्मात ईश्वरांला संबोधुन घेतली जातात. पद म्हणजे स्थान (Place). ईलास्पद म्हणजे ईश्वराचे स्थान.

**२. इलायास्पद :**

ह्यांचा अर्थ देखील ईश्वराचे स्थान आहे. पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांनी आपल्या हिंदी भाषांतरात याचा अनुवाद 'पृथ्वीवरील पवित्र स्थान' असा केला आहे.

**३. नाभा प्रथिव्या :**

नाभीचा अर्थ आहे नाभ (Centre/Naval) आणि प्रथिव्या म्हणजे धरती, नाभा प्रथिव्या म्हणजे धरतीची नाभी किंवा धरतीचे केंद्र (Centre of earth)

- इलायास्पद पढेवय नाभा प्रतिव्या अधि। (ऋग्वेद ३:२९:४)

याचा अर्थ असा होतो कि पृथ्वीवरील पवित्र स्थान म्हणजेच ईश्वराचे घर पृथ्वीच्या केंद्रस्थानी आहे.

**४. नाभि कमळ :**

परम पुराणात म्हटले आहे कि नाभीकमळ हे ते तीर्थस्थान आहे जेथुन सृष्टी निर्माण झाली.

हरीवंश पुराण (पंडित श्रीराम शर्मा आचार्य द्वारा भाषांतरीत पृष्ठ ४९९-५०२, भाग-२) मध्ये हिच गोष्ट स्पष्ट केली आहे आणि ह्याच गोष्टीचा उल्लेख 'हदीस शरीफ' मध्ये देखील आहे.

हजरत अब्दुल्लाह बिन उमर (रजी.) म्हणतात कि, हजरत मुहम्मद (स.) यांनी लोकांना सांगितले आहे कि, आकाश आणि पृथ्वीच्या निर्माण काळात पृथ्वीवर सर्वत्र पाणीच पाणी होते, त्या पाण्याच्या पृष्ठभागापासून (Surface) सर्वप्रथम काबाचे प्रगटीकरण झाले. नंतर धरती त्याच्या खालून चारी बाजुंनी सर्वत्र पसरत गेली. (महफिरते काबा पृष्ठ ५)

**५. आदिपुष्कर तीर्थ :**

पदम पुराणात म्हटले आहे कि, धरती वरील सर्वात प्राचीन आणि पवित्र व सर्वात लाभदायक तीर्थस्थान आदि पुष्कर तीर्थ आहे. पदम पुराणात ह्या पवित्र स्थानाच्या यात्रेचे महत्व ह्या शब्दात वर्णन केलेले आहे.

- जे लोक मनःपुर्वक आदि पुष्कर तीर्थला जाऊन प्रार्थना करतात त्यांचे सर्व पाप माफ होतात.
- जे आदि पुष्कर तीर्थाची यात्रा करतात ते अनंत पुण्याचे (Too Much Eternal Blessings) अधिकारी होतात.
- सर्व तीर्थात आदि पुष्कर तीर्थ प्राचीन तीर्थ स्थान आहे. आदि पुष्कर तीर्थस्थानला जाऊन स्नान केल्यामुळे मुक्ति मिळते.

(जमजम पाण्याची विहीर काबा शरीफ पासून ५० फुटाच्या अंतरावर आहे. नेहमी लक्षावधी लीटर पाणी सऊदी सरकार त्यातून घेत असते. ह्या पाण्याला हाजी पितात आणि आपल्या मायदेशी परतताना आपल्या बरोबरही आणतात.

**६. दारूकाबन :**

ऋग्वेदात लिहिलेले आहे कि "हे ईश्वराची प्रार्थना करणाऱ्यांनो! दूर देशात समुद्रतटाच्या जवळ जे दारूकाबन आहे ते मनुष्याने बनविलेले नाही. तिथे ईश्वराची प्रार्थना कर, ईश्वराच्या कृपेने तु स्वर्गात दाखल होशील." (ऋग्वेद १०:१५५:३)

(पवित्र काबाला सर्वप्रथम देवदुतांनी (फरीश्ते) बनविले होते. मक्का शहर भारत देशापासून लांब आणि समुद्र तटाच्याजवळ आहे.)

**७. मक्तेश्वर :**

Sir M.Monier willium यांच्या संस्कृत-इंग्लिश डिक्शनरिमध्ये मक्तेश्वरचा अर्थ आहे The city of makkah/yagya म्हणजे मक्का शहर/बळीचे स्थान.

मक्का मध्ये ईश्वराचे घर तर आहेच पण ह्या ठिकाणी हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी हजरत इस्माईलचा बळी देखील दिला होता. ही घटना अथर्ववेदात 'पुरूषमेधा' नावाने लिखित आहे आणि प्रत्येक वर्षी येथे हजच्या दिवशी लक्षावधी जनावरांचा बळी दिला जातो.

- आतापर्यंत आम्ही वेगवेगळ्या धार्मिक ग्रंथात मक्का शहर आणि पवित्र काबाला कोणत्या नावाने स्मरण केले जाते याची माहिती घेतली. आता अथर्ववेदात काबा शरीफच्या बाबतीत लिखित वर्णनांचा अभ्यास करूया.

अथर्ववेदात काबा शरीफची स्तुती आणि वर्णन अशाप्रकारे आहे.

- ऊर्ध्वो नु सृष्टा इस्तियँड नु सृष्टा सर्वादिश पुरूष आ वभुवाँ।
पूर या ब्रम्हणों वेद यस्याः पुरूष उच्यते।।
(अथर्ववेद १०.२.२८)

अर्थात जरी तेथील भिंती उंच व सरळ असतील किंवा नसतील परंतु ईश्वर तेथील प्रत्येक दिशेत दिसून येईल. जे ईश्वराची प्रार्थना करतात त्यांना हे माहित आहे.

काबा शरीफ घणाकृति (Cubical) वाटते परंतु ते (Perfect Cubical) नाही. येथील प्रत्येक भिंतींची मोजमापे भिन्न आहेत. परंतु येथे ईश्वराची अशी कृपा आहे कि बघणारे बघतच राहतात आणि तेथे बघण्यात खूप आनंदाचा अनुभव जाणवतो आणि लोकांच्या मनात ह्या पवित्र स्थानाच्या चारही बाजूने परिक्रमा करण्याचा मोह होतो व त्यात देखील आनंद व मनशांती लाभते.


- यो वै ता ब्रह्मणो वेदामृतेनावृता पुरम।
तस्मै ब्रह्मच ब्राम्हाश्च चक्षु प्राण प्रजा ददुः (अथर्ववेद १०.२.२९)

अर्थात जे ह्या ईश्वरीय स्थानाला ओळखतात (आणि तिथे जाऊन प्रार्थना करतात) त्यांच्यावर ईश्वराची कृपा होते. आणि हजरत इब्राहीम (अ.स) (ब्रह्मा) यांचा आशीर्वाद त्यांच्या बरोबर सदैव असतो. त्यांना ईश्वर ज्ञान, सद्‌बुद्धि, भरभराट आणि संतान प्राप्ती देतो.

अष्टाचक्रा नवद्वारा देवाना पूरयोध्या।
तस्या हिरशयः कोशः स्वर्गों ज्योतिषवृत
(अथर्ववेद १०.२.३२)

अर्थात देवदुतांचे राहण्याच्या ह्या स्थानी चारी बाजुंना आठ वर्तुळे (Circle) आहेत आणि नऊ दारे आहेत. ह्या पवित्र स्थानावर कोणीहि विजय प्राप्त करू शकत नाही. ह्यात अमरजीवन आहे आणि ह्याच्या सर्व बाजूंनी दिव्य ज्योती पसरत असते.

**Cross-section of holy Kaaba.**
Copied from: http://www.al-qiyamah.org




**(काबा शरीफची अंतर्गत मोजमापे)**

श्लोकात ज्यांचा उल्लेख वर्तुळ(Circle) असा आहे ते प्रत्यक्षात पर्वत आहेत. काबा शरीफच्या चारही बाजुंनी आठ पर्वत आहेत त्यांची नावे पुढीलप्रमाणेः

१. जबले खलीज २. जबले कीकान ३. जबले हिंदी ४. जबले लाला ५. जबले कादा ६. जबले अबु-हदीदा ७. जबले अबी-काबिस ८. जबले उमर

टिपः- अरबीमध्ये 'जबले' म्हणजे पर्वत होय.

काबा शरीफच्या सभोवतालच्या खोलीला नऊ दरवाजे होते त्यांची नावे ह्या प्रकारे आहेत.


१. काबे इब्राहीम २. बाबे अल-विदा ३. बाबे सफा ४. बाबे अली ५. बाबे अब्बास ६. बाबे नबी ७. बाबे सलाम ८. बाबे जियाद ९. बाबे हरम.

टिप:- अरबीमध्ये 'बाबे' म्हणजे दरवाजा होय.

काबा शरीफवर कोणीही विजय प्राप्त करू शकत नाही. एकदा ५३० ए. डी. मध्ये यमन देशाचा राजा अब्राहाने हत्तीची सेना घेऊन मक्का शहरावर आक्रमण केले. काबा शहर उद्धवस्त करायचा त्याचा उद्‌देश होता. जेव्हा तो काबा शरीफच्या जवळ आला, तेव्हा अबाबील नावाच्या छोटया छोटया चिमण्या आपल्या चोचेत छोटे दगड घेऊन त्या सर्व सैनिकांवर फेंकु लागल्या. ते छोटे दगड (small stones) सैनिकांना लागताच ते आपल्या हत्तीसोबत भुस्याप्रमाणे सडून गेले. अशा प्रकारे सर्व सेनेचा विनाश झाला. ह्या घटनेचे पुर्ण वर्णन आपल्याला कुराण शरीफच्या 'सूरहे फील १०५' मध्ये वाचायला मिळु शकते. म्हणुन या शहरावर विजय मिळवणे अशक्य आहे.

- तास्मिन हिरराये कोशेत्र यरे त्रिप्रतिष्ठते।
तास्मिन यद यक्षमसम्तन्वत तदवै ब्रह्माविदो विदु।
(अथर्ववेद १०.२.३२)

अर्थात प्रार्थना योग्य त्या ईश्वराच्या घरात तीन स्तंभ (Column) आणि तीन बीम (Beam) आहेत व हे ईश्वरी स्थान अमर जीवनाचे केंद्र आहे. सर्व अनुयायी जे ईश्वराची प्रार्थना करतात त्यांना सर्व माहित आहे.



*Cross-section of Kaaba*

वरील चित्र काबा शरीफच्या आतील भागाचे आहे. येथे आपणास तीन स्तंभ आणि आणि बिम (Beam) दिसतील. (इंटरनेटवर देखील www.youtube.com. वर काबा आणि त्याच्या आतील भागाचे दृश्य सुंदररित्या आपण पाहु शकतो.)

प्रभाजमानां हरिरीं यशसा संपरीवृताम।
पुरं हिररायर्यी ब्रह्मा विवेशापराजिताम।
(अथर्ववेद १०.२.३३)


अर्थात ब्रह्मा हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी ह्या पवित्र स्थानावर वास्तव्य केले. येथे ईश्वराची दिव्य ज्योति (नुर) सगळीकडे पसरत असते. येथे केलेली प्रार्थना लोकांना अमर करते.

## मक्का शहर अथवा काबा शरीफ धरतीचा केंद्र (Naval of Earth) कशा प्रकारे आहे.

इलायास्तवा वयं नाभा प्राथंव्या आधि
(ऋग्वेद ३:२९:४)

ऋग्वेदात उल्लेख आहे कि, ईश्वराचे घर धरतीच्या (नाभी) केंद्रावर आहे. ह्यामुळे आम्ही ह्या गोष्टीचा शोध लावतो कि धरतीचे केंद्र कुठे आहे? आणि हया वेळी त्या केंद्रावर काय आहे?

Equator o° Latitude आहे. म्हणजे Horizonal plane किंवा Direction मध्ये हे पृथ्वीच्या मध्य स्थानी आहे. परंतु धरतीचे ते स्थान जेथे मानवांची वस्ती आहे ते Equator पासून 80° latitude उत्तर आणि 40° दक्षिणेच्या मध्यभागी आहे. म्हणजे Equator धरतीच्या मध्यातुन तर pass करतो परंतु धरतीच्या त्या स्थानी जिथे मनुष्याची वसाहत



आहे तेथील मध्यातुन pass होत नाही. जर आम्हाला मनुष्याने वसलेल्या धरतीच्या मध्यस्थानातुन pass व्हायचं असेल तर अंदाजे 20° Latitude उत्तरेच्या बाजुनी झुकावे लागेल.

ह्याच प्रकारे ०° Longitude ग्रीन वीच (एक शहर) pass करतो परंतु येथे देखील मनुष्यनिर्मित वस्तीच्या Vertical direction मध्यातुन pass होत नाही. जर आम्हाला Vertical direction मध्ये माणसाच्या वस्तीच्या मध्यातून pass करायचा असेल तर अंदाजे 40° पूर्वेच्या दिशेला सरकावे लागेल.

म्हणजे ज्या धरतीवर लोकांची वसाहत आहे त्याचा केंद्र अदांजे 20° Latitude and 40° Longitude वर आहे. आम्ही जेव्हा धरतीच्या नकाशाचा अभ्यास केला आणि ह्या ठिकाणी कोणते शहर आहे याचा शोध घेतला तर ह्या ठिकाणी आम्हाला मक्का शहराची प्राप्ती होते.

मक्का शहर 21° Latitude and 39° Longitude वर आहे.


ऋग्वेदात उल्लेख आहे कि धरतीच्या केंद्रस्थानी ईश्वराचे निवासस्थान आहे. तर मक्का शहरच धरतीच्या केंद्रस्थानी आहे आणि काबा शरीफ हे ईश्वराचे घर आहे.

ऋग्वेदात नमुद आहे कि,

“हे ईश्वराची प्रार्थना करणाऱ्या लोकांनो! दूर देशात समुद्र काठावर द्वारकाबन आहे. ज्याचे निर्माण कोणत्याही मनुष्याद्वारे झालेले नाही. तेथे प्रार्थना करून ईश्वराचा आशिर्वाद घेऊन स्वर्गात प्रवेश करा.” (ऋग्वेद १०:१५५:३)

(ह्या श्लोकात पवित्र काबाला दारूकाबन म्हणुन संबोधिले आहे. आणि काबा शहर समुद्रकिनाऱ्यापासून ४० कि.मी अंतरावर आहे.)

जर आपली इच्छा स्वर्गात जाण्याची आहे तर ईश्वराच्या शहरात व घरी जाऊन अवश्य प्रार्थना करायला हवी.




### एक चुकीची धारणाः-

मुसलमान काबा शरीफला पुजतात?

नाही! मुसलमान काबा शरीफला पुजत नाहीत.

काबा शरीफ एक पवित्र घराप्रमाणे आहे. ज्याला ‘काबातुल्लाह’ म्हणजे ‘ईश्वराचे घर’ म्हटले जाते. अजुनही सर्व मुस्लिम धर्माचे अनुयायी येथे जाऊन नमाज पढतात. हे स्थान आतून एकदम मोकळे आहे. ह्याच्या आत काहीच नाही. काबा शरीफचा आतील भाग आपण www.youtube.com वर पाहू शकतो. येथील छतावर जाऊन हजरत बिलाल यांनी अजान (नमाजसाठी लोकांना बोलावणे) दिली होती. मुसलमान जर काबा शरीफला ईश्वर मानतील तर त्याच्या छतावर उभे राहून अजान कशी देतील? ह्यामुळे हे सिद्ध होते कि काबा शरीफची पूजा मुसलमान करत नाही. परंतु एका अत्यंत पवित्र स्थानाप्रमाणे त्याचा आदर सन्मान करतात.

येथे काबा शरीफची केवळ परिक्रमा केली जाते ज्याला तवाफ म्हणतात. फार पुर्वी नमाज फिलिस्तीनमधील एक शहर जेरूसल्लमच्या एका मशीदी (‘मस्जिद-ए-अक्सा’) समोर चेहरा करून केली जात होती. जवळ जवळ ६२४ A.D च्या नंतर पवित्र कुराणच्या आदेशानुसार नमाज काबा शरीफच्या समोर चेहरा करून केली जाऊ लागली (पवित्र कुराण २:१४४). प्रथम काबा शरीफची निर्मीती देवदुतांनी (फरीश्ते) केली होती. त्या नंतर हजरत नुह (मनु) च्या युगात महापुरात हे कोसळले होते. नंतर हजरत इब्राहीम (अ.स.) (अथर्ववेदानुसार ज्यांना ब्रह्मा म्हटले आहे) त्यांनी

त्या स्थानावर त्याची पुःनर्निमिती केली. त्या नंतर बऱ्याच वेळा त्याची दुरूस्ती (Reparing) करण्यात आली. भविष्यात कदाचित भूकंपामध्ये जरी ह्या पवित्र स्थानाचे नुकसान झाले तरी ईस्लाम धर्म काही संपणार नाही. ईश्वर नेहमी होता, आहे आणि नेहमी कायम राहील. हे सत्य आहे आणि मुसलमान फक्त एक निरंकार ईश्वराची भक्ति करतात आणि त्याच्या द्वारा पाठवली गेलेली ईश-वाणी जी कुराणच्या स्वरूपात संग्रहित आहे तिचे अनुकरण करत आहेत.

**शिवलिंगः– Symbol of God :**

शिवचा अर्थ ईश्वर! लिंगचा अर्थ चिन्ह (Symbol) होतो, अशा प्रकारे शिव-लिंगचा अर्थ शिवाचे चिन्ह किंवा ईश्वराची निशाणी (Symbol of God) आहे.

काबाच्या पूर्व दिशेच्या भिंतीत एक काळ्या रंगाचा दगड स्थापित आहे. हा दगड देवदुतांनी (फरिश्तें) स्वर्गातून आणुन काबा शरीफच्या भिंतीत स्थापन केला होता. ह्या दगडाला 'हिज्र-ए-अस्वद' म्हणतात. 'हिज्र' म्हणजे दगड व 'अस्वद' म्हणजे काळा, हिज्र-अस्वदचा अर्थ आहे काळा-दगड.

काबा शरीफच्या चारी बाजूंनी प्रदक्षिणा (तवाफ) ह्याच दगडाच्या चिन्हापासुन सुरू केली जाते आणि येथे परत आल्यानंतर ही प्रदक्षिणा पूर्ण होते.

"ह्या दगडात कोणाचेही चांगले-वाईट करण्याची शक्ति नाही. फक्त आदर सन्मानांनी ह्या दगडाला लोक चुंबन देतात. (कौलः हजरत उमर)

हा दगड स्वर्गातून आणलेला आहे म्हणून अनुयायी ह्या दगडाला ईश्वरी चिन्ह God symbol मानून ह्याचा आदर करतात.

काही विद्वान ह्या काळ्या दगडाला शिवलिंग म्हणतात. (पुस्तक 'अब भी जागे तो...' लेखक : शम्स नवेद उस्मानी)

# आम्ही कोणा कोणाला पुजायचे?

- भारत देशात हजारों 'दर्गाह' आहेत आणि उरूस किंवा जत्रेवेळी लाखो लोक दरगाहचे दर्शन घेण्यासाठी येतात. परंतु इस्लाम धर्म या गोष्टींची शिकवण देत नाही. ही फक्त लोकांची श्रद्धा आणि या देशाची परंपरा आहे. पण श्रद्धा आणि परंपरेने धर्म बदलत नसतो. जे चुक आहे ते शेवटपर्यंत चुकच राहणार.

हजरत मोहम्मद (स.) यांनी पक्कि मजार किंवा कबर बनवण्यास मनाई केली आहे आणि कोणाच्या ही कबरेवर स्मारक किंवा खोली निर्माण करण्यास मनाई केली आहे.

(Muslim maruful Hadees, Vol-3, Page - 486)

स्वतः हजरत मोहम्मद (स.) यांची कबर शरीफ देखील कच्ची आहे, म्हणजे विटा किंवा दगडांचा उपयोग करून पक्के बांधकाम केलेले नाही. आणि त्यांच्या मजारवर गुम्बंद पण नाही. हजरत मोहम्मद (स.) यांची कबर शरीफच्या भोवतालच्या खोलीला चारी दिशांना दारे, खिडक्या नाहीत. फक्त चार भिंती आहेत. Flat छत नेहमी कोसळून जायचे म्हणुन दगडाच्या भिंतीवर गोल छत आहे. ही एक साधी खोली आहे जी फक्त दगडाने बनवली गेली आहे. ही संपुर्ण खोली मशीदच्या आत आहे आणि मशीदीचे छत जे कबर शरीफच्या खोलीच्या वरील बाजुला आहे त्याच्यावर गुम्बद आहे.*

आणि कबर शरीफच्या चारी दिशांमध्ये विना खिडकी दाराची खोली ह्या कारण उभी करण्यात आली कि, यहुदी लोकांनी अनेक वेळा कबर शरीफला हानी पोहचवण्याचा प्रयत्न केला होता.

हजरत मोहम्मद (स.) यांच्या कबर शरीफच्या सभोवतालची खोली ७०० वर्षांपासून बंद आहे.

म्हणुनच फक्त हजरत मोहम्मद (स.) यांच्या कबर शरीफच्या भोवतालच्या खोली आणि त्यावरील गुम्बद व्यतिरिक्त जे तुर्किने आपल्या राज्यात निर्माण केले होते, सऊदी अरबमध्ये आपल्याला कोणती ही पक्की मजार आणि त्यांच्यासभोवताली स्मारक किंवा गुम्बद कधीच दिसणार नाही.

तर जे ईस्लाम धर्मात नाही ते जर हिंदुस्तानचे लक्षावधी मुसलमान करू लागले तरी ते योग्य होऊ शकणार नाही ते चुक चुक आणि चुकच असणार.

- एखाद्या हिंदु बांधवांस धन पाहिजे असेल तर तो लक्ष्मी देवीची पूजा करतो. बुद्धी पाहिजे तर गणेशजींची पुजा करतो. भावनिक समस्येचे (Spritual Problem) निवारण करण्यासाठी किंवा शनीच्या समस्येसाठी हनुमान यांची पुजा केली जाते.

- तर आता आपण हिंदु धर्माच्या ग्रंथातील काही श्लोकांचा अभ्यास करूया आणि पाहूया कि त्यामध्ये मुर्तीपुजेबाबत काही लिहिलेले आहे कि हे सर्व आपण आपल्या मनाने करत आहोत. म्हणजे हिंदु धर्म ग्रंथात मूर्ति पूजेची शिकवण आहे कि ही फक्त एक परंपरा आहे.

- हिंदु धर्माच्या कोणत्याही अस्सल (Authentic) ग्रंथात मुर्ति पूजाची शिकवण नाही याउलट असे करण्यास मनाई केली आहे. उदा. काही श्लोक खालीलप्रमाणे आहेत.

१. ईश्वर न लाकडात आहे ना दगडात ना मातीच्या मुर्तित. तो फक्त जाणीव किंवा संवेदनेत (Feelings) आहे. तो आपल्या जाणीवेत (Feelings) उपस्थित आहे. त्याची जाणीव होणे हीच त्याच्या उपस्थितीला (Existence) सिद्ध (Proof) करते. (गरूड पुराण धर्मकान्ड परेत खन्ड ३८:१३)

२. माती, दगड इत्यादिंची मूर्ति ईश्वर होत नाही. (श्रीमद भगवत महापुराण ११:८४:१०)

* "Masjide Nabvi Shareef"
By Dr. Mohammad Ilyas Abdul Gani. Address: 447 Madina Munawwarah K.S.A
Published by: Fahrasat Maktaba Al-Malik Fahadul Wataniya Asna-en-Nashar)

३. माझ्या गुणांना (Features) न ओळखणारे मुर्ख लोक मला शरीररूपी समजून माझा अपमान करतात. (गीता ९:११)

४. सर्वच जीव माझ्यात राहत नाही. माझी सृष्टी आहे कि मी सर्व प्राण्यांना जन्म दिले आणि त्यांचे पालनपोषन करतो. तरी मी त्यांच्यात राहत नाही. (गीता ९:५)

५. ईश्वर प्रत्येक ठिकाणी राहणारा प्रकाश (Light) आहे.

६. ईश्वर कोणतीहि मूर्ति नाही फक्त त्यांचे नावच इतके महान आहे. (यर्जुवेद ३:३२)

७. ते लोक खोल अंधकारात बुडुन जातात जे असमभूति (Material in basic form) उदा. अग्नी, पाणी इत्यादिंची पूजा करतात. ते लोक ह्यांच्याही पेक्षा घोर काळोखात बुडतात जे समभुतीने झालेल्या वस्तुंची पूजा करतात. (उदा. मुर्ति आदि) (यजुर्ववेद अध्याय ३२:३)

८. पवित्र वेद हिंदु धर्माचे सर्वात विश्वसनीय (Authentic) ग्रंथ आहेत. चारी वेदांमध्ये मुर्ति पुजेस सक्त मनाई केली आहे.

९. पवित्र वेदांच्या नंतर उपनिषद विश्वसनीय (Authentic) ग्रंथ मानले गेले आहेत. एकण १०९ उपनिषदे आहेत त्यातील दहा उपनिषदला सर्व आचार्य आणि विद्वान मानतात. त्यांची नावे ह्या प्रकारे आहेत.

ऐश, केंसुप, कठ, प्रशन, मंडक, मांडोक्या, एत्रेया, तेत्रया, छांदोग्या, आणि बृहद आर्डिक हे सर्व मुर्ति पुजेस मनाई करतात.

१०.वेद आणि उपनिषद प्राचीन ग्रंथ आहेत. पुराण ऋषींनी लिहिलेले आहे. आणि ते प्राचीनही नाही. काही पुराणात मुर्ति पूजा करा असेही लिहिले आहे.

"ऋषिंनी मुर्ति पूजाची परंपरा (Tradition) आरंभ केली कारण ते त्या मुर्तिला आपल्या समोर ठेऊन निरंकार ईश्वरची कल्पना करू शकतील."

(विष्णू पृष्ठ क्र. १४९ विवेकानंद साहित्य आदोहोत आश्रम, पथ्थोरा गढ, दुसरी आवृत्ती १९७३)

११. परंतु पवित्र गीताच्या ह्या श्लोकाद्वारे ईश्वरावर ध्यान लावण्यासाठी (Concentrations) मुर्तिची गरज नाही.

प्रार्थना करणाऱ्या लोकांनी आपले शरीर, मान, आणि डोक्याच्या भागाला एका सरळ दिशेत केले पाहिजे आणि आपल्या नाकाच्या टोकावर (Tip of Nose) लक्ष केंद्रित करून ईश्वराचे ध्यान करा.इतर कोणत्याही दिशेत त्यांचे लक्ष वेधता कामा नये. (गीता ६:१३)

वास्तवात मुर्ति पुजेची शिक्षा हिंदु धर्मात नाही. जे असे करतात त्यांना कदाचित धर्माबाबत ज्ञान नसेल.

## देवी देवता किंवा वली-अल्लाह किंवा महापुरूष कोण आहेत?

- ऋग्वेदात लिहिलेले आहे कि,
  यो देवृष्वधी देव एक आसीत् (ऋग्वेद १०:१२:८)
  अर्थात सर्व देवतांचा एक ईश्वर आहे.
- पवित्र कुराणमध्यें लिहिलेले आहे कि,
  "अल्लाह व्यतिरिक्त ज्यांचा तुम्ही धावा करता ते कोणताही त्रास तुमच्यापासून दूरही करू शकत नाहीत अथवा बदलूदेखील शकत नाहीत. ज्यांचा धावा हे लोक करतात ते तर स्वतःच आपल्या पालनकर्त्याच्या ठायी पोहचण्यासाठी वशिला शोधत आहेत की कोण त्यांच्या अधिक जवळचा होतो आणि ते त्याच्या कृपेचे इच्छुक आणि त्याच्या प्रकोपापासून भयभीत आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की तुझ्या पालनकर्त्याचा प्रकोप आहेच भीती धरण्यालायक."
  (पवित्र कुराण १७:५७)
- यजुर्वेदात लिखित आहे,

न ऋते श्रान्तस्य स्वरूपाय देग (यजुर्वेद ३३:११)

अर्थात परिश्रम केल्याशिवाय देवतांना देखील ईश्वराची कृपा मिळत नाही.

म्हणुन देवी, देवता, किंवा कोणते ही पैगंबर अथवा वली-अल्लाह, महापुरूष स्वतः ईश्वर नाहीत आणि ते स्वतःचे किंवा इतर लोकांचे भले करू शकत नाहीत. ते पण एका ईश्वराची प्रार्थना करतात आणि आपल्या एक ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी परिश्रम करतात.

## अवतार ईश्वर का नाही?

यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत
अद्‌भुतथामाय अधर्मस्य तदात्मयम सृजा नम्यहम्
(गीता)

ह्या श्लोकात लिखित आहे कि जेव्हा-जेव्हा पृथ्वीवर अधर्माचा प्रसार होईल तेव्हा ह्या अधर्माचा विनाश करण्यासाठी मी (ईश्वर) जन्म घेणार. हे उदगार श्रीकृष्णाने सांगितले होते. तर श्रीकृष्ण ईश्वर का नाही?

- पवित्र कुरआन (९:१२९) मध्ये हजरत मुहम्मद (स.) यांना रऊफ आणि रहीम म्हटले आहे. परंतु ही दोन्ही नावे ईश्वराचीच आहेत. ज्यांना कुराणातील साहित्याचे (Literature) ज्ञान नाही ते लोक हेच समजणार कि मोहम्मद (स.) स्वतः ईश्वर आहेत. (ईश्वर अशा विधानावर आम्हाला क्षमा कर. )
- ह्याच प्रकारे हदीस शरीफमध्ये वर्णन आहे कि, ईश्वर असे म्हणतात "जेव्हा कोणी व्यक्ति माझ्या आदेशाचे पालन करतो आणि माझी खुप प्रार्थना करतो तेव्हा मी स्वतः त्याचे हात, पाय आणि डोळे बनून जातो." (जमा-अल-फवाईद)

ईश्वर 'निरंकार' आहे, कधीही कोणीही वली किंवा महापुरूषांना 'निरंकार' होताना पाहिलेले नाही.

- एक हदीस शरीफचा उल्लेख आहे कि प्रलयाच्या (कयामत) दिवशी ईश्वर एका व्यक्तिला विचारणार "मी तहानलेला होतो, मी भुकेला होतो, आजारी होतो. तेव्हा तु मला पाणी नाही दिलेस, मला जेवण दिले नाहीस किंवा माझी सेवा केली नाहीस" यावर ती व्यक्ति विचारेल "हे ईश्वर आपण सर्वांना अन्न, पाणी पुरविता तर तुम्ही तहानलेले, उपाशी किंवा आजारी कसे असु शकता?" यावर ईश्वर उत्तर देईल "माझा तो भक्त उपाशी होता, तहानलेला, आजारी होता जर तु त्याची सेवा केली असतीस तर मी तुला त्यांच्याजवळ भेटलो असतो." (मुस्लिम, तर्जुमाने हदीस नं २४५)
- मंदिर आणि मशीदच्या दारांवर हजारों लोक उपाशी, तहानलेले व आजारी पडून राहतात. आपण त्यांची सेवा करा आणि नंतर त्यांच्याजवळ कोणत्याही व्यक्तिच्या रूपात ईश्वराला शोधाल तर काय ईश्वर आपल्याला मिळेल?
- जेव्हा एखादा मुलगा परीक्षेत चांगल्या गुणांनी पास होतो तेव्हा त्याचे वडील गर्वाने म्हणतात कि "हा माझा मुलगा आहे". तर त्या पित्याचा आपल्या दुसऱ्या मुलाबद्दल काय विचार आहे जो नापास झाला तो काय शेजाऱ्याचा होता? (क्षमस्व)
- जे लोक भाषेचे साहित्य Literature of language ओळखतात. ते ह्या वाक्याबद्दल "हा माझा पुत्र आहे" त्यांचे वंशाबाबत न घेता गुणांचा अर्थ घेतील. म्हणजेच वडीलांना असे म्हणायचे असते कि माझा हा मुलगा माझ्याप्रमाणेच हुशार आहे.

त्याच प्रकारे ज्यांना पवित्र कुराणाच्या साहित्याचे ज्ञान आहे. ते पवित्र कुराणात हजरत मोहम्मद (स.) यांना रऊफ किंवा रहिम म्हणुन संबोधन केल्यामुळे हजरत मोहम्मद (स.) यांना ईश्वर नाही तर रऊफ अर्थात क्षमा करणारा आणि रहिम म्हणजे दयाळु असेच समजणार.

ह्याच प्रकारे जेव्हा ईश्वर म्हणतो कि, मी महापुरूष (वली) चे हात, पाय, डोळे बनतो. त्याचा अर्थ असा आहे कि, ते महापुरूष आपल्या हात, पाय, डोळ्यांचा उपयोग त्याच प्रमाणे करणार जशी माझी (ईश्वराची) ईच्छा असेल.

जेव्हा ईश्वर म्हणतो कि, एखाद्या उपाशी, पाण्याने व्याकुळ, आजारी किंवा रोगी व्यक्तिची तु सेवा केली असतीस तर त्यांच्यापाशी मी तुम्हाला भेटलो असतो. म्हणजेच त्या लोकांची सेवा करून तु मला प्रसन्न केले असतेस आणि तुझ्यावर माझी कृपा दृष्टी झाली असती.

तसेच पवित्र गीतेच्या श्लोकात उल्लेख आहे कि अधर्माचा नाश करण्यासाठी मी (ईश्वर) जन्म घेणार. (ह्याचा अर्थ असा नाही कि ईश्वर स्वतः येणार) अर्थात जे पैगंबर (किंवा महापुरूष) ज्यांना मी (ईश्वर) पाठवणार ते माझे प्रतिनीधी (Representative) असतील आणि माझ्या आदेशानुसार माझ्या धर्माची

स्थापणा करतील.

अतः हेच मत हिंदु धर्मातील विद्वानांचेही आहे. उदा. स्वामी विवेकानंद, गुरूनानक जी आणि हिंदु धर्माचे महान विद्वान पंडित सुन्दरलाल, श्री. बलराम सिंग परिहार, डॉ. वेद प्रकाश उपाध्याय, डॉ. पी.एच. चौबे, डॉ. रमेश प्रसाद गर्ग, पंडित दुर्गा शंकर सत्यार्थी, श्री. केशरी लाल भगत, (हजरत मोहम्मद और भारतीय धर्मग्रंथ डॉ. एम. ए. श्रीवास्तव.)

चौदा वर्षाच्या वनवासात जेव्हा श्री हनुमानाने श्रीराम यांना विचारले कि मी ईश्वराची प्रार्थना कशी करू? तेव्हा श्रीराम यांनी असे उत्तर नाही दिले कि तुम्ही स्वतः ईश्वर आहात कारण भविष्य काळात लोक तुम्हाला पूजतील. त्यांनी हे देखील नाही सांगितले कि तुम्ही माझी प्रार्थना करा मी सुद्धा ईश्वर आहे परंतु त्यांनी हे सांगितले.

प्रथम ताराक चयवादितिय दंड मुच्यते तीतय कुंडला
कारम चतुर्थ अव्दे चंन्द्रक पंच बिन्दु संयुक्त
ओउम मित्यज्योति रूपका (श्री राम तत्वामृत)

अर्थातः- प्रथम सरळ उभे राहा, नंतर दंडवत (सजदा) करा, पुन्हा सरळ बसा नंतर अर्ध चंद्राप्रमाणे समोरच्या बाजूला वाका, नंतर पुन्हा सरळ बसा आणि ईश्वराचे स्मरण करा व चिंतनात ध्यान लावा.

म्हणजे एक निरंकार ईश्वराची प्रार्थना करा. तो ईश्वर महान आहे, निरंकार आहे, त्याची कोणतीही प्रतिमा नाही. त्याने सर्वांना जन्माला आणले व तोच एक दिवस सर्वांना मृत्यु देणार. ह्या संसाराचा चालक देखील ईश्वरच आहे. प्रत्येक प्राणीमात्राचे पालनपोषण त्याच्याच द्वारे होत असते. ईश्वराशिवाय कोणीही प्रार्थना योग्य नाही.

ईश्वराच्या व्यतिरिक्त ज्यांना पुजले जाते ते ईश्वर नाहीत. ते फरिश्ते (देवदूत), जिन्न, महापुरूष, पैगंबर, वली अल्लाह आदि असु शकतात.

जर आपल्याला मुक्ति पाहिजे असेल तर केवळ एक ईश्वरालाच पुजायचे ह्या शिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही.

# पवित्र कुराणामध्ये हिंदु धर्माचा उल्लेख

- कुराणांत हिंदु धर्माबाबत काही लिखित माहिती आहे का?
- होय. लिखित आहे.
- पहिली गोष्ट तर ही आहे कि, ईस्लाम धर्म काही नवीन धर्म नाही. पवित्र कुराणामध्ये लिखित आहे कि,
- मुसलमानानों म्हणा कि "आम्ही श्रद्धा ठेवली (आम्ही सत्य मानले) अल्लाहवर आणि त्या मार्गदर्शनावर जे आमच्याकडे अवतरले आणि जे इब्राहीम, इस्माईल, इसहाक, याकूबच्या संततीकडे अवतरले आणि जे मूसा, ईसा आणि दुसऱ्या सर्व प्रेषितांना त्यांच्या पालनकर्त्याकडून दिले गेले. आम्ही त्यांच्यात कोणातही भेदभाव करीत नाही. आणि आम्ही अल्लाहलाच समर्पित झालो आहोत."

  (पवित्र कुराण २:१३६)
- त्याने तुमच्यासाठी धर्माची तीच पद्धत निश्चित केली आहे जिची आज्ञा त्याने नूह (मनु) (अ.) ला दिली होती आणि जिला (हे मुहम्मद (स.) आता तुमच्याकडे आम्ही दिव्यज्ञान पाठविले आहे, आणि ज्याचा आदेश इब्राहीम (अ.) आणि मूसा (अ.) यांना दिलेला आहे, या ताकीदसह की प्रस्थापित करा या धर्माला आणि यात फाटाफूट होऊ देऊ नका. (पवित्र कुराण ४२:१३)
- हे पैगंबर (स.) आम्ही तुमच्याकडे हा ग्रंथ पाठविला जो सत्य घेऊन आला आहे आणि अलकिताब (पूर्वकालीन ईश्वरीय ग्रंथ) पैकी जे काही त्याच्यासमोर उपलब्ध आहे त्यातील सत्य प्रमाणित करणारा व त्याचा संरक्षक व त्याची निगा राखणारा आहे म्हणुन तुम्ही अल्लाहने अवतरीत केलेल्या कायद्यानुसारच लोकांच्या मामल्यांचा न्यायनिवाडा करा आणि जे सत्य तुमच्यापाशी आले आहे त्यापासुन पराङःमुख होऊन त्यांच्या इच्छेचे अनुकरण करू नका-आम्ही तुम्हा (मानवा) पैकी प्रत्येकासाठी एकच शरीअत (जीवनाचा कायदा) व एकच कार्यप्रणाली निश्चित केली. जर तुमच्या ईश्वरान इच्छिले असते तर तुम्हा सर्वांना एकच लोकसमूह (उम्मत) बनवू शकत होता. परंतु त्याने हे यासाठी केले की जे काही त्याने तुम्हा लोकांना दिले आहे त्यात तुमची परीक्षा घ्यावी. म्हणून चांगुलपणात एक दुसऱ्यापेक्षा सरस ठरण्याचा प्रयत्न करा सरतेशेवटी तुम्हा सर्वांना अल्लाहकडेच परत जावयाचे आहे, मग तो तुम्हाला सत्यःस्थिती दाखवून देईल ज्यामध्ये तुम्ही मतभेद करीत राहिला आहात. (पवित्र कुराण ५:४८)
- वरील तीन्ही श्लोकांतुन हे सिध्द होते कि, ईस्लाम नवीन धर्म नाही. हाच धर्म पुर्वी हजरत नुह (मनु) चा होता हाच धर्म हजरत इसा आणि मुसा यांचा होता. किंवा असेही म्हणता येईल प्रत्येक पैगंबराने हाच धर्म आपल्या अनुयायांना शिकवला होता. त्यांच्या पश्चात त्यांचे अनुयायी बदलुन गेले. त्यांनी एक ईश्वरास न मानता अनेक महापुरूषांना एक ईश्वराबरोबर मानायला सुरूवात केली आणि ह्या काळी मुसलमानांचे काही गट (समुदाय) एक ईश्वराबरोबर पुष्कळ बाबा आणि पैगंबरांना अल्लाह प्रमाणे महत्व देतात. हे सर्व चूक आहे. प्रत्येक युगात ह्याच कारणामुळे धर्म बदलले आणि आता देखील बदलत आहेत. आणि ह्याच कारणामुळे वेळोवेळी पृथ्वीवर पैगंबरांचे आगमन झाले.
- परंतु हजरत मोहम्मद (स.) यांच्यानंतर कोणत्याही पैगंबर किंवा प्रेषितांचे आगमन होणार नाही आणि धर्म सुधारण्याचे कार्य सर्वसामान्य लोकांनाच करावे लागेल.
- पवित्र कुराणानुसार चार हजार वर्षापूर्वी हजरत नुह किंवा मनुने लोकांना ज्या धर्माची शिक्षा दिली होती तोच हा इस्लाम धर्म आहे. व प्रत्येक युगात हाच धर्म ईश्वरीय धर्म राहिला आहे. म्हणुन आज देखील ईश्वराने पुर्वीच्या धर्म पालन करणाऱ्यांचे नाव घेऊन सांगितले आहे कि जर तुम्ही ईस्लामच्या मुळ संकल्पनेचे (Basic Concept) अनुकरण कराल तर नक्कीच सफल व यशस्वी व्हाल.

**कुराणाचे हे श्लोक अशा प्रकारे आहेत.**

- जे लोक मुसलमान आहेत किंवा यहुदी किंवा ईसाई किंवा सबाईन (हिंदु) आहेत. कोणीही कुठल्याही धर्माचा असो. जे एक ईश्वराला आणि प्रलयाच्या (कयामतच्या) दिवसाला मनापासुन मान्य करतील आणि सत्कर्म करतील. अशा लोकांना त्यांच्या कर्माचा मोबदला ईश्वराकडे मिळेल. आणि प्रलयाच्या दिवशी ना त्यांना कोणत्याही प्रकारची भिती असेल ना ते दुःखी असतील. (पवित्र कुराण २:६२)
- विश्वास असू द्या कि मुसलमान किंवा यहुदी, ईसाई असो अथवा साबी (हिंदु), जे सर्व अल्लाह आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेऊन चांगले कर्म करतील त्याचा मोबदला त्याचे रब जवळ आहे आणि प्रलय (कयामतच्या) दिवशी कोणती ही भीती किंवा दुखाचा अवसर त्यांच्यावर येणार नाही. (पवित्र कुराण ५:६९)
- अर्थात प्रत्येक धर्माची मुळ संकल्पना (Basic Concept) तर हीच आहे कि १) ईश्वर एक आहे. २) सत्कर्म केले पाहीजे. ३) प्रलय किंवा कयामतच्या दिवसावर विश्वास ठेवला पाहिजे.(म्हणजे हा विचार करणे गरजेचे आहे कि प्रलय किंवा कयामतच्या दिवशी आपल्याला आपल्या कर्मांचा हिशोब द्यावाच लागेल) ४) मृत्यु नंतरच्या जीवनाला सत्य मानले पाहिजे. ५) ईश्वर द्वारा पाठवण्यात आलेले सर्व पैगंबर आणि त्यांच्या ग्रंथांना सत्य मानले पाहिजे आणि जे कोणी मनपुर्वक असा विश्वास ठेवतात ते धार्मिक रूपाने सफल सिद्ध होतात. आणि जे लोक या मुळ संकल्पनेवर (Basic Concept) अशा प्रकारे श्रद्धा ठेवतात, ते मनुच्या (नुहच्या) काळापासून शेवटच्या पैगंबरापर्यंत एकाच धर्मावर श्रद्धा ठेवणारे म्हणजेच मुसलमानच मानले जातील.
- ह्या सर्व श्लोकांमध्ये (२:६२ आणि ५:६८) हिंदु धर्माच्या अनुयायांना 'सबाईन' किंवा 'साबी' म्हटले आहे. ह्या युगातील पैगंबर हजरत मुहम्मद (स.अ) आहेत आणि ह्या सर्व उपदेशांची ईश्वराने हजरत मुहम्मद (स.) द्वारा पुनरावृत्ति (revised) केलेली आहे. ह्यामुळे या युगात त्यांना पैगंबर मानून त्यांच्या आदेशांचे पालन करने हे सर्व लोकांना मुक्तिसाठी आवश्यक आहे.
- पवित्र वेद हे ई.सन १८०० पर्यंत (म्हणजेच चार हजार वर्षापर्यंत) लिखित स्वरूपात नव्हते. तर पंडितांनी हे सर्व स्मरण (Memorise) करून घेतले होते. वेगवेगळ्या खंडाना वेगवेगळ्या प्रकारे वेगवेगळ्या ऋर्षीनी लिहुन ठेवले होते. वेद पुस्तक स्वरूपात नव्हते आणि नाही कोणत्याही पुस्तकाप्रमाणे त्यांना नाव देण्यात आले होते. ह्या कारणामुळे ज्या स्थितित होते त्याअनुसार कुराणांत वेदांचा उल्लेख आहे.
- कुराणातील एका श्लोकात वेदांना (सुहफे ऊला) म्हटले आहे (पवित्र कुराण (२०:१३३). ज्याचा अर्थ आहे. (ईश्वर द्वारा प्रगट केलेले प्राचीन ग्रंथ किंवा आदि ग्रंथ) दुसऱ्या श्लोकात वेदांना "जाबराल अव्वलीन" म्हटले आहे. (पवित्र कुराण २६:१८६)
- ह्याचा अर्थ आहे "प्राचीन ग्रंथाची विखुरलेली पाने" (Ancient Scattered divine pages) कारण वेद एक ग्रंथाच्या रूपात नव्हते. याउलट वेदांचे सुक्त आणि खंड वेगवेगळे ठिकाणी ऋषीच्या जवळ होते. (आज देखील त्या ऋर्षीचे नावे प्रत्येक सुक्ताच्या सुरूवातीला आहेत.) (पुस्तक "अब भी ना जागे तो" लेखकः शम्स नवेद उस्मानी)

कुराणामध्ये असेही श्लोक आहेत ज्यात वेदांना 'सुहफे ऊला' आणि जाबरिल अव्वलीन म्हटले आहे ते श्लोक खालीलप्रमाणेः-

- कुराणाच्या श्लोक (२६:१९६) मध्ये सांगितले आहे किः

"आणि ते म्हणतात कि हे (पैगंबर (मुहम्मद (स.)) आपल्या रब (परमेश्वर) कडुन (आपली पैबंबरी सिद्ध करण्यासाठी) आमच्या जवळ कोणतेही स्पष्ट चिन्ह का नाही आणत?"

त्यांच्या प्रश्नावर उत्तर देण्यासाठी ईश्वराने खालील श्लोक प्रगट केला.

"का त्यांच्या जवळ ह्या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण नाही आले, जे काही सुहफे ऊला (आदिग्रंथात) मध्ये

उल्लेखीत आहे." (पुर्वीच्या पुस्तकांत (आदिग्रंथात) हजरत मुहम्मद (स.) यांची भविष्यवाणी ३१ वेळा आलेली आहे. हा काही भक्कम पुरावा नाही का?)

ह्या आयत (श्लोकांचे) चे प्रगट होण्याचे एक कारण हे असु शकते कि, अरब देशांबरोबर भारतीय लोकांचे हजारों वर्षांपासुन व्यापारी संबध होते. आणि भारतीयांचे पुष्कळ काबिले (टोळी) येमेन, सऊदी अरब, बहरेन इतर देशात वसलेले होते. आणि तेथे वसलेल्या भारतीय लोकांनी जेव्हा हजरत मुहम्मद (स.) यांच्याजवळ पैगंबरीबाबत प्रश्न विचारले तेव्हा ईश्वराने वरील आयतीचे प्रगटीकरण करून त्यांना उत्तर दिले.

"(मुहम्मद स.अ.) के जमाने का हिंदुस्तान" लेखकः काजी मुहम्मद अजहर मुबारक पूरी)

वेदांत ३१ वेळा हजरत मुहम्मद (स.) यांची भविष्यवाणी आहे आणि हिंदु धर्माच्या अनेक ग्रंथात हजरत मुहम्मद (स.) यांची भविष्यवाणी अहमद, महामद, महामे ऋषी, नराशंस आणि कल्कि अवतारच्या नावांनी केलेली आहे. त्यातीन दोन श्लोक अशा प्रकारे आहेत.

- एतास्मिन्नन्तिरे म्लेच्छ आचार्य्येण समान्वित।।
  महामद इति ख्यातः शिष्यशाखा समान्वित।।
  (भ.पू. पर्व-३, खण्ड-३ अध्याय-३, श्लोक-५)

  भविष्य पुराणानुसार "कोणत्या तरी दुसऱ्या देशात एक नबी आपल्या साथीदारांसोबत येतील. त्यांचे नाव महामद असेल आणि ते एक मरूस्थलीय (Desert) स्थानावर प्रगट होतील."

- अज्ञान हेतु कृत मोहमदान्धकार नाश विधाय हित दो दयेत विवेक (श्रीमद भगवत पुराण १:७२)

  मोहम्मदच्या माध्यमाने अज्ञानाचा अंधकार दूर होईल आणि ज्ञान व अध्यात्माची भरभराट होईल.

तर कुराणात वेद व हिंदु धर्माच्या बाबतीत देखील लिहिलेले आहे, परंतु ते अरबी भाषेत असल्यामुळे सामान्य लोकांना त्याची माहिती नाही.

# पवित्र वेद आणि पवित्र कुराणातील एकसमान श्लोक
# ईश्वराच्या प्रार्थनेसंबधी श्लोक

| पवित्र वेदातील श्लोक | पवित्र कुराणातील श्लोक |
|---|---|
| होतारं सत्ययजं रोदस्योरूत्तान हस्तो नमसा विवासेत।<br><br>पुजनीय आकाश व पृथ्वीला सत्याच्या मार्गावरून चालणारे परमेश्वराशी विनम्रता पुर्वक हात वर करून प्रार्थना करा. (ऋग्वेद ६:१६:४६) | उद्‌अू रब्बुकुम् त-जर्रुअं व्‌-व खुफ्य इन्नहू ला युहिब्बुल-मुअ-तदीन<br><br>"आपल्या ईश्वराला हाक मारा, नम्रता पुर्वक व शांतपणे खरोखर तो सीमा उल्लघंन करणाऱ्यांना पसंत करत नाही". (पवित्र कुराण ७:५५) |
| तस्य ते भक्तिवांसः स्याम<br><br>"हे प्रभु! आम्ही तुझेच भक्त आहोत" (अथर्ववेद ६:७९:३) | इय्या-क नअ़बुदु व इय्या-क नस्तअीन<br><br>"आम्ही तूझीच प्रार्थना करतो आणि तूझेच सहकार्य मागतो" (पवित्र कुराण १:४) |
| अवनो वृजिना शिशी हि<br><br>"हे परमेश्वर आम्हाला पापापासुन दूर ठेव."<br><br>(ऋग्वेद १०:१०५:८) | रब्बना फागफिरलना जुनूबना व कफ़्फिर अन्ना सय्यिआतिना<br><br>हे आमचे मालिक, जे अपराध आमच्याकडून झाले आहेत त्यांना क्षमा कर. जे दुगुण आमच्यात आहे ते दूर कर व आमचा अंत पुण्याई लोकांबरोबर कर.<br><br>(पवित्र कुराण ७:५५) |
| अवशसा निःषसा यत् पराशसोपारिम जाग्रतो यत् स्वपन्तः<br><br>जी पापे विश्वासघात, घृणा किंवा अपवादच्या कारणवश शुध्दित किंवा बेशुध्द अवस्थेत झाले असतील. हे ईश्वर त्या सर्व अप्रिय दुष्कर्मापासुन आम्हाला दुर ठेव. (अथर्ववेद ६:४५:२) | रब्बना ला तुआखिज़्ना इन् नसीना अव् अखताना। रब्बाना वला तह्‌मिल अलैना इस्रन कमा हमलूतहु अलल् लज़ीना मिन क़ब्लिना, रब्बना वला तुहम्मिलना मा ला ता-कता लना बिहि। वअ़ूफ़ुअन्ना वग़्फिर लना वर् हम्ना अन्-त मौलाना<br><br>हे आमचे रब भूलचुकिने जे पाप आमच्या हातुन झाले त्याची शिक्षा न देता आम्हाला क्षमा कर. ते ओझे जे आम्ही उचलु शकत नाही त्याच्यापासून आम्हाला दूर ठेव. आमच्या बरोबर नम्रता व क्षमायाचनेचा व्यवहार कर, आमच्यावर दया कर, तु आमचा स्वामी आहेस. जे नाकारतात त्यांच्यापासून आम्हाला दूर ठेव व आमची मदद कर. (पवित्र कुराण २:२८६) |
| नय सुपथा राय अस्मान<br><br>आम्हाला आमच्या कल्याणासाठी सन्मार्गी घेऊन जा. (यर्जुरवेद ४०:१६) | ह्दीनस-सिरातल मुस्तकीम<br><br>"आम्हाला सरळ मार्ग दाखवा" (पवित्र कुराण १:५) |

| *पवित्र वेदातील श्लोक* | *पवित्र कुराणातील श्लोक* |
|---|---|
| इन्द्र ऋतु न आ भर पिता पुत्रेभ्यो यथा। शिक्षा णो अस्मिन् पुरूहूत यामनि जीवा ज्योतिरशीमहि।।<br>परमेश्वर ह्या मार्गात आम्हाला शिक्षा (ज्ञान) दे व आम्ही प्रकाशकाची ज्योत पाहू इच्छितो.<br>(अथर्ववेद १८:३:६७) | युअतिलू-हिकम-त मंय्यशा-उ व मंय्युअतलू-हिक्मू-त फ-कद ऊति-य खयरन् कसीरन् व यज्जक्करू इल्ला उलूल-अलबाब<br>तू ज्यांना हिकमत (तत्वता) प्रदान करतो आणि ज्यांना ही दौलत मिळाली ते वास्तवात धनी आहेत. ह्या गोष्टीमुळे तेच लोक शिक्षा ग्रहण करतात जे बुद्धिमान आहेत. (पवित्र कुराण ७:२६९) |
| इन्द्र ऋतु न आ भर।<br>हे परमेश्वर तुम्ही आम्हाला तत्वदर्शिताने भरून दे. (अथर्ववेद १८:३:६७)<br>सं श्रुतेन गमेमहि<br>हे परमेश्वर! आम्हाला ब्रम्हज्ञानाने युक्त कर.<br>(अथर्ववेद १:१:४) | रब्बि जिदनी अिल्मा<br>ऐ पालनहार! मला जास्त अधिक ज्ञान प्रदान कर. (पवित्र कुराण २०—१४४) |
| अग्निः प्रातः सवने पात्वस्मान् वैश्चानरो विश्वशंभुः।<br>सर्व मणुष्यांचे प्रिय, जगाचा निर्माणकर्ता, सर्वांचे कल्याण करणारा ईश्वर सकाळच्या प्रार्थनेत आमचे रक्षण कर. (अथर्ववेद ६:४७:१) | वलायुहीतू-नबिशैइंम्मिन् अि़ल्मिही इल्ला बिमा शा-अ वसि-अ़ कुर्सिय्युहुस्समावाति वलूअर्ज<br>ईश्वर जो संपुर्ण ब्रंम्हाडाचा मालक, जो सर्व सत्ताधीश, त्या शिवाय कोणीच ईश्वर नाही. तो झोपत नाही न त्याला डुलकी लागते. जमिन व आकाशात जे काही आहे ते त्याचेच आहे." (पवित्र कुराण २:२५५)<br>व कुर्आनल्-फज़र इन-न-कुरआनंल्-फज़री का-न मश्हूदा<br>"नमाज कायम करा सुर्यास्तापासुन रात्रीच्या अंधारापर्यंत आणि सुर्योदयापुर्वीची नमाज आवश्यक करा कारण सुर्योदयापुर्वीची नमाज साक्षात असते. "(पवित्र कुराण १७:७८) |
| तस्य वयं हेडिसि मापि भूम सुमृडीके अस्य सुमतो स्याम्।<br>"आमच्यावर परमेश्वराचा कोप केव्हाही न होऊ दे. त्याची करूणा व सुमती आमच्यावर असू दे"<br>(अथर्ववेद ७:२०:३) | रब्बना ला तुजिग़ कुलूबना बअ्दा इज़ हदैतना व हब लना मिल् लदुन्का रह्मा। इन्नका अन्तल रहाब<br>पालनहार, जेव्हा तू आम्हाला सरळमार्गावर आणले आहेस तर कधी आमच्या मनात भ्रमीत करणारे वाईट विचार आणु नकोस. आम्हाला आपल्या करूणामयी स्वभावातुन दयेचा लाभ होऊ दे कारण तुच प्रत्यक्षात दाता आहेस. (पवित्र कुराण ३:८) |

| पवित्र वेदातील श्लोक | पवित्र कुराणातील श्लोक |
|---|---|
| शनः कुरू प्रजाभ्यः<br>हे प्रभू! आमच्या संतानाचे कल्याण कर.<br>(यर्जुरवेद ७:८६:०३) | व अस्लिह ली फी जुर्रिय्यती<br>माझ्या संतानाला पुण्यावान बनवुन मला सुखी जीवन दे. (पवित्र कुराण ४६:१५) |
| ऋत्वः समहदीनता प्रतीपं जगमा शुचे मृला सुक्षत्र मृलय।।<br>“हे सर्व शक्तिमान परमेश्वर आम्ही आमच्या अज्ञानाने मार्गभ्रष्ट होतो. तु आमच्यावर कृपा कर”<br>(ऋग्वेद ७:८९:३) | इन्नल्ला-ह ला यज़्लिमुन्ना-स यशअंव्-व ला किन्नन्ना-स अन्फुसहुम् यज़्लिमून<br>“तात्पर्य हे आहे कि अल्लाह कोणावरही अन्याय करत नाही. लोक स्वतःच स्वतःवर अन्याय करतात”<br>(पवित्र कुराण १०:४४) |
| यत्रानन्दाशूच मोदाशूच मुदः प्रमुद आसते। कामस्य यत्राप्ताः कामास्तत्र माममृतं कुधी।।<br>हे प्रभु! आनंद व स्नेह जेथे नियमित असतो जेथे सर्व मनोकामना मनात येताच पुर्ण होतात त्याच अमरलोकात माझा निवास कर. (ऋग्वेद ९:११३:११) | वफ़ीहा मा तश्तहीहिल्-अन्फ़ुसु व त-लज़्ज़ुल्-अअ-युनि व अन्तुम् फ़ीहा खालिदून<br>त्यांच्यापुढे सोन्याचे ताट आणि जाम सागर ठेवले जातील शिवाय सर्व मनपसंत आणि डोळ्यांना सुरेख वाटणारी वस्तू तेथे उपस्थित असेल व त्यांना सांगितले जाईल तुम्ही आता तेथे नेहमी रहा.<br>(पवित्र कुराण ४३:७१) |
| श्रद्धां प्रातर्हवामहे श्रद्धां मध्यंदिनं परि।<br>श्रद्धां सूर्यस्य जिम्रुचि श्रद्धे श्रद्धापयेह नः।।<br>श्रद्धा ठेवुन आम्ही प्रातःकाल, मध्य दिवस व सुर्य अस्त झाल्यावर आव्हान करतो. हे श्रद्धे आम्हाला ह्या लोकात युक्त कर. (ऋग्वेद १०:१५१:५) | व सब्बिह बिहम्दि रब्बि-क कब्-ल तुलअिश-शम्सि व कब्-ल गुरूबिहा व मिन् आनाइल्लयलि फ-सब्बिह व अत-राफन्नहारी ल-अल्लक-क तर्जा। व-ला तमुद्-दन्-न ऐनय-क इला मा मत्तअ-ना बिही अज्वाजम् मिन्हुम् जह्-र-तल्-हयातिददून्या। लिनफतिनहुम् फीहि।<br>ए नबी! जे गोष्टी हे लोक करतात त्यांच्याबद्दल सहन करा आणि आपल्या ईश्वराचे रब गुणगान आणि प्रशंसा करून त्याच्या महानतेचा उल्लेख करा सुर्योदयापासुन सुर्यास्तापर्यंत आणि रात्रीच्यावेळी देखील मंत्र वाचा. व दिवस उजाडे पर्यंत कदाचित ते आपल्यावर खुश होतील. (पवित्र कुराण २०:१३०) |
| वयं देंवानां समतौ स्याम<br>आम्हाला सदाचारी लोकांच्या संगतीत ठेव.<br>(ऋग्वेद ६:४७:२) | व अद्खिल्नी बिरह्मति-क फी अ़िबादिकस्-सालिहीन<br>आपल्या दयेच्यामुळे कारण आपले चांगले अनुयायांमध्ये शामिल करा. (पवित्र कुराण २७:१९) |

# ईश्वराच्या उपासनेबाबत श्लोक

| पवित्र वेदातील श्लोक | पवित्र कुराणातील श्लोक |
|---|---|
| भुवनस्य यस्पतिके एव नमस्यो विक्ष्वीडयः<br>सर्व ब्रम्हांडाचा एकच स्वामी आणि सर्व प्रजा व्दारा नतमस्तक होने व उपासना करणे योग्य आहे.<br>(अथर्ववेद २:२:१) | रब्बुस्समावाति वलूअर्जि व मा बयनहुमा फअ्-बुदहु वस्तबिर् लिअिबादतिही हल् तअ्-लमु लहू समिय्या<br>" तो रब सर्व आकाश व पृथ्वीचा व सर्व त्या वस्तुंचा सर्व त्या वस्तुंचा जे सर्व आकाश व पृथ्वीच्या दरम्यान आहे. आता तुम्ही त्याची प्रार्थना करा आणि त्याचे उपासना वर रहा. का अशी कोणती व्यक्ति आहे जी तुमच्या ज्ञान व त्यांचे समकक्ष आहे."<br>(पवित्र कुराण १६:६५) |
| य एक इ त्तमुष्टु हि कृष्टिनां विचर्षणिः।<br>जे लोकांना पाहणारा एकच आहे त्याचीच स्तुति करा.<br>(अथर्ववेद ६:४५:१६) | हु-वल्लाहुल्लजी ला इला-ह इल्ला हुव आलिमुल गयबि वश्शहादति<br>"ते अल्लाहच आहेत ज्यांच्या शिवाय कोणी पूज्य नाही. अदृश्य आणि प्रगट प्रत्येक वस्तुला ओळखणारे, तेच सर्वोच्च करूणामय आणि दयावान आहेत"<br>(पवित्र कुराण ५९:२२) |
| न भवत्विद्रं ऊती<br>तो ईश्वर आमची साहाय्यता करील.<br>(अथर्ववेद १:१००:१) | कबीरूल्-मु-अत-आल<br>"तो महान आहे आणि प्रत्येक अवस्थेत सर्वोच्च राहणार आहे." (पवित्र कुराण १३:९) |
| अध्दा देव महा<br>"ईश्वर खरोखर महान आहे."<br>(अथर्ववेद २०:५८:३) | अ-लम् तअ-लम् अन्नल्ला-ह-लहू मुल्कुस्समावाति वल्अर्जि व मा लकुम् मिन् दुनिल्लाहि मिव्वलिय्यिंव-व ला नसीर<br>"का? तुम्हाला माहित नाही कि धरती आणि आकाशाची सत्ता ईश्वराच्या हाती आहे आणि त्यांच्याशिवाय तुमचा रक्षक व मददगार कोणीच नाही."<br>(पवित्र कुराण २: १०७) |
| मही देवस्य सवितः परिष्टुतिः<br>"ह्या संसाराला निर्माण करण्यासाठी सर्व स्तुती आहे."<br>(ऋग्वेद ५:८१:१) | इय्या-क नअ्बुदु व इय्या-क नस्तअीन<br>आम्ही तुझीच प्रार्थना करतो आणि तुझ्यापाशीच सहकार्य मागतो.(पवित्र कुराण १:४) |

| पवित्र वेदातील श्लोक | पवित्र कुराणातील श्लोक |
| --- | --- |
| वसुर्दयामान<br>“जो देणारा व दयावान आहे.” (ऋग्वेद ३:३४:१) | अलूहम्दु लिल्लाहि रब्बिल-आ़लमीन अर्रहमानिर्रहीम<br>“सर्व प्रशंसा अल्लाहसाठी आहे जो सर्व जगाचा स्वामी आहे.” (पवित्र कुराण १:१) |
| महेचन त्वामद्रिवः पराशुल्काय देयाम। न सहस्त्राय नायुताय बज्रि वो न शताय शतामध।।<br>हे सर्व शक्तिमान परमेश्वर! तु इतका मुल्यवान आहेस कि मी तुला कोणत्याही शुल्कासाठी सोडू शकत नाही. ना हजार, ना शंभर, ना अरब रूपये देऊन. (ऋग्वेद ८:१:५) | व ला तश्तरू बि आयाती स-म-नन् कलीलंव्<br>अंत सर्वात प्रथम तुम्ही अस्विकार करणारे बनु नका. थोडे मुल्य देऊन माझ्या श्लोकांना विकु नका. माझ्या प्रकोपापासुन सावध रहा. असत्याचा रंग चढवुन सत्याला संदिग्ध करू नका व जाणुनबुजून सत्य लपवण्याचा प्रयत्न करू नका. (पवित्र कुराण २:४१) |
| यस्येमे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रं रसया सहाहुः।<br>यस्येमाः प्रदिशो यस्य बाहू कस्मै देवाय हविषा विधेम।<br>बर्फांनी ढळुन गेलले पर्वत ज्याचा महिमा सांगतात, नद्यासहित समुद्र ज्यांचा महिमा सांगतात व समस्त दिशा ज्याची भुजा समान आहे त्याचे अतिरिक्त आम्ही कोणत्या देवाची भक्तिपुर्वक उपासना करणार. (ऋग्वेद १०:१२१:४) | अम्म्न् ज-अ-लल् अर-ज करांरव-व ज-अ-ल खिलालहा अन्हारंव-व ज-अ-ल लहा खासि-व ज-अ-ल बयनलू-बहरयनि हाजिजन् अ इलाहुम-म अल्लाहि बल् अक्सरूहुम ला यअ-लमून्<br>ते कोण आहे त्यांच्यामुळे आम्हाला धरतीवर राहण्याचा ठिकाण मिळाले आणि ह्या धरती वर नद्यांप्रवाहीत केली आणि त्याच्यात पर्वतांची मेखे लावली. आणि पाण्याला दोन्ही बाजुंनी बांधुन ठेवले. काय अल्लाह शिवाय कोणी दुसरे प्रभु ह्या कामात सहकार्यी आहेत? नाही, किन्तु अधिकतर लोक नादान आहेत. (पवित्र कुराण २७:६१) |

पवित्र वेद आणि पवित्र कुराणातील हजारो एकसमान श्लोक शोधले जाऊ शकतात. पण आमचा उद्देश्य आपल्याला सर्व एक समान श्लोकांची ओळख करून देणे नाही तर फक्त आपणास या गोष्टीची खात्री करून देणे कि, सर्व पवित्र ग्रंथात एक ईश्वराची प्रार्थना करणे आणि सत्य मार्गावर चालण्याचा आदेश आहे. जर कोणी व्यक्ति हे सांगत असेल कि, धार्मिक ग्रंथात हिंसा व दहशतवाद करण्याचा आदेश आहे तर त्या व्यक्तिस धर्मग्रंथाचे पुर्णपणे ज्ञान नाही किंवा तो स्वतः उग्रवादी गटात आहे आणि त्याचा समाजात हानी व क्रोध पसरवण्याचा हेतु आहे.

आपल्या अधिक माहितीसाठी आम्ही ५० हून अधिक एक समान श्लोक ह्या पुस्तकाच्या शेवटच्या अध्यायात देत आहोत.

# पवित्र नराशंस कोण आहे?

- नराशंस बाबत सर्व चार वेदांत भविष्यवाणी आहे. परंतु पुर्वी चार हजार वर्षांपासुन धार्मिक ज्ञानाच्या आधारावर सर्वसामान्य लोक 'नराशंसाच्या' ओळखीचे रहस्य समजु शकले नाहीत. विसाव्या शतकापर्यंत कोणीही खात्रीपुर्वक त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल सांगु शकत नव्हते. विसाव्या शतकात जेव्हा अन्य धर्मांच्या बाबतीत साहित्य आणि ज्ञान अगदी सहज उपलब्ध होऊ लागले आणि जेव्हा संस्कृतच्या विद्वानांनी अन्य धर्माच्या धार्मिक ग्रंथाचे अध्ययन केले, तेव्हा त्यांना सर्वात अधिक सन्माननीय अशा धार्मिक व्यक्तिमत्वाची ओळख पटली.

  ज्या विद्वानांनी हे शोधकार्य केले त्यांची नावे डॉ. वेद प्रकाश उपाध्याय, (शोध विद्वान, संस्कृत विभाग, प्रयाग विश्वविद्यालय) डॉ. एम.ए. श्रीवास्तव, पंडित धर्मवीर उपाध्याय ईत्यादी आहेत.

- पवित्र वेदांत पवित्र नराशंसच्या बाबतीत खालीलप्रमाणे उपलब्ध माहिती मिळते.
- सर्व चार पवित्र वेदांत ह्या रहस्यमयी व्यक्तिला नराशंस नावाने स्मरण केले आहे. उदा.

  नराषंसः सुषूदतीमं यज्ञदाभ्यः । कविर्हि मधुहस्तः ।
  (ऋग्वेद हिंदी भाष्य २५, आर्य समाज द्वारा प्रकाशित)

- पवित्र वेदांमध्ये त्यांच्या बाबतीत पुष्कळ गोष्टींची भविष्यवाणी केलेली आहे त्यातील काही पुढीलप्रमाणेः

१. पवित्र वेदांप्रमाणे तो मधुर भाषी असेल किंवा त्यांचे भाषण सम्मोहित करणारे असेल. (His talk will be extremely sweet and mesmerizing)

नराशंसः मिहाप्रियम स्मिन्यज्ञ उप ह्वये। मधुजिहं हविष्कृतम (ऋग्वेद संहिता १:१३:३)

२. पवित्र वेदांमध्ये उल्लेख आहे कि तो भविष्याचे पुर्वानुमान करेल.

नराशंसः सुषूदतीमं यज्ञमदाभ्यः। कविर्हि मधुहस्तः।
(ऋग्वेद संहिता ५:५:२)

३. पवित्र वेदांत उल्लेख आहे कि त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत सुदंर असेल.

नराशंसः प्रति धमायाञ्न तिस्त्रो दिवः प्रति स्वर्चिः।(ऋग्वेद संहिता २:३:२)

४. पवित्र वेद म्हणतात कि नराशंस माणसांचे पाप धुऊन टाकील.

नराशंसः वाजिनं वायजयन्निह क्षयद्वीरं पूषणं सुम्नैरीमहे।

रथं न दुर्गाद् वसवः सुदानवो विश्वास्मान्नो अहंसो निष्पिपर्तन।। (ऋग्वेद १:१०६:४)

५. पवित्र वेदांमध्ये उल्लेख आहे कि पवित्र नराशंस ऊंटाची स्वारी करेल आणि त्यांच्या १२ बायका असतील.

उष्ट्रा यस्य प्रवाहिणो वधूमन्तो द्विर्दश ।
वर्ष्मा रथस्य नि जिहीडते दिव ईषमाण उपस्पृशः ।
(अथर्ववेद, कुन्ताप सुक्त : २०:१२७:२)

६. पवित्र वेदांत सांगितले आहे कि पवित्र नराशंसाची लोक प्रत्येक युगात प्रशंसा करतील.

इदं जना उप श्रुत नराषंसः स्तविष्यते ।
(अथर्ववेद, हिंदी भाष्य १४०१)

७. पवित्र वेदांमध्ये भविष्यवाणी केली गेली आहे कि ईश्वर पवित्र नराशंसला खालील वस्तु देतील.

१) १० फुल माळा, २) १०० सोन्याची नाणी,
३) ३०० घोडे आणि ४) १०,००० गायी.

एश इशाय मामहे शतं निष्कान् दश स्रजः।
त्रीणि शतान्यर्वतां सहस्रादश गोनाम्।।
(अथर्ववेद २०:१२७:३)

८. पवित्र वेद म्हणतात कि ईश्वर पवित्र नराशंसाला ६०,०९० शत्रुपासुन रक्षण करेल.

अनस्वन्ता सतपतिर्मामहे मे गावा चेतिष्ठो असुरो मघानः। त्रैवृष्णों अग्ने दशभिः सहस्रैर्वैश्वानरः

त्र्यरूणाश्चिकेत।। (ऋग्वेद म.५, सू.२७, मंत्र १)

- वरील दिलेल्या माहितीच्या आधारे विद्वान नरांशसाची ओळख पडताळून पाहण्यास असमर्थ होते.
- सध्याच्या युगात जेव्हा विद्वानांनी अन्य धर्मांचा अभ्यास कला, तेव्हा त्यांना माहिती मिळाली कि ईस्लाम धर्माचे हजरत मोहम्मदच (स.अ) ते पवित्र नराशंस आहेत, ज्यांची ४००० वर्षांपुर्वी वेदांमध्ये भविष्यवाणी केली गेली होती.
- पवित्र वेदांमध्ये केली गेलेली पवित्र नराशंसबद्दलची भविष्यवाणी हजरत मोहम्मदशी (स.अ) ह्या प्रकारे जूळते किः

नराशंस दोन शब्दांचे मिश्रण आहे. 'नर' आणि 'आशंस'. नर चा अर्थ आहे मनुष्य आणि आशंसचा अर्थ आहे 'ज्यांची प्रशंसा केली जाते'. महान विद्वान सायन ज्यांनी वेदांची व्याख्या केली आहे ते म्हणतात 'नराशंस' चा अर्थ आहे ज्यांची लोक प्रशंसा करतात. संस्कृतमध्ये हे शब्द अशा प्रकारे म्हटले जाईल.

नराशंसः यो नरैः प्रयशस्यते।
(सायण भाष्य, ऋग्वेद संहिता ५:५:२)

श्री. दयानंद सरस्वती देखील ह्याच अर्थाला सत्य मानतात. (ऋग्वेदः हिंदी भाषा, पान नं. २५, आर्य समाज द्वारा प्रकाशित)

- डॉ. वेद प्रकाश उपाध्याय म्हणतात 'नर' शब्दाचा प्रयोग फक्त मनुष्यासाठीच केला जातो. ह्या शब्दाचा उपयोग कधी देवतांसाठी केला जात नाही. म्हणुन पवित्र नराशंसला देवता मानू शकत नाही. शेवटी पवित्र नराशंस मनुष्यच आहे.

अरबी भाषेत 'हम्द' चा अर्थ आहे 'स्तुती', तर मुहम्मदचा अर्थ आहे 'ज्यांची स्तुती केली जाते.' अतः अरबी भाषेत मुहम्मदचा अर्थ तोच होत आहे जो संस्कृतमध्ये नराशंसचा अर्थ होतो.

**पवित्र नराशंसाबाबत भविष्यवाणीः-**

१. वेदांची प्रथम भविष्यवाणी अशी आहे कि पवित्र नराशंस मधुर (Sweet) भाषिक असेल किंवा त्याची वाणी मृदुल असेल.

इतिहासकार म्हणतात कि हजरत मुहम्मद (स.) यांची बोलण्याची शैली मृदु व कोमल होती. अधिक माहितीसाठी खालील पुस्तकांचा अभ्यास करा.

a) "Life of Muhammad." By Sir Willan Muir.
(Published by: Smith Elder and Co. London)

b) "Introduction to the speeches of Muhammad."
By Lane Poole (Published by: MacMillan & co. London)

दिव्य कुराण पण ह्या तथ्याची पुष्टी खालील आयत मध्ये करतात.

हे पैगंबर (स.), ही अल्लाहची मोठी कृपा आहे की तुम्ही या लोकांसाठी फार कोमल स्वभावी ठरला आहात. एरवी जर तुम्ही एखादे वेळी शीघ्रकोपी, स्वभावी व निष्ठूर असता तर हे सर्वजण तुमच्यापासून विभक्त झाले असते.
(पवित्र कुराण ३:१५९)

२. पवित्र वेदांमध्ये दुसरा उल्लेख आहे कि पवित्र नराशंस भविष्यवाणी करतील.

पैगंबर असल्यामुळे ईश्वर दुत (फरिश्ते) जिब्रील वेळोवेळी हजरत मोहम्मद (स.) जवळ येत होते. दिव्य कुराणाचे थेट अवतरणद्वारा किंवा ईशदुत जिब्रीलद्वारा हजरत मुहम्मद (स.) यांना भविष्याबद्दल वेळोवेळी माहिती मिळत होती. जी हजरत मोहम्मद (स.) लोकांपर्यंत पोहचवत होते.

रोमन लोकांची इराणी लोकांवर विजयाची भविष्यवाणी त्यांच्या प्रसिद्ध भविष्यवाणीमधील एक होती. ६४८ ईसवीमध्ये रोमनवासियांनी आपल्या पराभवानंतर ६५७ ईसवीमध्ये ईराणी लोकांना 'नैनवा' नामक स्थानावर हरवले होते. ह्या प्रकारे हजरत मोहम्मद (स.) यांची भविष्यवाणी सत्य सिद्ध झाली.

३. पवित्र वेदाचा तिसरा उल्लेख असा आहे कि पवित्र नराशंसाचे व्यक्तिमत्व अत्यंत मोहक असेल.

हे एक ऐतिहासिक सत्य आहे कि हजरत मोहम्मद (स.) यांचे व्यक्तिमत्व अत्यंत मोहक होते. फक्त

हजरत मोहम्मद (स.) यांचे नाही तर सर्वच पैगंबर व अवतार देखील मोहक व्यक्तिमत्वाचे होते, प्रतिष्ठित कुटुंबापासून आलेले होते. सुचरित्र, धैर्यवान आणि दूर-दृष्टीवान होते. ह्या कारणांमुळे ईश्वराला न मानणारे लोक पैगंबराच्या बाबतीत व्यक्तिगत स्तरावर त्यांना बदनाम करू शकले नाही. श्रीराम आणि श्रीकृष्णाबद्दल सांगितले जाते कि ते पण अत्यंत मोहक व्यक्तिमत्व होते. श्रीराम यांना तर आदर्श पुरूष (अर्थात पुरूषोत्तम) पण मानले जाते.

४. पवित्र वेदांत चौथा उल्लेख आहे कि पवित्र नराशंस मनुष्यांना त्यांच्या पापांपासून मुक्त करून देतील.

पैगंबराचे मुळ कर्तव्य आहे कि मनुष्यांना पाप मुक्त करून देणे आणि हे कार्य हजरत मोहम्मद (स.) यांनी केले देखील आहे. दिव्य कुराणामध्ये ईश्वर म्हणतात कि;

हे मुहम्मद (स.) तुमचा जन्म सर्व लोकांवर ईश्वराची एक कृपा आहे. (Muhammad is Blessing of God for mankind) (पवित्र कुराण २१:१०७)

ह्याचा अर्थ आहे कि मानवजातीला मोक्ष प्राप्त व्हावा ह्या कारणासाठी त्यांना पाठविण्यात आले होते.

५. पवित्र वेदांत पांचवा उल्लेख आहे कि नराशंसाच्या १२ पत्नी असतील.

हा उल्लेख केवळ मोहम्मद (स.) साठीच योग्य आहे. कारण कोणत्याही धर्माच्या धर्मगुरूंना १२ पत्नी नव्हत्या, काहींना १२ पेक्षा कमी तर काहींना १२ पेक्षा जास्त पत्नी होत्या. उदा. हजरत इब्राहीम यांना २ पत्नी होत्या, हजरत सुलेमान यांना ३०० तर श्रीकृष्ण यांना १६००० पेक्षा जास्त पत्नी होत्या. फक्त मोहम्मद (स.) यांनाच १२ पत्नी होत्या त्यांच्या १२ पत्नींची नावे खालीलप्रमाणे;

(१) हजरत ख़दीजा (र.अ.),
(२) हजरत सौदा (र.अ.),
(३) हजरत आयशा (र.अ.),
(४) हजरत हफ्सा (र.अ.),
(५) हजरत उम्मे सलमा (र.अ.),
(६) हजरत उम्मे हबीबा (र.अ.),
(७) हजरत जैनब बिन्ते हजश (र.अ.),
(८) हजरत जैनब बिन्ते खज़ीमा (र.अ.),
(९) हजरत जुवैरिया (र.अ.),
(१०) हजरत सूफ़िया (र.अ.)
(११) हजरत रेहाना(र.अ.) आणि
(१२) हजरत मैमूना (र.अ.)

६. पवित्र वेदांमध्ये उल्लेख सहावा आहे कि नराशंस उंटाची स्वारी करणार.

हजरत मुहम्मद (स.) मक्का/मदिनामध्ये वास्तव्य करत होते आणि तेथे चारी बाजुला वाळू प्रदेश आहे आणि ऊंट वाळू प्रदेशात प्रवास करण्यासाठी एक उत्तम साधन आहे म्हणुन हजरत मुहम्मद (स.) पण ऊंटाची स्वारी करीत होते.

ब्राम्हणांना ऊंटाची स्वारी करण्याची आज्ञा नाही आहे. म्हणुन हे देखील समजते कि पवित्र नराशंस ब्राम्हण नव्हते आणि भारतवासीदेखील नव्हते. (राजस्थान प्राचीन काळात वाळवंट (Desert) नव्हते. )

७. पवित्र वेदांमध्ये सातवा उल्लेख हा आहे कि पवित्र नराशंसची लोक प्रशंसा करतील.

माइकल एच. हार्ट द्वारा लिखीत पुस्तक "The most 100 influential persons in history" मध्ये लेखकाने हजरत मुहम्मद (स.) यांना प्रथम स्थानावर ठेवले आहे. अर्थात अशी ऐतिहासीक व्यक्ति ज्यांच्यावर सर्व जगातील लोक खुपच प्रभावित झाले, ती एकमेव व्यक्ति हजरत मुहम्मद (स.) च आहे.

अजान (मशीदीमध्ये नमाजसाठी आमंत्रण करण्यासाठी दिला गेलेला आवाज) सर्व जगातील मुसलमान दिवसभरात पाच ठराविक वेळेत लाऊड स्पीकरवर उंच स्वरात हजरत मुहम्मद (स.) यांचे नाव घेतात. ज्या प्रकारे एका स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंत वेळ हळूहळू बदलत जाते, त्याचप्रमाणे नमाजाची आणि अजानची वेळ ही बदलत जाते या कारणामुळे दर मिनीट व दर सेकंदाला पृथ्वीच्या कुठल्या न कुठल्या भागात दर मिनीट व दर सेकंदाला अजान दिली जाते आणि त्यांचे (हजरत मुहम्मद (स.)) नाव पुकारले जाते. म्हणजेच मानव वंशामध्ये हजरत मुहम्मद (स.) सर्वात प्रशंसनीय व्यक्ति आहेत.

८. पवित्र वेदांमध्ये भविष्यवाणी आहे कि ईश्वर पवित्र नराशंस यांना खालील वस्तू देईल.

१) १० फुल माळा २) १०० सोन्याची नाणी ३) ३०० घोडे आणि ४) १०,००० गायी.

मागील ४००० वर्षापासुन वेदांची हि भविष्यवाणी विद्वानांसाठी एक न उलगडणारे रहस्य होते. सर्वजण ह्याचा अर्थ व ही व्यक्ति उलगडण्यात असमर्थ होते. हजरत मुहम्मद (स.) वर लक्ष केंद्रीत केल्यास ह्या प्रश्नाचे उत्तर या प्रकारे मिळते.

अ) हजरत मुहम्मद (स.) यांच्या जवळ १० समर्पित अनुयायी होते. ज्यांना 'अश्रए मुबश्शिरह' म्हटले जाते. अशराचा अरबी भाषेत अर्थ 'दहा' असा आहे आणि 'मुबश्शिरह' चा अर्थ होतो 'ज्यांना सुवार्ता दिली गेली आहे. (स्वर्गाची)'.

या दहा भाग्यशाली लोकांची नावे अशा प्रकारे आहेत.

(१) हज़रत अबू बक्र (र.अ.), (२) हज़रत उमर (र.अ.), (३) हज़रत उस्मान (र.अ.), (४) हज़रत अली (र.अ.), (५) हज़रत तल्हा (र.अ.), (६) हज़रत साद बिन अबी वक्क़ास (र.अ.), (७) हज़रत सईद बिन जैद (र.अ.), (८) हज़रत अब्दुर रहमान बिन औफ (र.अ.), (९) हज़रत अबू ओबैदा बिन जर्राह (र.अ.), आणि (१०) हज़रत जुबैर(र.अ.)

हे दहा व्यक्ति हजरत मुहम्मद (स.) यांचे अत्यंत समर्पित अनुयायी होते आणि त्यांच्यासाठी प्राणाची आहुती देण्यासही सदैव तत्पर होते. आणि नेहमी त्यांच्या जवळ राहण्याचा प्रयत्न करायचे म्हणुन त्यांची तुलना १० फुल माळांशी केली आहे.

ब) हजरत मुहम्मद (स.) यांचे जवळजवळ १०० अनुयायी असे होते ज्यांनी आपले सर्व काही त्याग केले. उदा. आपला देश, आपला परिवार, आपला व्यापार, इत्यादि आणि हजरत मुहम्मद (स.) यांच्यासोबत मशीदीत राहिले. त्यांना "असहाबे सुफ्फह" म्हटले जाते.

ह्या १०० लोकांनी इस्लामचे ज्ञान स्वतः आत्मसात करून ते दुसऱ्यांना शिकवण्यास आपले जीवन समर्पित केले. हे सर्व इस्लामचे ज्ञान व शिक्षणाचा प्रसार करण्यात खुप महत्वपुर्ण होते. म्हणुन त्यांची तुलना 'सोन्याची नाणी' म्हणून केली गेली आहे.

क) सुरूवातीच्या काळात मक्काच्या लोकांनी ईस्लाम आणि मुसलमानांना व्यक्तिगत पातळीवर संपविण्याचा प्रयत्न केला. शेवटी हजरत मुहम्मद (स.) यांनी मदीना नावाच्या सुरक्षित स्थळी स्थलांतर केले आणि तेथुनच ईश्वराचा संदेश सर्वत्र प्रसार करण्याच्या ईस्लाम धर्माच्या जबाबदारीचे पालन करीत राहिले. ह्या वेळी मुसलमान आणि इस्लामचा सर्वनाश करण्यास मक्काजवळ एक हजार सैनिकांनी मदीनेवर आक्रमण केले. हजरत मुहम्मद (स.) आणि त्यांच्या ३१३ अनुयायांनी १००० आक्रमणकाऱ्यांचा समर्थपणे सामना केला आणि त्यांना पराभूत केले. (ह्या युद्धात १४ अनुयायी मरण पावले). ह्या ३१३ अनुयायांचा साहस व विरता पाहता त्यांची तुलना घोड्यांशी केलेली आहे. जे साहस आणि विरतेचे प्रतिक मानले जातात. ह्या कारणामुळे वेदात ३०० घोड्यांचा उल्लेख आढळतो

ड) हजरत मुहम्मद (स.) यांच्या मक्कापासुन मदीना या प्रवासाच्या आठ वर्षांनंतर, जेव्हा मक्का येथील लोकांनी हजरत मुहम्मद (स.) यांच्याबरोबर केलेला शांतिप्रस्ताव मोडला. तेव्हा हजरत मुहम्मद (स.) यांनी आपले १०,००० अनुयायी एकत्र करून मक्केच्या दिशेला प्रस्थान केले. तेथे त्यांनी कोणत्याही प्रकारची हिंसा किंवा युद्ध न करता मक्केवर विजय प्राप्त केला. कारण ह्या १०,००० अनुयायांनी कधीच कोणत्याही व्यक्तिला हानी न पोहचविता हे कार्य संपन्न केले. ज्या प्रकारे गायी कोणाला नुकसान किंवा हानी पोहचवत नाही, म्हणुन वेदांमध्ये या अनुयायांचे वर्णन करताना गायीची उपमा दिली असावी.

- ज्या प्रमाणे पैगंबर फक्त उपदेशच देऊ शकतात. ते ईस्लाम धर्माचे ज्ञान व शिक्षण याचे अनुकरण करून नियमित रूपाने त्याचे आचरण करण्याची बुद्धी देऊ शकत नाही. परंतु ईश्वर असे करू शकतो. म्हणुन जे कार्य १० अश्रए मुबाश्शिरह, १०० असहाबे सुफ्फह, ३१३ रक्षक आणि १०००० अनुयायांनी केले, ही सर्व ईश्वराकडुन दिली गेलेली

सद्बुद्धिची देणगी आहे. म्हणुन आम्ही असे सांगु शकतो कि, वरील सर्व गोष्टी ईश्वराने भेटीच्या स्वरूपात हजरत मुहम्मद (स.) किंवा पवित्र नराशंस यांना दिलेल्या आहेत.

६.पवित्र वेदांमध्ये उल्लेख आहे कि, ईश्वर पवित्र नराशंसाची ६०,०९० शत्रुंपासुन रक्षा करणार.

जेव्हा मक्काचे लोक इस्लाम धर्माचा प्रसार थांबवण्यास असफल झाले तेव्हा त्यांनी हजरत मुहम्मद (स.) यांची हत्या करण्याची योजना आखली. एका रात्री ४० परिवारातुन ४० योद्धांनी हजरत मुहम्मद (स.) यांच्या घराला घेराव घातला. कारण सकाळी ते जेव्हा घराबाहेर पडतील तेव्हा त्यांची हत्या करण्याची त्यांची योजना होती.

त्या रात्री हजरत मुहम्मद (स.) आपल्या घराबाहेर निघाले परंतु शत्रु त्यांना पाहूच शकले नाहीत. हजरत मुहम्मद (स.) त्यांच्यामधून मदीनेच्या दिशेने प्रवास करत गेले.

त्या वेळी मक्केची लोकसंख्या जवळ-जवळ ६०००० इतकी होती आणि ते सर्व हजरत मुहम्मद (स.) यांचे शत्रु होते. हा एक चमत्कार होता कि हजरत मुहम्मद (स.) त्यांच्यामधून निघुन गेले व सुरक्षित स्थळी मदीना येथे पोहोचले. म्हणुन ईश्वर म्हणतो कि तो पवित्र नराशंसला ६०,०९० शत्रुंपासुन सुरक्षित करेल.

- वरील Facts & Figure बघुन डॉ. वेद प्रकाश उपाध्याय, डॉ. एम.ए. श्रीवास्तव, पंडित धर्मवीर उपाध्याय आणि इतर विद्वान ह्या गोष्टीशी सहमत आहेत कि पवित्र नराशंस आणि हजरत मुहम्मद (स.) एकच आहेत.
- नराशंस, कल्की अवतार, आणि हजरत मुहम्मद (स.) यांच्या विषयी अधिक माहितीसाठी कृपया खालील पुस्तकांचा अभ्यास करा.

1. Kalki Autar and Hazrat Muhammad (pbuh), by Dr. Ved Prakash Upadhyay,
   Publisher:-Jamhoor Book Depot,
   DEOBAND.(U.P) Pin: 247554

2. Narashansa aur Antim Rishi,
   by Dr. Ved Prakash Upadhyay
   Publisher:-Jamhoor Book Depot,
   DEOBAND. (U.P) Pin: 247554

3. Muhammad (s) aur Bhartiya Dharm Granth, by Dr. M.A. Shrivastav
   Publisher:- Madhur Sandesh Sangam, E-20, Abul Fazl Enclave, Jamia Nagar, New Delhi-110025.
   E-mail: madhursandeshsangam@yahoo.com

4. Muhammad (pbuh) in World Scripture, by A. H. Vidyarthi
   Publisher: Adam Publishers & Distributors, 1542, Pataudi House, Darya Ganj, New Delhi-110002. www.adambo

# इस्लाम काय आहे?

पवित्र कुराणांत ईश्वर आपले पैगंबर हजरत मोहम्मद (स.) यांना आदेश देत आहे कि,

“त्याने तुमच्यासाठी धर्माची तीच पद्धत निश्चित केली आहे जिची आज्ञा त्याने नूह (अ.) ला दिली होती आणि जिला (हे मुहम्मद (स.) आता तुमच्याकडे आम्ही दिव्यबोधाद्वारे पाठविले आहे, आणि जिचा आदेश इब्राहीम (अ.) आणि मूसा (अ) यांना दिलेला आहे, या ताकीदसह की प्रस्थापित करा या धर्माला आणि यात फाटाफूट होऊ देऊ नका.” (पवित्र कुराण ४२:१३)

तेव्हा इस्लाम धर्म काही नवीन धर्म नाही आहे. हाच धर्म हजरत मनु (हजरत नुह) यांचा होता. हाच धर्म ईसा आणि मुसाचा होता आणि हाच धर्म प्रत्येक पैगंबरचा होता. तेव्हा हा धर्म कोणता नवीन नसुन ईश्वराच्या आदेशानुसार आहे. हा सुरूवातीपासुन होता आणि शेवटपर्यंत राहील. जेव्हा-जेव्हा ह्यात परिवर्तन होत राहिले तेव्हा-तेव्हा धर्मात जे काही बिघाड झाले त्यांना दूर करण्यासाठी ईश्वराने नवीन अवतार (पैगंबर) पाठविले. हजरत मोहम्मद (स.) ह्या सुधारकांमधील शेवटचे आहेत. आता ह्या कलियुगाचे हेच कल्कि अवतार आहेत. हजरत मोहम्मद (स.) नंतर आता कोणताही पैगंबर किंवा अवतार येणार नाही.

**इस्लामची शिकवण काय आहे?**

इस्लाम धर्मात पाच गोष्टींचा आदेश आहे.

१. ईश्वराला एक माना आणि हजरत मुहम्मद (स.) यांना ईश्वराचा अंतिम पैगंबर माना.

२. ईश्वराची दिवसात पाच वेळा भक्ति करा. (नमाजचे पठन करा)

३. वर्षातुन एक महिन्याचा उपवास करा.

४. जर आपण धनवान आहात तर एका वेळी आपल्याला प्राप्त झालेल्या नफ्यातील २.५% गरिबांना दान करा.

५. आपण धनवान आहात तर जीवनात एकदा मक्का शरीफची यात्रा करा.

**ईश्वराला एक मानून फक्त त्याची भक्ति का करावी?**

१. अथर्ववेदात आहे कि,

स एक एक एकवृदेक एव।

“ईश्वर एक आहे, एकटा आहे व अमर आहे.”
(अथर्ववेद १:५२:१४)

२. ऋग्वेदात आहे कि,

“ईश्वरच जीवन देतो आणि मृत्यु देखील ईश्वरच देतो आणि त्याच्याच कृपेने सर्व प्राणी जीवित आहेत.” (अथर्ववेद १३:०३:०५)

३. उपनिषदमध्ये लिहिलेले आहे कि,

एकम् एवम अदितीयम् (चंडोग्य उपनिषद ०६:०२:०१)

“कोणाच्याही भागीदारीशिवाय तो एकटा आहे.”

४. वेदामध्ये लिहिलेले आहे कि,

“ए (ईश्वराला) मानणारे, ईश्वराशिवाय अन्य कोणाचीही भक्ति करू नका. ईश्वर एकच आहे.” (ऋग्वेद ८:०१:०१)

५. वेदांच्या अनुसार ब्रम्हसुत्र ह्या प्रकारे आहे.

एकम् ब्रम्ह द्वितीय नास्ते नेह ना नास्ते किंचन।

“ईश्वर एक आहे त्यांच्याशिवाय पुजनीय कोणीहि नाही, कोणीहि नाही थोडादेखील (पुजनीय) नाही.”

६. अथर्ववेदात म्हटले आहे कि,

“ईश्वर एकच आहे, जो मनुष्याच्या मनातील लपलेल्या गोष्टींना ओळखतो.”
(अथर्ववेद १०:०९:२९)

**मुस्लिम धर्मानुसार**

१. ईश्वराशिवाय कोणीहि प्रार्थना योग्य नाही. (पवित्र कुराण ४८:१९)

### शिख धर्मानुसार

श्री गुरू ग्रंथसाहिबाच्या पहिल्या ग्रंथाच्या पहिल्या श्लोकात "फक्त एकाच ईश्वराचे अस्तित्व आहे. जो खरा निर्माता आहे. त्याला भय आणि तिरस्कार नाही. त्याला कोणी जन्म दिलेला नाही. तो अनादि आहे आणि कायमस्वरूपी आहे. तो महान आणि विद्वान आहे."

प्रार्थना करताना शिख लोक उच्चार करतात,

"वाऽ हे गुरू" ह्याचा अर्थ खरा एक परमेश्वर असा होतो.

### पारशी धर्मपंथानुसार

पारशी लोक त्यांच्या ईश्वराला 'अहुरा माझदा' ह्या नावाने हाक मारतात. त्यांचा धार्मिक ग्रंथ दासातिर सांगतो, "ईश्वर हा एकच आहे आणि कोणीही त्याच्या बरोबरीचा नाही."

### खिस्ती आणि यहुदी धर्मानुसार

पवित्र बायबल सांगते,

१) हे इस्त्रायलच्या बालकांनो! ऐका! आपला मालक ईश्वर आहे आणि तो एकच आहे. (पवित्र बायबल ६:४)

२) मीच तुमचा ईश्वर आहे आणि माझ्याखेरीज अन्य कोणीही तुमचे रक्षण करू शकणार नाही. (पवित्र बायबल ४३:११)

३) मीच फक्त तुमचा ईश्वर आहे व माझ्याशिवाय अन्य दुसरा कोणताही परमेश्वर नाही. (पवित्र बायबल ४६:०९)

४) आपला अधिपति आपला ईश्वर हा एकच आहे. (डिओटीरोनॉमी ६:४, मार्क १२:२९:३२)

५) तुमचा मालक ईश्वर आहे व त्याची प्रार्थना करा व फक्त त्यालाच तुमची धार्मिक सेवा देऊ करा. (मॅथ्यू ४:१०)

६) तुम्हाला ह्या गोष्टी दाखवल्या गेल्या त्यामुळे तुम्हाला कदाचित समजले असेल की आपला ईश्वर एकच आहे व त्याच्याशिवाय दुसरा कोणीहि नाही. त्याची नोंद घ्या आणि आपल्या हृदयात असा विश्वास ठेवा की, ईश्वर हा वर स्वर्गात आणि खाली पृथ्वीवर (सर्व ठिकाणी) देखील एकच आहे व त्याखेरीज अन्य कोणीही नाही. (डिओटीरोनॉमी ४:३५:३९)

तो ईश्वर एक आहे त्याने आम्हा सर्वांना जन्मास घातले. तोच आपले पालनपोषण करतो तर आम्ही त्यांची भक्ति का करू नये? त्यांना सोडून त्या देवी देवतांची पूजा करणे ज्यांनी ना तर आम्हाला जन्म दिले ना आमचे पालन केले, हे पाप नाही तर काय आहे?

### नमाज म्हणजे काय?

- चौदा वर्षाच्या वनवासात एकदा श्री हनुमानजीने श्रीरामजींना विचारले कि मी ईश्वराची प्रार्थना कशी करू? तेव्हा श्रीरामजींनी श्री हनुमानजींना ह्या प्रकारे प्रार्थना करण्यास सांगीतले.

  प्रथम तारक चयवादितिय दंड मुच्यते तीतय कुंडला कारक चतुर्थ अर्धे चंद्रकः पंच बिंदु संयुक्त ओम मित्यज्योतीरूपक। (श्री राम तत्व अमृत)

  प्रथम सरळ उभे राहा, नंतर दंडवत (सजदा) करा, पुन्हा सरळ बसा नंतर अर्ध चंद्राप्रमाणे समोरच्या बाजूला वाका, नंतर पुन्हा सरळ बसा आणि ईश्वराचे स्मरण करा व चिंतनात ध्यान लावा.

- पवित्र वेदांनुसार ईश्वराच्या भक्तिचा सर्वश्रेष्ठ प्रकार म्हणजे 'अष्टांग' होय. अष्टचा अर्थ आहे आठ आणि अंग म्हणजे शरीराचा भाग. अष्टांग म्हणजे आठ शरीराच्या भागांनी जमिनीला स्पर्श करून ईश्वराची प्रार्थना करने. शरीराचे आठ भाग पुढीलप्रमाणेः- कपाळ, नाक, दोन हात, दोन्ही गुढगे, पायाचे दोन्ही पंजे. अष्टांगला अरबी भाषेत सजदा असेही म्हणतात. आणि इंग्रजीमध्ये Prostration म्हणतात. बायबलमध्येही प्रार्थनेचा हा प्रकार सर्वोत्तम मानला जातो. (जेनीसीस १७:३, नंबर २०:६, जोशो ५:१४, मॅथ्यु २६:३६)

- भक्तिचा जो प्रकार श्रीराम यांनी श्री हनुमानास सांगितला आणि वेदांमध्ये भक्तिचा जो प्रकार अष्टांग या नावाने ओळखला जातो. मुसलमानांची नमाज या दोन्ही प्रकारांचे मिश्रण आहे. वरील प्रकार आणि नमाज यामध्ये फक्त इतकाच फरक

आहे कि नमाज मध्ये उभे राहिल्यानंतर प्रथम वाकतो आणि नंतर सजदा करतात आणि श्रीरामजीने प्रथम दंडवत (सजदा) करायला व नंतर वाकायला सांगितले. बाकी सरळ उभे राहणे आणि धरतीवर बसुन ईश्वराचे ध्यान करणे एक समान आहे.

- तर नमाज काही प्रार्थनेचा नवीन प्रकार नाही. हे तर शतकानुशतके ऋषीमुनी करीत आले आहेत. ऋग्वेदात आहे कि "हे ईश्वर! आम्ही तुझी प्रार्थना सकाळ, दुपार, आणि सुर्यास्तनंतर करतो. तर आम्हाला सत्यनिष्ठ भक्त बनवा." (ऋग्वेद १०:१५१:६५)
- वेदांमध्ये 'त्रिकालसंध्या' विषयी लिहिलेले आहे म्हणजे दिवसातुन तीन वेळा ईश्वराची भक्ति केली पाहिजे. तेव्हा दिवसातुन तीन वेळा ईश्वराचे स्मरण करण्याचा नियम शताब्दीपासूनच आहे. इस्लाममध्ये हे पाच वेळा करण्याचे सांगितले आहे. ज्या दोन वेळा अतिरिक्त आहेत ते संध्याकाळ (असर) व रात्र (ईशा) आहे.
- माझ्या आपल्या बुद्धिप्रमाणे (जे चुकिचेहि होऊ शकते) ह्यांची दोन कारणे आहेत. पहिले कारण असे आहे कि प्रार्थना खुपच सोपी केली आहे, फक्त पाच ते दहा मिनीटात ती पुर्ण होते. पुर्वी ध्यानधारणा करण्यास खुप वेळ लागत होता. आणि दुसरे कारण हे आहे कि पूर्वीच्या काळात संध्याकाळी काळोख होताच लोक खाऊन-पिऊन झोपी जात होते. आज लोक अर्ध्या रात्री पर्यंत जागे असतात.

  कुराण शरीफ मध्ये ईश्वर म्हणतात कि आम्ही मानवजातीला आमची प्रार्थना (भक्ति) करण्यासाठी बनविले आहे. (पवित्र कुराण ५१:५६) कुरआन हे पण उल्लेख आहे कि ईश्वराचा स्मरण केल्यावर मनाला शांती मिळते. (पवित्र कुराण १३:२८) म्हणुन प्रत्येक मनुष्याला ईश्वराची प्रार्थना दिवसातुन ५ वेळा करणे आवश्यक आहे.

## वर्षातुन एक महिना उपवास का केले पाहिजे?

काही लोकांना दारू किंवा व्यसनी पदार्थांची सवय का असते? कारण त्यांचे स्वतःवर नियंत्रण (Control) नसते. म्हणून एक दारूडा हि गोष्ट चांगल्या प्रकारे ओळखतो कि तो चूक करीत आहे तरी पण स्वतःच्या मनाशी हरून तो दारू पितो.

दारू, सिगरेट, जुगार, आणि असेच खुप चुकीचे कार्य ते सोडू शकतात ज्या लोकांचे स्वतःवर व आपल्या इच्छा शक्तिवर दृढ नियंत्रण असेल.

- भुक ही मानवाची सर्वात मोठी कमजोरी आहे. भुकेने बेजार होऊन मनुष्य चोरी करतो, दरोडे घालतो, स्त्रिया भिक मागतात किंवा आपली अब्रु विकतात. जी व्यक्ति भुक लागल्यानंतर स्वतःवर नियंत्रण ठेवते आणि सामान्य माणसांप्रमाणे दिवस व्यतित करू शकते. ती व्यक्ति आपल्या सर्व इच्छेवर नियंत्रण ठेवू शकते. रोजा किंवा उपवास हा विधी स्वतःवर नियंत्रण करण्यासाठी एक सराव (Practice) आहे.
- पवित्र कुराणांत उल्लेख आहे कि,

  ज्या कोणाला ह्या महिण्यात लाभ होईल त्याने ह्या महिण्यात पुर्ण उपवास करावेत (पवित्र कुराण २:१८५)
- मनुने हिंदु धर्माचे अनुयायींना एक महीना पुर्ण उपवास करण्याचा आदेश दिला होता. (मनुस्मृती पाठ ६, श्लोक क्र २४)
- स्वतः हजरत ईसाने ४० दिवसाचा उपवास केला होता व ईसाई धर्माच्या लोकांना पण उपवास करण्याचा आदेश दिला होता. (Mathew 17:21, Mark 9-29) आणि हजरत मुहम्मद(स.) तर स्वतः खुप जास्त उपवास (रोजा) ठेवत होते. परंतु ईश्वराने साधारण लोकांना फक्त एक महीन्याचा रोजा फर्ज (आवश्यक) केला.
- मुक्ति मिळणे किंवा आपल्या इच्छांवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्राचीन काळात लोक घोर तपस्या करीत होते आणि समाजापासून आपले नाते तोडून संन्यास घेत होते. मग ईश्वराने ह्याला सोपे केले. समाजात राहून एक महिन्याचा उपवास ठेवल्याने स्वतःमध्ये इतकी शक्ति निर्माण होते जितकी शक्ति एक घोर तपस्वीला तपस्या केल्यानंतर प्राप्त होते. म्हणुन ह्या सरळ उपायाची अंमलबजावणी जरूर केली पाहिजे. आपल्या ईच्छाशक्तिला मजबूत

करण्यासाठी आणि सत्याच्या मार्गावर निश्चयपुर्वक चालण्यासाठी एक महीन्याचा उपवास जरूरी आहे.

**हज का केला पाहिजे?**

- मनुच्या युगात भयंकर महापुर आला होता. त्याच्यात मनु आणि त्याचे काही अनुयायी वाचले होते आणि सर्व जग ह्या महापुरात बुडून नाश पावले होते.

  त्या नंतर या जगाचे मनुच्या पुत्रांपासून पुन्हा पुनर्वसन झाले. आपण सर्व मनुची संतान आहोत. मनुची संतान धरतीच्या ज्या क्षेत्रावर असो त्यांनी त्या भयंकर महापुराला नक्कीच आपल्या स्मृतीत ठेवले आहे. आपण इंटरनेट वर सर्च करून शोध लावलात तर आपल्याला माहिती मिळेल कि विश्वाच्या प्रत्येक देशात महापुराच्या कथेची नोंद जरूर आहे. परंतु ह्या गोष्टीचे आश्चर्य देखील होते कि, प्रत्येक देशाच्या कथेत काही ना काही असमानता जरूर आहे. असे का?

- जेव्हा आपण सर्व एक पित्याचे संतान आहोत आणि महापूर पण एकच आहे. तर ह्या कथेत मतभेद का असावा? ह्याचे कारण आहे communication error.

- जर आपण दहा लोकांना एका वर्तुळाच्या स्वरूपात बसविले आणि एका व्यक्तिच्या कानात हळूच काही सांगितले आणि त्याला सांगितले कि आपण सांगितलेली गोष्ट शेजारच्या व्यक्तिच्या कानात हळुच सांग. ह्या प्रकारे प्रत्येक व्यक्ति आपल्या शेजारच्या व्यक्तिच्या कानात आपण सांगितलेली गोष्ट सांगत राहिला. पण जेव्हा दहाव्या व्यक्तिपर्यंत आपली गोष्ट पोहचेल आणि आपण तीच गोष्ट ऐकाल जी आपण पहिल्या व्यक्तिला सांगितली होती. तर आपल्याला खुप आश्चर्य वाटेल कि दहाव्या व्यक्तिने आपल्या गोष्टीला खुपच तोडून मोडून सांगितले आहे आणि आपल्या गोष्टीच्या अर्थाचा अनर्थ झालेला आहे.

- हे एक सत्य आहे आणि व्यवस्थापनाचा नियमही. म्हणून व्यवस्थापनात Verbal communication ह्याला सक्त मनाई केली आहे.

महापुराच्या कथेबाबत देखील हेच घडले आहे आणि विश्वातील अनेक धर्मांबरोबर देखील हेच झाले आहे. ईस्लाम धर्माबाबत असे होऊ नये म्हणुन हज हा विधी करण्यामागील कारण हे देखील आहे.

- ईश्वराने विश्वातील सर्व लोकांना जीवनात एका वेळी धरतीच्या केंद्रांवर (Center of earth) एकत्रित येऊन सर्वांसोबत प्रार्थना करण्याचा आदेश दिला आहे. ह्यालाच हज म्हणतात. जगातील सर्व लोक जोपर्यंत एका स्थानावर एकत्रित येत राहतील आणि एक दुसऱ्याच्या चुका आणि धर्मात झालेले बिघाड दूर करतील तेव्हा धर्माचे नियम कधीच बदलणार नाही.

  पवित्र कुराणांत उल्लेख आहे कि,

  “निःसंशय सर्वप्रथम उपासनास्थळ जे मानवाकरिता बांधण्यात आले आहे ते तेच आहे जे मक्का शहरी विद्यमान आहे. त्याला मांगल्य व समृद्धी दिली गेली होती आणि सर्व जगवासीयांकरिता मार्गदर्शनाचे केंद्र बनविले गेले होते. त्यात स्पष्ट संकेतचिन्हे आहेत. इब्राहीम (अ.स.) चे प्रार्थनास्थळ आहे, आणि त्याची अवस्था अशी आहे की जो त्यात दाखल होईल सुरक्षित झाला. लोकांवर ईश्वराचा हा हक्क आहे की या गृहापर्यंत पोहचण्याची ऐपत आहे त्याने त्याची हजयात्रा करावी आणि जो कोणी या आदेशाचे पालन करण्यास नकार देईल त्याने समजून असावे की ईश्वर सकल जगवासीयांवर अवलंबून नाही.” (पवित्र कुराण ३:९६)

  ह्या कारणामुळे बायबलमध्येही हज यात्रेचा उल्लेख आहे (Pslam 84-1-12) आणि आम्ही मक्का आणि मक्तेश्वरच्या पाठात अभ्यासले होते कि वेदांमध्येही मक्का, काबा शरीफचे वर्णन आहे आणि येथील यात्रेबाबतही सांगितले आहे.

  “हे ईश्वराची प्रार्थना करणाऱ्यांनो दूरच्या देशात समुद्रकिनाऱ्यावर दारूका बन आहे, ज्याची रचना ही मानवप्राण्याने केलेली नाही. (ज्याची रचना देवदुतांनी केलेली आहे) या जागेत प्रार्थना करून ईश्वराचा कृपाप्रसाद मिळवून स्वर्गलोकात प्रवेश मिळवा” (ऋग्वेद १०:१५५:३)

तरीही जे लोक ज्यांना धर्माचे पुर्ण ज्ञान होते त्यांनी सामान्या लोकांना नेहमी दंतकथाच सांगितली आणि पवित्र वेदांची मूळ संकल्पणा (Basic concept) सर्वसामान्य लोकांना कधीही समजू दिली नाही.

हजची बरीच कारणे (Reason), लाभ (Benefit), आणि तत्वज्ञान (Philosophy) आहे. त्यांचे ह्या छोट्याशा पुस्तकात विवरण करणे शक्य नाही.

# पवित्र कल्कि अवतार कोण आहे?

## कल्कि अवताराचे तथ्य काय आहे?

- पवित्र पुराणानुसार एकुण २४ अवतार आहेत. त्यात गौतम बुद्ध २३ वे अवतार आहे. भगवत पुराणानुसार २४ व्या अवताराचे नाव कल्कि असेल.
- श्री गौतम बुद्धने आपले शिष्य 'नन्दा' यांना सांगितले, "ए नंदा! मी ना प्रथम बुद्ध आहे व नाही शेवटचा. माझ्या नंतर देखील एक दुसरे बुद्ध येतील, त्यांचे नाव मैत्रेय असेल." (गोस्पेल ऑफ बुद्ध, लेखक केरस, पृष्ठ-२१७)
- स्वामी विवेकानंद, गुरू नानकजी आणि हिंदु धर्माचे अनेक श्रेष्ठ विद्वान, उदा. पंडित सुन्दरलाल, श्री. बलराम परिहार, डॉ. वेद प्रकाश उपाध्याय, डॉ. रमेश प्रसाद गर्ग, पंडित दुर्गा शंकर सत्यार्थी, श्री. किशोरी लाल भगत असे मानतात कि, अवतारचा अर्थ हा नाही कि, ईश्वर स्वतः धरतीवर जन्म घेईल. अवताराचा अर्थ आहे कि, ईश्वराचे प्रतिनिधी (Representative) ईश्वराचा संदेशवाहक किंवा पैगंबर.

(हजरत मुहम्मद और भारतीय धर्मग्रंथ, लेखकः डॉ. एम.ए. श्रीवास्तव)

## अवतार येण्यामागील उद्देश्य काय?

- यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थान धर्मस्य तदात्मन सृज्याम्यहम (गीता)
भगवदगीतेनुसार जेव्हा पापी लोकांचे समाजावर वर्चस्व वाढु लागते आणि जगात अराजकतेचा प्रभाव वाढतो. त्या वेळी अवतार येऊन पापी शक्तिंचा नाश करतात आणि जगात पुनः शांती आणि बंधुप्रेम स्थापित (Establish) करतात, आणि भक्तांना प्रतिष्ठा बहाल करतात.

## अंतिम अवतार कोणत्या युगात येईल?

- Osborne व्दारा लिखीत Encyclopedia history नुसार धरतीचे वय ४५५ कोटी वर्षे आहे.
- हिंदु धर्माच्या अनुसार काळाला ४ युगात विभागले गेले आहे.
- प्रथम युग सतयुग आहे. ह्याचा कालावधी १७ लाख २८ हजार वर्षाचा आहे.
- दुसरे युग त्रेता युग आहे. ह्याचा कालावधी १२ लाख ९६ वर्ष आहे.
- तीसरे युग आहे व्दापर युग. ह्याचा कालावधी ८ लाख ६४ हजार वर्षांचा आहे.
- शेवटचे युग कलयुग आहे. ह्याचा कालावधी ४ लाख ३६ हजार वर्षाचा अवधी आहे.
- वर्तमान युग कलियुग आहे आणि त्याची जवळपास ५१०० वर्षे पुर्ण झाली आहेत.
- इत्थ कलौ गतप्राये जेनेषु खर धर्मणि-१
धर्म त्राणाय सत्वेने भगवानतरिष्यति-२

अंतिम अवतार ज्यांचे नाव कल्कि अवतार आहे. तो कलियुगात जन्म घेणार. (भगवत पुराण १२:२:२७)

## कल्कि अवतार कोणत्या वर्षी जन्म घेईल?

पणछस्सयं वस्संपण मासजंद गमिय वीरणिबुई दो,
सगरोजा सो कल्कि चतुणवतिय महिप सगमांस
(त्रिलोक सागर पृष्ट ३२)

जैन धर्माचे 'त्रिलोक सागर ग्रंथ' (लेखक नेमी चंद) च्या अनुसार महावीर स्वामींच्या मृत्युच्या ६०५ वर्षे ५ महिन्यानंतर कल्कि अवतारने जन्म घेतला.

उत्तरपुराणानुसार महावीर स्वामींच्या मृत्युच्या १००० वर्षानंतर कल्कि अवताराने जन्म घेतला. (Gunbhadra Antiquary Vol x up. 143)

महावीर स्वामींच्या मृत्युबद्दल अंदाजे वर्षे ५०० B.C (इसा पुर्व) आहे. ह्यामुळे कल्कि अवताराची अंदाजे तिथि ५०० A.D. (इसवी) आहे.

### कल्कि अवतार कोणत्या दिवशी जन्म घेणार?

द्वादश्या शुक्ल पक्षरस्य माधवे माधवम
जातो दट्टशुतुः पुत्रं पित्रौहश्टमानसौ

कल्कि अवतारचा जन्म माघ महिन्यांतील १२ तारखेला अर्थात १४ व्या रात्रीपासुन दोन दिवस अगोदर होईल.

### कल्कि अवतारचा जन्म कुठे होईल?

शम्भले विष्णुयशसो गृहे प्रादुर्भविष्याम्यहम (कल्कि पुराण २:४)

कल्कि अवतार संभल गावी जन्माला येईल.

### कल्कि अवताराचा संबध कोणत्या परिवारासोबत राहिल?

शम्भल ग्राम मुख्यस्य ब्राम्हणस्य महात्मः-१
भवने विष्णुयशसः कल्कि प्रादुर्भाविष्यति-२
(कल्कि पुराण १२:१८२)

कल्कि अवतार प्रमुख पुजारीच्या घरी जन्म घेईल आणि त्यांच्या वडीलाचे नाव विष्णुयश असेल.
सुमत्य विष्णुयशसा गर्भधत्त वैष्णवम् (कल्कि पुराण २:४, २:११)

कल्कि अवताराच्या मातेचे नाव सुमति असेल.

### कल्कि अवताराचे गुणधर्म काय असणार?

अश्वमाशुगमारूमहय देव दत्त जगगत्पति :-१
असिनासाधु दमनमष्टैश्वर्य गुणान्वितः-२
(भगवत पुराण, १२ अस्कंध, २:१९)

भगवत पुराणानुसार आठ गुणांनी सजवुन ईश्वरदुतांनी एक तीव्र गती घोडा आणि तलवार त्यांचे हाती दिली. कारण ते जगाचे रक्षण सर्व उपद्रवींपासुन करू शकेल.

भगवत पुराणानुसार कल्कि अवतार अंतिम अवतार असणार. (१:३:२४ भगवत पुराण)

- कल्कि पुराणानुसारः परशुराम एक पर्वतावर कल्कि अवतारास ज्ञान देईल.
- कल्कि पुराणाचे अनुसार कल्कि अवतार उत्तर दिशेकडे जाईल व परत येथे येईल.
- कल्कि पुराण (२:५) च्या अनुसार कल्कि अवतारचे चार सहकारी असतील. जे सैतांनाना आपल्या वशमध्ये करण्यासाठी कल्कि अवताराची मदत करतील.

चतुर्भिभ्रातृभिर्देव करिष्यामि कलिक्षयम्

- कल्कि पुराण (२:७) म्हणतात कि, कल्कि अवताराची ईशदुताद्वारा मदत होईल.
- भगवतपुराणचे म्हणणे आहे कि, कल्कि अवतार सर्वोत्तम व्यक्तिमत्व संपन्न असणार.
- विचरन्नागुना क्षोण्या हयेनाप्रतिमधुतिः-
नृपालिंगगप्तछदो दस्युन् कोटिशोनिहनिष्यातिः-
अथतेषां भविष्यन्ति मनांसी विशदानिवै।
वसुदेवांगरागति पुण्यगंधा निलस्पृशाम। (भगवतपुराण १२:२:२१)

भगवत पुराणाचे म्हणणे आहे कि कल्कि अवताराचे शरीर सुगंधित असेल आणि त्यांच्या अवतीभवती मनमोहक सुगंध दरवळेल.

अष्टा गुणा पुरूष दीप्यन्ति
प्रज्ञाच कौल्यंच दमः श्रुतच
पराक्रमश्च बहुभाषिताच
दान यथा शक्ति कृतज्ञताच ।। (भगवत पुराण १२:२)

भगवत पुराणात हा उल्लेख आहे कि कल्कि अवतारांत आठ विशेष गुण खालील प्रकारे असतील. ज्ञान (Knoweldge), सन्मानित वंश (Honoured family), आत्मसंयम (Self control), दिव्य ज्ञान (Divine Knoweldge), वीरता (Braveness), सयंत भाषण (Calance speach), सर्वात मोठे दानवीर (Extremely chaaritable), आणि अत्याधिक आभारी (Great obliged) आणि कल्कि अवतार वैदिक धर्माची स्थापना करेल.

आम्हाला कल्कि अवताराबद्दल पुष्कळ माहिती प्राप्त झालेली आहे तर आता आपण शोध घेऊया कि कल्कि

अवतार केव्हा येणार आहे कि येऊन गेला?

**स्पष्टीकरण (Analysis)**

जेव्हा अमेरिकाने अफगानिस्तानावर B-52 बम वर्षक विमानांनी आक्रमण केले होते तेव्हा ते अफगानिस्तानच्या भुमिला स्पर्श केल्याशिवाय परतून गेले होते. अमेरिकाने सफलतापूर्वक कित्येक वेळी पाकिस्तानात तालीबानच्या ठिकाणांवर उपग्रह निर्देशित प्रक्षेपणास्त्राच्या (Satellite guided missiles) सहाय्यानी आक्रमण केले होते.

तर आपण एका अशा युगात आहोत, जेथे एक व्यक्ति दुनियेच्या दुसऱ्या ठिकाणी हल्ला करून जमिनीवर पाय न ठेवता परत येऊ शकते. आणि एक उपग्रह निर्देशित प्रक्षेपणास्त्राच्या (Satellite guided missiles) सहाय्यानी ३००० किलोमीटर दूर अचुकपणे शत्रुवर मारा केला जाऊ शकतो.

अनुसंधान आणि विकास कार्य इतक्या तीव्र गतिने होत आहे कि थोडया वेळानंतर लोक आकाशातील उपग्रहांवर ठेवलेल्या लेजर बंदुकांच्या माध्यमांनी लढतील. तर काय आम्ही ही अपेक्षा करू शकतो कि, जगाचे रक्षक 'अंतिम अवतार' जन्म घेतील व घोडे आणि तलवारींनी शत्रुचा विनाश करतील?

असे होण्याकरिता प्रथम संपूर्ण मानवजातीला त्यांच्या वैज्ञानिक प्रगती बरोबरच नष्ट व्हावे लागेल. नंतर जे उर्वरित लोक राहतील त्यांना आपले जीवन पुनः शुन्याच्या स्थितिपासून आरंभ करावे लागेल. आणि नंतर जे काही लोक वाचतील त्यांच्यात जर कोणी दुष्ट व्यक्ति असेल तर तो तलवारीने समाप्त होऊ शकतो.

परंतु जर असे होणार आहे तर जगाचे उद्धारक येण्याचा काय फायदा? म्हणूनच जर आम्ही असा विचार करत आहोत तर आपण चुकत आहोत.

अरब देशाचे लोक ई. सन ११०० पासुन सोडा आणि कोळशाच्या मिश्रणापासून विस्फोटक तयार करून प्रयोग करत आहेत. विस्फोटक तयार होताच तलवारीचे महत्व कमी झाले होते. म्हणुन कल्कि अवताराचा जन्म ११०० A.D च्या पुर्वीच झाला असेल.

उत्तर पुराण आणि त्रिलोक सागरच्या अनुसार महावीर स्वामींच्या मृत्युपश्चात १००० वर्षानंतर कल्कि अवताराचा जन्म होणार आहे, जे कि जवळजवळ ५०० ए.डी. आहे. आता आम्हाला हा शोध घ्यायचा आहे कि कोणत्या संत किंवा प्रसिद्ध धार्मिक व्यक्तिने भारतात ५०० ए.डी. मध्ये जन्म घेतला होता किंवा नाही?

२४ वा अवतार कोणी अज्ञात व्यक्ति असू शकत नाही. ती व्यक्ति प्रसिद्ध असलीच पाहिजे. उदा. गौतम बुद्ध, श्री राम आणि कृष्ण खुप प्रसिद्ध आहेत आणि प्रत्येक त्यांना ओळखतात. परंतु दुर्दैवाने आम्ही अशा कोणत्याही प्रसिद्ध व्यक्ति अथवा अवतारला ओळखत नाही ज्यांनी भारतात ५०० ई. च्या जवळपास जन्म घेतला.

हा एक योगायोग आहे कि कल्कि अवतार आणि हजरत मुहम्मद साहेबांच्या जन्माची वेळ एकच आहे. चला पुराव्यासाठी आणि कल्कि अवताराची ओळख करण्यासाठी तसेच हजरत मुहम्मद साहेब यांची ओळख कल्की अवताराच्या रूपात करण्यासाठी आपण खालील माहिती आणि दिव्य पुराणात केली गेलेली भविष्यवाणीला जुळवून घेऊया.

- जन्म तिथी
- जन्म स्थान
- कौटुंबिक पार्श्वभुमि
- वडीलांचे नाव
- आईचे नाव
- त्यांचे शिक्षण
- त्यांची जबाबदारी
- त्यांचे सहयोगी
- अंतिम अवतार असणे
- अन्य संबधीत पुर्वानुमान

**जन्म तिथीः-**

कल्कि पुराण (२:२५) नुसार कल्कि अवतार माघ महिन्यांचे १२ तिथी अर्थात पुर्णिमेच्या चंद्राच्या दोन दिवस आधी जन्म घेणार. हजरत मुहम्मद (स.) यांचा

जन्म दिवस १२ रबी उल अव्वल आहे. हा दिवस देखील पुर्णिमाच्या चंद्राच्या दोन दिवस अगोदर आहे.

**जन्म स्थानः-**

हिंदुस्तानमध्ये संभल नावाचे कोणतेही ही स्थान नाही. दोन स्थळांचे नाव ह्या नावाशी मिळते जूळते आहेत व ते असे आहे. संभलपुर आणि संभार झरा. परंतु तिथे कोणालाच माहिती नाही कि अवतार किंवा पैगंबर प्रमाणे कोणी श्रेष्ठ व्यक्तिने तेथे जन्म घेतला. डॉ. वेद प्रकाश उपाध्याय (संस्कृत विद्वान प्रयाग विश्वविद्यालय) म्हणतात कि संभल स्थानाची विशेषता आहे ते स्थानाचे नाव नाही. वैदीक संस्कृत मध्ये 'सम' चा अर्थ आहे. शांति अर्थात संभल ते स्थान आहे जेथे प्रत्येकाला शांति प्राप्त होईल. हजरत मोहम्मद (स.) चा जन्म मक्का येथे झाला व त्या ठिकानाचे नाव 'बलदिल अमीन' आहे. (पवित्र कुराण ९५:३) बलदचा अर्थ शहर आणि अमीनचा अर्थ आहे शांति. प्रसिद्ध पुस्तक 'Encyclopedia Britanica' मध्येही मक्काला अमन (शांति) चे शहर असे म्हटले आहे.

मक्का शहरात मनुष्य प्राणी किंवा जनावर सर्वांसाठी शांति आहे. धार्मिक नियमांप्रमाणे कोणीही मक्का शहरात मनुष्य किंवा प्राण्याची हत्या करू शकत नाही आणि झाडे-झुडपही तोडु शकत नाही.

**कौटुंबिक पार्श्वभुमि :-**

भगवत पुराणाच्या आधारावर कल्कि अवताराचा जन्म पुरोहितच्या घरात होईल. हजरत अब्दुल मुत्तलिब जे हजरत मुहम्मद (स.) यांचे आजोबा होते. मक्का शहराचे मुख्य धर्मगुरू आणि काबाचे विश्वस्त (Trusty) पण होते.

**माता पिताचे नावः-**

कल्कि अवताराच्या वडीलांचे नाव विष्णुयश असेल. ज्याचा अर्थ आहे विष्णु किंवा ईश्वराचे उपासक. हजरत मुहम्मद(स.) यांच्या पित्याचे नाव अब्दुल्लाह आहे. ज्याचा अर्थ आहे ईश्वराचा उपासक किंवा आज्ञाकारी. कल्कि पुराणानुसार कल्कि अवताराच्या आईचे नाव असेल सुमति अर्थात शांतिपूर्ण (Peaceful) आणि विचारशील. हजरत मुहम्मद (स.) च्या आईचे नाव होते आमना ज्याचा अर्थही शांतिपूर्ण आणि विचारशील आहे.

- कल्कि पुराणानुसार कल्कि अवतार आपल्या शहरांपासुन उत्तरेच्या दिशेला जातील व पुन्हा परत येतील. हजरत मुहम्मद (स.) आपल्या वडीलांच्या शहर मक्का पासून उत्तर दिशेला मदिना गेले होते आणि आठ वर्षानंतर ते परत मक्का शहरला विजयी होऊन आले होते.
- कल्कि पुराणाचे म्हणणे आहे कल्कि अवतार पर्वतावर जाऊन तेथे परशुरामाशी ज्ञान प्राप्त करतील. हे एक ऐतिहासीक तथ्य आहे कि हजरत मुहम्मद(स.) गारे-ए-हिरा नावाच्या गुहेमध्ये शांति व चिंतनासाठी जात होते. ४० वर्षाच्या वयात त्यांना ईश्वराव्दारे ईश्वरदूत हजरत जिब्राईल द्वारा पर्वताच्या गुहेत प्रथमच ईश्वरी कुराणाचे ज्ञान प्राप्त झाले.
- भगवत पुराण (१२:२:१) मध्ये उल्लेख आहे कि कल्कि अवतार जगाचे रक्षक होतील. पवित्र कुराणमध्ये ईश्वर म्हणतात कि "आम्ही हजरत मुहम्मद (स.) यांना रहमत-उल-लिल-आलमीनच्या रूपात पाठविले आहे." (पवित्र कुराण २१:१०७) रहमतचा अर्थ आहे कृपा (Blessing) आणि आलमीनचा अर्थ होतो संपूर्ण सृष्टि ह्याचा अर्थ असा होतो कि, हजरत मुहम्मद (स.) पासून जगाला शांतिपूर्ण जीवन, मुक्ति, मोक्ष, आणि यश व सफलतेसाठी मार्गदर्शन मिळेल.
- कल्कि पुराण (२:५) नुसार कल्कि अवतार आपल्या चार सहकाऱ्यांच्या मदतीने 'कली' अर्थात सैतानाला पराभूत करतील. डब्लू.एल. लैंगर (Encyclopedia of world history page :184) यांचे म्हणणे आहे कि, हजरत अबु बक्र, हजरत उमर, हजरत उस्मान आणि हजरत अली (र.अ.) यांनी इस्लाम धर्माच्या संदेशाला सर्वसामान्य लोकांपर्यंत प्रसारित केले आणि जुन्या अमानुष परंपरेला समाप्त केले.
- कल्कि पुराण म्हणते, "कल्कि अवतारची युद्धक्षेत्रात स्वर्गदूतांद्वारे साहाय्यता केली जाईल."

- हजरत मुहम्मद (स.) आणि त्यांचे सहकारी बद्रच्या युद्धात ३१३ होते. परंतु शत्रुकडे १००० सैनिक होते. दरीमधील लढाईत मुसलमान ३००० होते तर शत्रुचे सैनीक २५००० पेक्षा अधिक होते. या दोन्ही युद्धात आणि अन्य कित्येक वेळा शत्रुवर विजय प्राप्त करण्यासाठी स्वर्गदूतांद्वारा मदत मिळाली होती. पवित्र कुराणांत पण ह्याचा दाखला मिळतो. पहा अध्याय (३:१२३:११५) (८:९) (२३:९) आदि.

- भगवत पुराण (१२:२२१) च्या अनुसार कल्कि अवताराचे शरीर सुगंधमय असेल, ज्यामुळे त्यांच्या सभोवतालचा परिसर सुगंधित होईल.

  हदिसमध्ये उल्लेख आहे कि एका वेळी जेव्हा हजरत मुहम्मद (स.) झोपले असताना, तेव्हा हजरत उम्मे सलमा (रजी.) यांनी आपला घाम गोळा केला. जेव्हा हजरत मुहम्मद (स.) जागे झाले तेव्हा त्यांनी विचारले "माझ्या या घामाचा तुम्ही काय वापर करणार?" हजरत सलमाने उत्तर दिले मी ह्याला सुगंधी रूपात प्रयोग करणार. जो कोणी हजरत मुहम्मद(स.) यांच्याशी हात मिळवायचे दिवसभर त्यांच्या हातातून सुगंध येत असे. (शमाइले तिरमिजी : २०८)

  हजरत मुहम्मद (स.) यांचा दास, हजरत अनस (रजी.) यांनी सांगितले कि, आमच्या नेहमी लक्षात येत होते कि, हजरत मुहम्मद (स.) केव्हा आपल्या कक्षातुन बाहेर येतात कारण तेव्हा संपुर्ण हवा सुगंधित होऊन जायची.
  (Life of Mohammad by william muir- Page No-342)

  भगवत पुराणानुसार (खंड २, अध्याय २) मध्ये आहे कि कल्कि अवतार बुद्धिमत्ता, स्वनियंत्रण, दिव्य ज्ञान, वीरता, सन्माननीय वंश, अत्यंत दानशीलता, मृदुभाषी आणि कृतज्ञता या आठ विशेष गुणांनी सुस्सज आणि संपन्न असतील.

  गैर मुस्लिम लेखकांद्वारा लिखित पुस्तकात पण हजरत मुहम्मद (स.) यांच्या आठ गुणांचा दाखला दिला आहे.

1- Life of Mohammed by sir William Mullar
2- Introduction of the speeches of Mohammed by lane poole. Published by macmillan and co (London)
3- Mohammed and Mohammed by R.bos worth smith.

- भगवत पुराण (१२:२:१९) मध्ये उल्लेख आहे कि कल्कि अवताराचे आठ गुणांबरोबर तीव्र गतिचा वेगवान घोडा आणि तलवार पण दिली जाईल ज्याद्वारे ते दुष्टांचा नाश करतील.

  ईश्वर-दूत हजरत जिब्राईल (स.) हजरत मुहम्मद (स.) यांना बुर्राक नावाचा गतिमान घोडा दिला होता. हजरत मुहम्मद (स.) यांच्या जवळ ७ घोडे आणि ६ तलवारी होत्या. आणि त्याचा उपयोग ते इस्लामचा संदेश लोकांपर्यंत पोहचवण्यास आणि अत्याचारी लोकांबरोबर लढण्याकरीता करत होते.

- भगवत पुराण (१:३:२४) मध्ये आहे कि कल्कि अवतार अंतिम अवतार होतील.

  दिव्य कुरआन मध्ये पण हजरत मुहम्मद (स.) ला शेवटचे पैगंबर सांगितले आहे. (कुरआन ३३:४०)

- पुराणानुसार कल्कि अवतार वैदिक धर्माची स्थापणा करतील.

- जेव्हा मनु (हजरत नुह) यांच्या काळातील लोकांनी मनुच्या वाणीकडे दुर्लक्ष केले तेव्हा एका प्रचंड महापुराने सर्व जगाला घेरले आणि त्या महापुरातुन फक्त मनूचे अनुयायीच वाचले. जर मनु आणि त्यांचे अनुयायी महापुरानंतर वैदिक धर्माचा अनुकरण करतात तर इस्लामही एक वैदिक धर्मच आहे आणि कुरआणाची आयत त्याचा दाखला देत आहे.

  त्याने तुमच्यासाठी धर्माची तीच पद्धत निश्चित केली आहे जिची आज्ञा त्याने नूह (मनु) (अ.) ला दिली होती आणि जिला (हे मुहम्मद (स.) आता तुमच्याकडे आम्ही दिव्यज्ञान पाठविले आहे, आणि ज्याचा आदेश इब्राहीम (अ.) आणि मूसा (अ.) यांना दिलेला आहे, या ताकीदसह की प्रस्थापित करा या धर्माला आणि यात फाटाफूट होऊ देऊ नका. (पवित्र कुराण ४२:१३)

- कल्कि अवताराच्या बद्दल वर्णन केलेले सर्व विशेष गुण हजरत मुहम्मद (स.) यांच्या जीवनाशी जुळते

आहे. म्हणून संस्कृत विद्वान डॉ. वेद प्रकाश उपाध्याय, डॉ.एम.ए.श्रीवास्तव आणि पंडित धर्मवीर उपाध्यायचे म्हणने आहे कि हजरत मुहम्मद(स.) कल्कि अवतार आहे ज्यांची सर्व लोक आतापर्यंत प्रतीक्षा करीत आहेत. अधिक माहितीसाठी कृपया खालील पुस्तकांचा अभ्यास करा.

१. "कल्कि अवतार और हजरत मुहम्मद" (डॉ. वेद प्रकाश उपाध्याय)

२. "नराशंस और अंतिम ऋषी"

३. "हजरत मुहम्मद (स.) और भारतीय धर्मग्रंथ" (Mohammad in world scripture) (ए.एच विद्यार्थी)

- आम्ही जी काही चर्चा येथे केली आहे ती कल्कि अवतार आणि हजरत मुहम्मद(स.) यांच्या मधील नाते दर्शविते. परंतु कोणी हे ही म्हणु शकतो कि आम्ही जी चर्चा केली आहे ती फक्त आमची कल्पना आहे आणि हा काही भक्कम पुरावा नाही आहे कि कल्कि अवताराच हजरत मुहम्मद (स.) आहेत किंवा हजरत मुहम्मद (स.) बद्दल पवित्र पुराणात भविष्यवाणी आहे.

- शेवटी कल्कि अवतारच्या ओळखीचा दाखला देण्यासाठी आणि हजरत मुहम्मद (स.) च्या बाबतीत पुराणांची भविष्यवाणीला समजण्यासाठी आम्ही हिंदु धर्मातील काही अधिक पुस्तकांतील संदर्भ देत आहोत व ते ह्या प्रकारे आहेत.

१. अज्ञान हेतु कृत मोहमदान्धकार नांश विधाय हित दो दयेत विवेक (श्रीमद भगवत पुराण २:७२)

अर्थातः मुहम्मद द्वारा (अज्ञानाचा) काळोख दूर होईल आणि ज्ञान व भक्तिमध्ये वाढ होईल.

२. एतस्मिन्नान्तिरे म्लेच्छ आचार्य्यने समन्वितः ।।
महामद इति ख्यातः शिष्यशाखा समान्वित ।।
(भ.पू. पर्व-३, खण्ड-३, अध्याय-३, श्लोक-५)

अर्थात भविष्य पुराणनुसार कोणत्यातरी दुसऱ्या देशात एक नबी आपल्या साथीदारांसोबत येतील, त्यांचे नाव महामद असेल आणि ते एक मरूस्थलीय (Desert) स्थानावर प्रगट होतील.

३. पंडित धर्मवीर यांनी एक प्रसिद्ध पुस्तक (अन्तिम ईश दूत) लिहिले जे १९३२ मध्ये नॅशनल प्रिंटींग प्रेस दरयागंज, नवी दिल्ली येथुन प्रकाशित झाले. आपल्या हया पुस्तकात त्यांनी लिहिले आहे कि, काग-बुसंडी आणि गरूड, श्री राम यांच्यासोबत पुष्कळ काळापर्यंत राहिले. आणि ते फक्त त्यांच्या शिकवणुकीचे पालन करीत नव्हते तर ते शिक्षा सामान्य लोकांपर्यंत देखील पोहचवत होते. तुलसीदासजींनी त्याच ज्ञानाचा उल्लेख संग्रामपुरानाच्या भाषांतरात केला आहे. ते लिहितात कि शंकरजीनी आपल्या पुत्राला भविष्यात धर्माच्या बाबतीत ह्या शब्दात सांगितले.

## तुलसी दासजींची भविष्यवाणीः

| | |
|---|---|
| यहां न पक्षपात कछु राखहुं वेद पुराण, संत मत भाखहुं | कोणत्याही भेदभावाशिवाय मी संत आणि वेदांची शिकवण सांगत आहे. |
| सवंत विक्रम दोऊ अनझ। महाकोक नस चतुर्पतझ | तो सातव्या शताब्दीत जन्म घेणार आणि त्यांच्यासोबत चार चमकणारे तारे असतील. |
| राजनीति भव प्रीती दिखावे आपन मत सबका समझावे | तो तर्क (बुद्धि आणि प्रेम) च्या आधारे शासन करेल आणि आपल्या शिक्षणाद्वारे लोकांना प्रोत्साहन देईल. |
| सुरन चतुसुदर सतचारी। तिनको वंष भयो अति भारी | त्यांचे चार खलीफा असतील त्यांच्यामुळे अनुयायींची संख्या खुपच वाढेल. |
| तब तक सुन्दर मद्दिकोया। बिना महामद पार न होया। | जो पर्यंत ईश्वरी ग्रंथ पृथ्वीवर आहे, महामद यांचे अनुसरण केल्याशिवाय यश मिळणार नाही. (मुक्ति मिळणार नाही.) |
| तबसे मानहु जन्तु भिखारी। समस्थ नात एहि व्रतधारी। | सामान्य लोक, भिकारी, जीव-जंतु हे महामद यांचे नाव घेतल्याने ईश्वराचे अनुयायी होतील. |
| हर सुन्दर निर्माण न होई तुलसी वचन सत्य सच होई | तुलसीदास सत्य सांगत आहे त्यांच्यानंतर त्यांच्यासारखी (हजरत मोहम्मद) महान व्यक्ति पुन्हा जन्मास येणार नाही. |

संग्राम पुराण, स्कन्द १२, कांड ६ः पद्यानुवाद, गोस्वामी तुलसीदास.
(हजरत मुहम्मद (स.) और भारतीय धर्म ग्रंथ, डॉ.एम.ए.श्रीवास्तव, पान नं. १८)

उपनिषदामध्ये देखील हजरत मोहम्मद (स.) च्या बाबतीत भविष्यवाणी आहे. नागेंद्रनाथ बसुद्वारा संपादित विश्वकोशाचे द्वितीय खण्डात उपनिषदांचे जे श्लोक दिले गेले आहेत. ज्याच्यात इस्लाम आणि पैगंबरांचा उल्लेख आहे. त्याच्यातील काही प्रमुख श्लोक आणि त्यांचे अर्थ हया प्रकारे आहे.

अस्माल्लां इल्ले मित्रावरूणा दिव्यानि धत्त।
इल्लल्ले वरूणा राजा पुन दुर्दः।
हायमित्रो इल्ला इल्लल्ले इल्ला वरूणो मित्रस्तेजस्काम।।१।।
होतारमिन्द्रो होतार मिन्द्र महासुरिन्द्रा।
अल्लो ज्येष्ठ परमं पूर्ण ब्रम्हाणं अल्लामं।।२।।
अल्लो रसूल महामद रकबरस्य अल्लो अल्लाम्।।३।।
(अल्लोपनिषद १,२,३)

अर्थात "ह्या देवतांचे नाव ईश्वर आहे. तो एक आहे. मित्रा आणि वरूण ही त्याची विशेषता आहेत. वास्तवात ईश्वर वरूण आहे. जो सर्व सृष्टीचा राजा आहे. मित्रांनो! त्या ईश्वराला आपले पूज्य माना. ते वरूण आहेत आणि एका मित्रा प्रमाणे सर्व लोकांचे कार्य सांभाळतो. ईश्वर सर्वात मोठा, सर्वात उत्तम आणि सर्वात जास्त पवित्र आहे. मुहम्मद (स.) ईश्वराचे श्रेष्ठतर पैगंबर (प्रतिनिधी) आहेत. ईश्वर सर्व संसारचा पालनहार आहे आणि सर्व चांगले नाव ईश्वरासाठी आहे. वास्तव्यांत ईश्वराने सुर्य, चंद्र, आणि ताऱ्यांना जन्मास आणले."

| | |
|---|---|
| आदल्ला बूक मेककम अल्लबूक निखादम ।।४।। | या श्लोकाचे भाषांतर करता येणे शक्य नाही. |
| अला यज्ञन हुत हुत्वा अल्ला सुर्य चंद्र सर्व नक्षत्रा ।।५।। | अल्लाहची युगायुगांनी पूजा होत आहे. |
| अल्लो ऋषीणां सर्व दिव्यां इन्द्रायपूर्व माया परमन्तरिक्षा ।।६।। | ईश्वर संताचा रक्षक आहे, तो सर्वात महान आहे. ईश्वर सर्व वस्तुंच्या अगोदर आणि सर्व ब्रम्हांडापेक्षा अधिक विलक्षण आहे. |
| अल्ल पृथिव्या अन्तरिक्ष्ज्ञं विश्वरूपम् ।।७।। | ईश्वराचे (शक्तिचे) दर्शन पृथ्वी, आकाश आणि सुर्यमंडलातील सर्व वस्तुंवर होत असते. |
| इल्लांकबर इल्लांकबर इल्लां इल्लल्लेति इल्लल्ला ।।८।। | ईश्वर सर्वात महान आहे, ईश्वर सर्वात श्रेष्ठ आहे आणि त्याच्यासारखा कोणी नाही. |
| ओम अल्ला इल्लल्ला अनदि | ऊँ म्हणजेच ईश्वर। आम्ही त्याची सुरूवात आणि शेवट माहित करू शकत नाही. सर्व दुर्गुणांपासुन रक्षा करण्यासाठी आम्ही ईश्वराची प्रार्थना करतो. |
| दे स्वरूपाय अथर्वण श्यामा हुह्री जनान पशून सिद्धान जलवरान् अदृश्टं कुरू कुरू फट | हे ईश्वर! वाईट, पापी आणि लोकांची दिशाभूल करणाऱ्या धार्मिक पुरोहितांचा नाश कर. आणि पाण्यातील हाणीकारक किटांणुपासुन (Virous and Bacteria) आमची रक्षा कर। |
| असुरसंहारिणी हुं हीं अल्लो रसुल महमदरकबरस्य अल्लो | ईश्वर राक्षसी शक्तिंचा नाश करणार व मुहम्मद ईश्वराचे पैगंबर आहेत. |
| अल्लाम इल्लल्लेति इल्लल्ला | अल्लाह तो अल्लाहच आहे, त्याच्यासारखा दुसरा कोणीही नाही. (अल्लोपनिषद ४-१०) |

गीता प्रेस, गोरखपुरशी प्रकाशित 'कल्याण' पत्रिकाचे विषेशांक 'उपनिषद अंक' मध्ये २२० उपनिषदांचे वर्णन आहे. या २२० उपनिषदामध्ये अल्लोपनिषद १५ व्या स्थानावर आहे. डॉ. वेद प्रकाश उपाध्याय यांनी पण अल्लोपनिषदचे वर्णन आपल्या पुस्तक 'वैदिक साहित्य एक विवेचना' मध्ये केले आहे. जे प्रदिप प्रकाशनने १९८९ मध्ये प्रकाशित केले आहे.

- हजरत मुहम्मदच्या (स.) बाबतीत भविष्यवाणी फक्त हिंदु धर्मातील ग्रंथात नाही तर प्रत्येक धर्मात आहे. अन्य धर्मातील ग्रंथातील भविष्यवाणी खालीलप्रमाणे-

## यहुदी धर्मात भविष्यवाणीः-

- मी त्यांच्यासाठी त्यांच्या बांधवादरम्यान (मुसाप्रमाणे) एक नबीला उत्पन्न करेन आणि मी आपले वचन त्याच्या मुखात देईन, आणि ज्या गोष्टीची आज्ञा देईन तेच ते सर्वांना (मानवजातीस) सांगणार. (Old Testament Deuteronomy 18:18)

## ईसाई धर्मात भविष्यवाणीः-

येशु मसीह पवित्र बायबलमध्ये सांगतातः

- मी तर तुम्हाला पापाचे प्रायश्चित देण्यासाठी (Baptism) पाण्याने बाप्तिस्मा देत आहे. परंतु जो माझ्या नंतर येणार आहे तो माझ्या पेक्षाही शक्तिशाली आहे मी त्यांची पादत्राणे उचलण्या योग्यही नाही. तो तुम्हाला पवित्र आत्मा आणि अग्नी (by force) पासुन बाप्तिस्मा देईल. (st. matthew 3:11)
- मुळ हिब्रु बाईबल (Old Testament) च्यो सुलेमान (Solomon) ची पुस्तक (अध्याय ५, श्लोक १६) म्हणतात;

हिक्को मुमिताकीम वे कुल्लो मुहम्मदीम जेहदूदेह व जेहरई बयना जेरूसलम (Old Testament, book soloman, ch.no.5, verse no. 16)

म्हणजे "त्यांचे बोल किती मधुर आहेत! ते खुप प्रिय व्यक्ति आहेत. ऐ जेरूसलेमचे मुलींनो हजरत मुहम्मद माझा प्रिय आणि माझा मित्र आहे." (हिब्रु भाषेत नावाबरोबर 'इम' आदर म्हणुन लावले जाते, ह्याच कारणाने येथे नाव 'मुहम्मदिम' आले आहे.)

**बौद्ध धर्मात भविष्यवाणी:-**

- दिव्य पुराणात आहे कि गौतम बुद्ध ईश्वराचे २३ वे अवतार आहेत. बुद्ध यांनी आपल्या भक्त नंदास सांगीतले "हे नंदा! ह्या जगात मी प्रथम बुद्ध नाही आणि ना तर मी अंतिम आहे. येणाऱ्या काळात एक बुद्ध येणार आहेत. जो सत्य आणि दानधर्म शिकवेल. शुद्ध आणि पवित्र शिक्षण देईल. त्याचे मन खुप निर्मळ असेल. तो ज्ञानी असेल तो लोकांचे नेतृत्व करेल आणि सर्व लोक त्यांच्यापासून मार्गदर्शन घेतील. तो सत्य शिकवेल. तो जगाला जीवनाचा सरळ मार्ग देईल, जे शुद्ध आणि पूर्ण असेल, हे नंदा, त्यांचे नाव मैत्रेय असेल." (Gospel of Buddha carus, Page 217)
- डॉ. वेद प्रकाशने आपल्या पुस्तकात (दोन पुस्तके ज्यांचा पुर्वी उल्लेख झाला आहे) सिद्ध केले आहे कि ह्या पवित्र धार्मिक पुस्तकात सर्व भविष्यवाणी हजरत मुहम्मद (स.) साठीच आहे.

- **हे सर्व लिहिण्यामागचा उद्देश्य काय आहे?**

- जर आपण परदेशात गेलो आणि तेथे प्रत्येकजण आपल्यासाठी नविन आणि अपरिचित असेल अशावेळी आपल्याला माहिती झाले कि, त्यातुन एक व्यक्ति आपल्या देशाचा आहे. तेव्हा त्या व्यक्तिबाबत काहीही माहीती नसताना देखील आपल्या मनात त्याच्याबद्दल मित्रता, सहानुभूति आणि आकर्षणची भावना निर्माण होते. कारण त्या व्यक्ति आणि आपल्या मध्ये एकमेव समानता आहे आणि ती समानता म्हणजे 'मातृभुमी'.

- हा समानतेचा विचार दोन अनोळखी लोकांतील दरी कमी करतो. असेच प्रकार त्या वेळीही घडतात जेव्हा आपण आपल्या आणि दुसऱ्या धर्मांच्या दरम्यान समान गोष्टींना ओळखु. आता आपल्याला हे माहीत झाले आहे कि, हिंदु धर्माचे पवित्र कल्कि अवतार/नराशंस, इस्लामचे हजरत मुहम्मद (स.) एक आहेत. हीच समानतेची भावना हिंदु-मुस्लिममधील व्देषभावनेला कमी करेल. ह्या माहितीचा आपण सामान्य लोकांत प्रसार केला पाहिजे. ज्यामुळे दोघांमधील परस्पर व्देष कमी होईल आणि मानव जीवनात शांती येईल आणि सर्व विश्वातील लोक समृद्ध जीवन व्यतित करतील.

# पुस्तकातील सारांश

१.ईश्वर एक आहे, निराकार आहे, आपण फक्त त्याचीच भक्ति व उपासना केली पाहिजे.

२.लोकांना धर्माचे ज्ञान देण्यासाठी ईश्वराने प्रत्येक देश व प्रत्येक युगात पैगंबर पाठविले. ज्यांची एकुण संख्या अंदाजे १,२४,००० आहे. त्यातील काही नावे पुढीलप्रमाणेः-

- हजरत आदम (अ.स.) (ज्यांना ब्रम्हा आणि मनुही म्हटले आहे)
- हजरत नुह (अ.स.) (ज्यांना मनुही म्हटले आहे)
- हजरत इब्राहीम (अ.स.) (ज्यांना अबिराम आणि ब्रम्हाहि म्हटले आहे)
- हजरत इस्माईल (अ.स.) (ज्यांना अथर्ववेदात अथर्वा म्हटले आहे.)
- हजरत इस्हाक (अ.स.) (ज्यांना अथर्ववेदात अंगरिका असे म्हटले आहे)
- हजरत मुहम्मद (अ.स.) (ज्यांना वेद आणि पुराणात नराशंस, कल्कि अवतार, महामे ऋषी, महामद, अहदम असेही म्हटले आहे)
- हजरत ईसा (अ.स.) (भविष्य पुराणात हजरत ईसा (अ.स.) चे वर्णन आहे.)
- हजरत मुसा (अ.स.) (भविष्य पुराणात हजरत मुसा (अ.स.) चे वर्णन आहे.)

ह्या सर्व पैगंबराचा उल्लेख बायबल, कुराण, वेद आणि पुराणात आहे म्हणून ह्या सर्वांना आपण सत्य मानले पाहिजे आणि ह्यांचा आदर केला पाहिजे.

३. आपला जन्म एकदा झाला आहे. आता आपल्याला मृत्यु येईल तोही एकदाच येईल. नंतर दुसरा जन्म होणार नाही. मृत्युनंतर परलोकात ईश्वर आपल्याला पुन्हा जिवंत करील.

४. मृत्यनंतर व्यक्तिच्या कर्मानुसार कयामतपर्यंत परलोकात त्यांना आराम किंवा त्रास भोगावा लागेल.

५. कयामत (प्रलय) मध्ये कर्माचा हिशेब होईल. एक ईश्वरला मानुन त्याची प्रार्थना केली व चांगली कृती केली स्वर्ग होईल एक ईश्वराला मानुन वाईट कर्म केले तर काही वेळेस नरकाची शिक्षा होईल पण शिक्षा पूर्ण झाल्यास स्वर्ग मिळेल.

६. जर एक ईश्वरच्या बरोबर आणि पुष्कळ पैगंबर, वली, अल्लाह, महापुरूष किंवा देवी व देवतांना ईश्वर मानले किंवा ईश्वराप्रमाणे धन व मुक्ति देणारे मानले किंवा त्यांची पूजा याचना केली व त्याबरोबरच चांगले कार्य ही केले तर ह्याच संसारात त्याचे फळ मिळतील. पण शेवटी नरकाचीच शिक्षा त्यांना होणार.

७. सर्व धार्मिक ग्रंथाचा आदर केला पाहिजे.

८. हजरत मोहम्मद (स.अ) अंतिम पैगंबर किंवा अवतार आहेत त्यांच्यानंतर कोणीही अवतार येणार नाही. हजरत ईसा आणि हजरत मेहदी जरी पृथ्वीवर आले तरी ते हजरत मोहम्मद (स.अ) यांना मानणारे असतील. (हदीस)

९. पवित्र कुराणांत ईश्वर म्हणतात कि, मी (ईश्वराने) ज्या धर्माचे शिक्षण हजरत मोहम्मद (स.अ) यांना दिले तेच त्यांनी हजरत इब्राहीम आणि सर्व पैगंबरांना दिले. म्हणुन इस्लाम काही नवीन धर्म नाही.

१०. हजरत मुहम्मद (स.अ) ने सांगितले कि ईश्वराने मला सर्वश्रेष्ठ शिष्टाचार धरतीच्या लोकांना शिकवण्यासाठी पाठविले. म्हणुन जे हजरत मुहम्मद (स.अ) यांना मानतात त्याचे शिष्टाचार देखील सर्वश्रेष्ठ असायला हवे. (हदीस मोत्ता)

११. ईश्वराने सांगितले कि हा संसार माझे कुटुंब आहे म्हणुन ईश्वरची उपासना करणे एक प्रकार त्याच्या कुटुंबाची सेवा करणे पण आहे. (हदीस)

# ईश्वराच्या कृपेसंबधी श्लोक

| पवित्र वेदातील श्लोक | पवित्र कुराणातील श्लोक |
|---|---|
| न भोजा मम्रुनं न्यर्थमीयुनं रष्यिन्ति न व्यथन्ते ह भोजाः।<br>इदं यिव्दश्चं भुवनं स्वश्चैतत्सर्व दक्षिणैभ्यो द्ददाति।<br>दानशील लोक अमर होतात, ना तर त्यांचे नुकसान होते न ते दुखः, चिंता, भितीपासुन त्रासले जातात. दान देणारा दाता ह्या विश्वात आणि स्वर्ग लोकात सुविधा प्राप्त करतो. (ऋग्वेद १०:१९७:८) | अल्लजी-न युन्फिकू-न अम्वालहुम् बिल्लयलि वन्नहारि सिर्रवं-व अलानि-यतन् फ लहुम् अजूरूहुम् अिन-द रब्बिहिम् व ला खवफुन् अलयहिम् व ला हुम् यहजनून<br>जे लोक आपली संपत्ती रात्री व दिवसा उघडपणे व गुप्तरीत्या खर्च करतात, त्यांचा मोबदला त्यांच्या पालनकर्त्यापाशी आहे आणि त्यांच्यासाठी कसलेही भय आणि दुःखाला स्थान नाही. (पवित्र कुराण २:२७४) |
| सइद् भोगो यो गृहवे ददात्यन्न कामाय चरते कृशाय।<br>अरमस्मै भवति यामहूता उतापरीषु कृणुते सखायम।।<br>जे निर्धन आणि दुदैवाने पिडीत असलेल्या लोकांच्या मदतीसाठी दान करतात त्यांचे नेहमी भले होते, त्यांचे शत्रुही त्यांचे मित्र बनतात. (ऋग्वेद १०:११७:३) | वज्ज़रा-इ वल फज़िमीनल-गयज वल्आफ़ि-न अनिन्नासि वल्लाहु युहिब्बुल-मुहिसनीन<br>जे कोणत्याही स्थितीत आपली संपत्ती खर्च करतात, मग ते बिकट स्थितीत असोत किंवा चांगल्या स्थितीत, जे राग गिळुन टाकतात आणि दुसऱ्यांचे अपराध माफ करतात असे सदाचारी लोक ईश्वराला अतिशय प्रिय आहेत. (पवित्र कुराण ३:१३४) |
| यह एक इद् विद्यतेवसुं मर्ताय दाशुषे<br>जो एकमेव ईश्वर आहे तोच दानी मनुष्याला बऱ्याच मार्गाने उपजीविका देतो. (ऋग्वेद १:८४:७) | व अन्फिकू खयरल्-लिअन्फुसिकुम्<br>आपली मालमत्ता खर्च करा हे तुमच्यासाठी योग्य आहे.(पवित्र कुराण ६४:१७)<br>इन् तुक्रिजुल्ला-ह कर्-जन् ह-स-नंय्युज़ाअिफ़हु लकुम् व यग्फिर् लकुम्<br>जर तुम्ही ईश्वराला उत्तम कर्ज दिलेत तर तो तुम्हाला कित्येक पटीने वाढवुन देईल आणि तुमच्या चुकांना माफ करेल. (पवित्र कुराण ६४:१६) |
| स्वयं यजस्व स्वयं जुषस्व<br>तुम्हीच कर्म करा आणि तुम्हीच त्याची फळे भोगा. (यजुर्वेद ३:१५) | अल्ला तंजिरू वाजिरतु वविज्-र उखरा<br>कोणीही ओझे उचलणारा दुसऱ्याचे ओझे उचलणार नाही. (पवित्र कुराण ५३:३८) |

| ***पवित्र वेदातील श्लोक*** | ***पवित्र कुराणातील श्लोक*** |
|---|---|
| पवमान ऋतं बृहच्छुं ज्योतिरजीजनत्।<br><br>पवित्र वेदांतून चमकदार प्रकाश उज्वलीत होऊन काळा अंधकार नष्ट होत आहे. (ऋग्वेद ९:६६:२४) | किताबुन् अन्जल्नाहु इलय-क लितुख्रिजन्ना-स-मिनज्जुलुमाति इलन्नूरि<br><br>हे मुहम्मद! हा एक ग्रंथ आहे जो आम्ही तुमच्याकडे अवतरला आहे जेणेकरून तुम्ही लोकांना अंधारातुन काढून प्रकाशाकडे नेण्यासाठीच हा ग्रंथ आम्ही तुमच्यावर अवतीर्ण केला. त्यांच्या पालनकर्त्याच्या परवानगीने त्या ईश्वराच्या मार्गावर (आणावे) जो स्वयंभू स्तुतीपात्र आहे. (पवित्र कुराण १४:०१) |

# पापी लोकांसाठी चेतावनी

| पवित्र वेदातील श्लोक | पवित्र कुराणातील श्लोक |
|---|---|
| यस्तन्न वेद किमृचा करिष्यति<br>जे त्या ब्रम्हाला ओळखत नाहीत ते वेदांना समजुन काय करणार? (ऋग्वेद १:१६४:३९) | युज़िल्लु बिही कसीरंव-व यह्दी बीही कसीरन्-वमा युज़िल्लु बिही इल्ललू-फ़ासिक़िन<br>ईश्वर यामधुन कित्येकांना मार्गभ्रष्ट होऊ देईल तर कित्येकांना सन्मार्ग दाखवील. परंतु अवज्ञा करणाऱ्यांव्यतिरिक्त अन्य कुणालाही तो मार्गभ्रष्ट होऊ देणार नाही. (पवित्र कुराण २:२६) |
| उत त्व पश्यन्त ददर्श वाचमुत त्वः श्रृण्वन्न श्रुणोत्ये नाम।<br>बुद्धिहिन लोक ग्रंथ पाहुनसुद्धा न पाहिल्यासारखे आणि ऐकुनसुद्धा न ऐकल्यासारखे असतात. (ऋग्वेद १०:७१:४) | वलहुम् अअ्-युनुल-ला-युब्सिरू-न बिहा व लहुम्आजानुल्-ला-यस्मअू-नबिहा-उलाइ-क-कें लूअन्आमि बल हुम अजल्लु<br>त्यांच्याजवळ मने आहेत पण ते त्यांनी विचार करत नाहीत, डोळे आहेत पण ते पाहात नाहीत, त्यांच्याजवळ कान आहेत पण ऐकत नाहीत. ते जनावरांसारखे आहेत किंबहुना त्यांच्यापेक्षाही तुच्छ आहेत, हे ते लोक होत जे गफलतीत हरवले आहेत. (पवित्र कुराण ७:१७९) |
| मा चिदन्यद्वि शसंत सखायो मा रिषण्य।<br>हे मित्रांनो! परमेश्वराव्यतिरिक्त कोणाचीही भक्ति करू नका तर तुमची हिंसा होणार नाही. (ऋग्वेद ८:१:१) | अल्ला तअ-बुद् इल्लल्ला-ह इन्नी अखाफु अलयकुम्-ब- यवमिन् अलीम<br>ईश्वराशिवाय इतर कोणाची भक्ति करू नका अन्यथा मला भीती आहे की तुम्हांवर एके दिवशी दुःखदायक प्रकोप कोसळेल. (पवित्र कुराण ११:२६) |
| अन्धंतमः प्र विशन्ति येअसंभूतिमुपासते।<br>ततो भुय अइव ते तमो य अ उ अम्भूत्यां रताः।।<br>जे असंभूति (म्हणजेच निसर्गनिर्मीत वस्तुंची) भक्ति करतात ते लोक घोर अंधकारात (अन्धतम नामक नरकात) दाखल होतात. आणि ते जे सम्भूती (मुर्ति, बनवलेल्या वस्तू,) लोक जास्त खोल अंधकारात जातील. (यर्जुर्वेद ४०:९) | कुलू अ-तअ-बुदू-न मिन् दुनिल्लाहि मा ला यम्लिकु लकुम् जर्रंव-व ला नफअन् वल्लाहु हुवस्समीअुल-अलीम।<br>त्यांना सांगा, काय तुम्ही ईश्वराला सोडून त्याची उपासना करता जो तुमच्या नुकसानीचाही अधिकार बाळगत नाही की फायद्याचाही नाही? वास्तविक पाहता सर्वांचे ऐकणारा व सर्वकाही जाणणारा तर ईश्वरच आहे. (पवित्र कुराण ५:७६) |

# पापी लोकांना कशाप्रकारे शिक्षा होईल?

| पवित्र वेदातील श्लोक | पवित्र कुराणातील श्लोक |
|---|---|
| असुर्य्या नाम ते लोका अन्धेन तमसा वृताः<br>तॉंस्ते प्रेत्यापि गच्छन्ति ये के चात्महनो जनाः<br><br>जे लोक जगताना आपल्या आत्म्याचे हनन करतात ते मरणोत्तर अंधकारमयी असुरलोकात प्रवेश करतात. (यजुर्वेद ४०:३) | वल्लजीना क-फ-रू बिआयातिना हुम अस्हाबुल मश्अमा। अलैहिम नारूम मुअ् सदा<br><br>हे लोक आहेत उजव्या बाजूवाले आणि ज्यांनी आमच्या वचनांना मानण्यास नकार दिला ते डाव्या बाजूवाले आहेत. (पवित्र कुराण ९०:१९:२०) |
| य आधाय चकमानाय पित्वो अन्नवान्त्सन् सफितायो पजरग्भुषे।<br><br>स्थिरंमनः कृष्णुते सेवते पुरोतो चित्स मर्डितार न विन्दते।।<br><br>जे दुर्बल व अन्नाची आवश्यकता असणारे, गरीबीपासुन पीडीत लोकांना अन्न असतानाही मदत करत नाही त्यांना कष्ट आल्यावर कोणतेही सुख लाभत नाही. (ऋग्वेद १०:११७:२) | फ़-जालिकल्लजी यदुअ-अुल-यतीम व ला यहुज्जु अला तआमिल्-मिस्किन फवयलुल-लिल्मुसल्लीन<br><br>आणि तो जेव्हा त्याला कसोटीत घालतो आणि त्याची उपजीविका त्याच्यासाठी तंग करतो तर तो म्हणतो माझ्या पालनकर्त्याने मला अपमानित केले, कदापि नाही, किंबहुना तुम्ही अनाथांशी मानाचा व्यवहार करीत नाही. आणि गरिबाला जेवू घालण्यासाठी एक दुसऱ्याला उत्तेजन देत नाही, आणि वारसाची सर्व मालमत्ता गिळंकृत करता, आणि संपत्तीच्या प्रेमात वाईटरित्या गुरफटला आहात. (पवित्र कुराण ८९:१६:२०) |
| ऋतस्य पन्था न तरन्ति दुष्कृतः<br><br>सत्याच्या मार्गाला दृष्कर्मी पार करू शकत नाही. (ऋग्वेद ९:७३:६) | व इंय्यरौ सबीलर्रुश्दि ला यत्तकखिजूहु सबीलन्<br><br>मी आपल्या संकेताकडून त्या लोकांची दृष्टी फिरवीन जे कसल्याही हक्काविना भूतलावर मोठे बनतात, त्यांनी कोणतेही संकेत जरी पाहिले तरीदेखील कधीही ते त्या संकेतांवर श्रद्धा ठेवणार नाहीत. जर सरळमार्ग त्यांच्यासमोर आला तर याचा अवलंब करणार नाहीत. आणि वक्र मार्ग दिसून आला तर त्याच्यावर चालू लागतील, याकरिता की त्यांनी आमच्या संकेतांना ठरविले आणि त्यापासून ते बेपर्वाई करीत राहिले. (पवित्र कुराण ७:१४६) |

